# मेहता मराठी ग्रंथजगत

गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!


। मार्च, २०१५
। किंमत १५ रुपये

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक



## आमची नवीन पुस्तके






'प्लेइंग इट माय वे'
सचिन तेंडुलकर याच्या
आत्मचरित्राचा मराठी अनुवाद
'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे
रसिक वाचकांसाठी
लवकरच उपलब्ध.

नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय
पुस्तक प्रदर्शनात ऑस्ट्रेलियन लेखिका **पॉला कॉन्स्टंट**
लिखित **'स्लो जर्नी साऊथ'** आणि **'सहारा'**
या दोन इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.




**मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे**
प्रकाशित या पुस्तकाच्या
प्रकाशनप्रसंगी पॉला कॉन्स्टंट
उपस्थित होत्या.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। मार्च २०१५ । वर्ष पंधरावे । अंक तिसरा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**


प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संवाद | ४ |
| संपादकीय | ६ |
| साहित्यवार्ता | १० |
| मराठवाड्यातील स्त्रीलेखिकांचे योगदान | ३० |
| अभिप्राय | ४० |
| पुरस्कार | ४२ |
| अभिजात | ५१ |
| पुस्तक परिचय | |
| प्रयत्ने धरू यशपंथ | ५४ |
| एका प्राणीसंग्रहालयाची गोष्ट | ७२ |
| साहित्यचिंतन | ८५ |
| श्रद्धांजली | ८९ |
| स्मृती विशेष | ९२ |
| बालनगरी | ९५ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संवाद.....

**आनंदाची उधळण करीत, चैत्र शुद्ध प्रतिपदा दारी आली ।**
**नव्या ऋतुत, नव्या जीवनात उत्साहाची पालवी फुलली ।।**
**कडूनिंब दुःख निवारी, साखर सुख घेऊन येई।**
**पानाफुलांचे तोरण बांधून दारी, उभारूया आशा-आकांक्षांची गुढी**

चैत्र महिना, मराठी महिन्यांतला पहिला महिना. शुष्क झालेली सृष्टी, झाडांची झालेली पानगळ, निष्पर्ण झालेले वृक्ष हे चैत्राच्या नवपालवीने फुलतात. चैत्र म्हणजे वसंत ऋतूची चाहूल, वसंतातल्या पालवीचं सुंदर मनोगत! या दिवसांत झाडावेलींची कोवळी पालवी बाळसं धरू लागते... आणि अशाच वसंताच्या हिंदोळ्यावर अलगद पावले टाकीत अवतरते चैत्र शुद्ध प्रतिपदा... नवसंवत्सराचा, नववर्षाचा पहिला दिवस. गुढी पाडवा !

चैत्र महिन्यातील शुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा होणारा गुढी पाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. गुढी पाडव्याची तुलना उगवणाऱ्या सूर्याच्या तेजाशी केली जाते. या दिवशीच्या कार्याला मुहूर्त पाहावा लागत नाही. शालिवाहन शकाचा प्रारंभ याच दिवसापासून होतो. शालिवाहन नावाच्या कुंभार समाजाच्या मुलाने याच दिवशी मातीचे सैनिक बनवून त्यावर पाणी शिंपडले आणि त्यांना सजीव बनविले. त्यांच्या मदतीने शत्रूंचा सामना केला. या विजयाप्रीत्यर्थ शालिवाहन शकाचा प्रारंभ झाला. या दिवशी दारोदारी गुढी उभारून नवीन सुरू होणाऱ्या वर्षाचे स्वागत केले जाते. या दिवशी गुढी उभारायची ही आपल्या भारतीय संस्कृतीतली जुनी परंपरा आहे. या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली; त्यामुळे हा निर्मितीचा, सृजनाचा सण आहे. प्रभू श्रीराम रावणाचा वध करून या दिवशी अयोध्येत परतले; त्यामुळे त्यांच्या स्वागतासाठी अयोध्येतील लोकांनी आपापल्या

दारासमोर गुढ्या उभारल्या होत्या. गुढी हे आनंदाचं प्रतीक आहे, तसं ते मानवी ध्यासाच्या उंचीचंही द्योतक आहे.

गुढी उंच बांबूपासून तयार केली जाते. सूर्योदयाच्या वेळी म्हणजेच ब्राह्म मुहुर्तावर ही गुढी उभारायची असते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडूनिंब, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे/तांब्या बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. घरादाराला आंब्याच्या पानांची तोरणे बांधली जातात, फुलांच्या माळांनी घर सजवले जाते. सकाळी मुखमार्जनानंतर कडुनिंबाची कोवळी पाने, हिंग, ओवा, चिंच या समवेत खावीत असा प्रघात आहे. वरकरणी कडू असणारी ही वनस्पती आरोग्यवर्धक आणि आरोग्यदायी आहे. वर्षाच्या सुरुवातीला मागच्या सगळ्या कटू गोष्टी विसरून मनातील नव्या गोडव्यासह नवीन वर्ष सुरू करा असे तर ही प्रथा सांगत नसेल? या सर्व परंपरांतून लहानपणापासूनच आपण निसर्गाच्या जास्तीत जास्त जवळ जाण्यास शिकतो.

**चैत्राची सोनेरी पहाट, उंच गुढीचा थाट**
**आनंदाची उधळण, सुखाची बरसात**
**दिवस सोनेरी, अन् नव्या वर्षाची सुरुवात**

गुढी पाडव्याच्या दिवशी वर्षारंभ होतो म्हणून त्या दिवशी पंचांग पूजन करून त्यातील नवसंवत्सर फल वाचले जाते. दारी उभारलेली गुढी हे मांगल्याचं, पावित्र्याचं, समृद्धीचं प्रतीक आहे. जीवनात सुख, दुःख कधीच एकटे येत नाही. सुखामागे दुःख आणि दुःखामागे सुख दडलेले असते. थोडक्यात हा उत्सव मानवात चेतना भरून त्याच्या अस्मितेला जागृत करतो. वसंताच्या आगमनाने, पाडव्याच्या मुहूर्तावर येणाऱ्या वर्षाबद्दल जे जे तुमचा शब्दकुंचला चितारायला उत्सुक असेल ते ते तुम्ही आमच्यापर्यंत पोहोचवू शकता.

आपले लेखन इ-मेलने खालील पत्त्यावर पाठवा.

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखांचा अंकात समावेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका पुस्तक खरेदीवर ४० टक्के सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत
मेहता मराठी ग्रंथजगत




# दिल्लीतील जागतिक ग्रंथजत्रा

डॉ. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठीच्या वाट्याला चौथ्यांदा हा पुरस्कार आला याची धन्यता आणि अभिमान प्रत्येकाला वाटेल. प्रत्येक प्रतिभावंताचे स्वत:चे खास वेगळेपण असते. त्यामुळे त्याची एक अपूवाई असते. नेमाडे यांनी मराठीत नवे पर्व सुरू केले. त्यावर या पुरस्काराने शिक्कामोर्तब केले त्यांचे अभिनंदन.

भारतीय ग्रंथप्रकाशन क्षेत्र आता अधिकाधिक प्रभावशाली होण्याच्या दिशेने झपाटलेले आहे असे नवी दिल्ली येथे १४ ते २२ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या जागतिक ग्रंथयात्रेचा थाटमाट पाहून वाटले. प्रगती मैदानावर गेली साठ वर्षे ग्रंथजत्रांप्रमाणेच वेगवेगळ्या जत्राप्रदर्शनांची रेलचेल चालू असते. विविध व्यावसायिकांची त्यामुळे येथे वर्दळ असते. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे अनेक उपक्रम येथे राबवले जातात. आपल्या दृष्टीने  ग्रंथमहोत्सवाचा सोहळा येथे होतो, आणि जागतिक ग्रंथ प्रकाशक, ग्रंथपाल, संस्थाचालक, लेखककवी, ग्रंथव्यवहाराशी संबंधित जाणकार, विचारवंत, कलावंत यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली भूमी म्हणून आपल्याला ती वंदनीय वाटते. रसिक वाचकांचे नंदनवन (बुक लव्हर्स पॅराडाइझ) म्हणून या ग्रंथजत्रेचे वर्णन केले जाते. नॅशनल बुक ट्रस्टद्वारे या ग्रंथजत्रेचे नेटके आयोजन केले जाते. इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशनचे सहकार्य एनबीटीला लाभते.

यंदा एकूण ४५००० चौ. मीटर जागेत ११०० स्टॉल्स उभारण्यात आले होते. इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन, पोलंड, तुर्कस्तान, जपान, द. कोरिया वगैरे देशांमधील प्रकाशन संस्थांचे स्टॉल्स लक्ष वेधून घेत होते. गेल्या वर्षी फ्रान्स हा देश गेस्ट ऑफ ऑनर म्हणून उपस्थित होता. त्याचा

परिणाम म्हणून यंदा फ्रान्समधील ग्रंथदालनामध्ये दोन हजारावर पुस्तके मांडण्यात आली होती. इंडोफ्रेंच प्रोफेशनल राउंड टेबल चर्चासत्रांचे यावेळीही आयोजन केले गेले. भारतामध्ये सोळा हजारावर प्रकाशन संस्था असून त्या २२ भाषांमध्ये वर्षाला दीड लाख पुस्तके प्रकाशित करतात आणि त्यांची उलाढाल सतराशे कोटीच्या घरात होते. भारत ही एक पुस्तकांची मोठी बाजारपेठ आहे हे त्यांच्या मनावर ठसवण्यात आले.

भारतात वेगवेगळ्या भाषा बोलल्या व लिहल्या जातात. त्यापैकी २८ भाषांमध्ये पुस्तके प्रसिद्ध होत असतात. भारतीय भाषांमधील साहित्य हे इंग्रजीत काही प्रमाणात अनुवादित होते. परंतु हे अनुवादकांचे प्रमाण फारच अल्प असल्याने त्याची युरोपियन देशांना फारशी कल्पना नसते. इंग्रजीशिवाय इतर भाषांमध्येही भारतीय साहित्याचा अनुवाद मोठ्या संख्येने होण्याची मोहिम राबवली गेली पाहिजे असे यावेळी प्रतिनिधींनी सुचवले.

ईशान्य (पूर्वोत्तर) भारताचा विचार डोक्यात येताच त्या सीमावर्ती पर्वतीय धरतीचे चित्र मनात डोकावू लागते. याच भूमीत सूर्याची पहिली किरणं आपल्याला दिसतात. भारताची विविधतेनं नटलेली संस्कृती, हिरव्यागार डोंगराच्या रांगा, बर्फाच्छादित पर्वत शिखरे, नद्यांच्या संगमांची मनोरम दृश्ये म्हणून पूर्वोत्तर भागाला विविधतेनं नटलेली भूमी म्हटले जाते. विविधता हाच या भूमीचा खरा अर्थ होय. भाषा, संस्कृती, रहिवासी आणि खाणेपिणे यातही विविधता दिसून येते. तेथील संगीत, कला व लोकगीतांच्या वाचिक आणि लिखित स्वरूपात दिसून येते. येथील लेखक आणि विद्वानांचे लेखन देशातील साहित्यिक प्रवाहांना समृद्ध करणारे असतेच शिवाय परंपरेची सशक्त चेतना. या भागात प्रचलीत लोकसाहित्याचे आदिबंधात्मक महत्व खूप दीर्घकालीन असून वर्तमानात त्यांना समजावून घेणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने या ग्रंथजत्रेत या भागातील लोकसाहित्याचा सर्वांगीण विचार करण्यासाठी खास चर्चासत्राचेही आयोजन करण्यात आले होते. या भागातील प्रतिभावंत साहित्यिक या चर्चासत्रांना उपस्थित होते.


त्याचप्रमाणे या ग्रंथजत्रेत कोरिया या देशावर फोकस होता. म्हणून सहभागी झाला होता. पुस्तके बंद मनाची दारे उघडतात आणि दारे भविष्यात प्रवेश करू देतात. अशी या सहभागाची महती अधोरेखित करण्यात आली होती. कोरियातील अनेक प्रकाशक आणि लेखक या महोत्सवात सहभागी

झाले होते. कोरियातील बालसाहित्यातून तेथील परंपरा आणि इतिहासाचा सांस्कृतिक अनुबंध समजावून घेण्यासाठी अनेक उपक्रम यावेळी राबवण्यात आले. कोरियन जीवनशैली आणि उद्योगव्यवसायाचे दर्शन घडावे, अशी योजना होती. कोरियामधील ५९० प्रकाशक या ना त्या प्रकारे या महोत्सवात सहभागी झाले होते. कोरियात सेऊल येथे भरणाऱ्या ग्रंथजत्रेचे आमंत्रणही यावेळी भारताला देण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सुमारे दोन लाख रसिकांनी या ग्रंथजत्रेला भेट देऊन आपल्या आवडीची पुस्तके खरेदी केली. मात्र त्यात इंग्लिश पुस्तकांचीच विक्री जास्त प्रमाणात झाली. प्रादेशिक भाषांमधील पुस्तकांची विक्री अभावानेच होते हा अनुभव यंदाही आला.

मेहता पब्लिशिंग हाऊस इंग्लिश भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन करु लागले आहे. या ग्रंथजत्रेत स्लो साऊथ जर्नी आणि सहारा ही पॉला कॉन्स्टंट या लेखिकेची पुस्तके प्रकाशित करण्यात आली. पॉला कॉन्स्टंट ही ऑस्ट्रेलियातील शिक्षिका असून तिने सहारा वाळवंटात सात हजार किलोमीटर पायी प्रवास केला. त्याची कहाणी या दोन पुस्तकांत कथन केली आहे.

या पुस्तकांच्या लेखिकेशी वाचकांना हॉल नं. १०, ११ मधील ऑथर्स कॉर्नरमध्ये भेटण्याची संधी मिळाली. पुण्यातही २७ फेब्रुवारीला या पुस्तकांचे प्रकाशन झाले. पॉला कॉन्स्टंटने थर वाळवंटात भटकंती करायचे आता ठरवले आहे.



**मेहता मराठी ग्रंथजगत**
**दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल रूल्स : १९५६)**
**नियम क्र. ८ अन्वये निवेदन (फॉर्म ४)**

१) प्रकाशन स्थळ : मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, पुणे ३०.
२) प्रकाशन काल : मासिक
३) मुद्रक, प्रकाशक व संपादक : सुनील अनिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०
४) प्रकाशनाची मालकी : सुनील अनिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०.
५) राष्ट्रीयत्व : भारतीय

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १.३.२०१५

सुनील अनिल मेहता
प्रकाशक

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




## भारतात प्रकाशन क्षेत्रास मोठा वाव

इंग्लंड - अमेरिकेत डिजिटल क्रांतीमुळे पारंपरिक ग्रंथ प्रकाशन क्षेत्रापुढे अनेक समस्या उभ्या राहत आहेत. पण भारतात मात्र छापील पुस्तकांचे वर्चस्व कायम आहे, असे मत सेज पब्लिकेशनचे कार्यकारी संचालक विवेक मेहरा यांनी व्यक्त केले.

मेहरा यांनी सांगितले की, पूर्वी माझ्यासाठीही प्रकाशन व्यवसाय काहीसा अनाकलनीय असाच होता. प्रकाशनात कारकीर्द घडवण्याअगोदर काही गोष्टी आत्मसात करणे आवश्यक आहे. तुम्ही एका रात्रीत उत्तम संपादक बनू शकत नाही. त्यासाठी वर्षानुवर्षे सराव आणि अभ्यास आवश्यक असतो. लोकांच्या वाचनाबाबतच्या आवडीनिवडी लक्षात आल्याशिवाय कोणीही यशस्वी प्रकाशक बनू शकत नाही. भारतामध्ये इंग्रजी साहित्याची आवड असणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्याचा फायदा प्रामुख्याने प्रकाशन व्यवसायाला होत आहे. त्यामुळेच देशातील प्रकाशन व्यवसाय तब्बल १५ टक्के या गतीने प्रतिवर्षी वाढताना दिसत आहे. ऑनलाइन खरेदीबाबत पुस्तके हे दुसऱ्या क्रमांकाचे उत्पादन बनले आहे. प्रकाशन व्यवसायात प्रचंड संधी उपलब्ध असूनही त्यात करीयर करण्याची फारशी उत्सुकता तरुणवर्गात दिसून येत नाही. यामागचे एकमेव कारण म्हणजे त्यांना प्रकाशन व्यवसायाबाबत मार्गदर्शन करणारे व्यावसायिक अभ्यासक्रम पुरेसे उपलब्ध नाहीत. प्रसारमाध्यमे, व्यावसायिक करारमदार, विधिविषयक संवाद, सेल्फ पब्लिशिंग या माध्यमातून युवकांना प्रकाशनात नोकरी आणि स्वयंरोजगाराच्या हजारो संधी उपलब्ध होत आहेत, अशी माहिती मेहरा यांनी दिली.

## मुद्रित पुस्तकांची मागणी कायम राहणार

भारतातील वाचनप्रेमींना अजूनही कागदावर छापलेल्या शब्दांविषयीच अधिक आत्मीयता वाटते. त्यामुळे आगामी वर्षातही मुद्रित पुस्तकांची मागणी कायम राहील. डिजिटल क्रांतीमुळे तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर ई बुक्सकडे वळेल, असे मत टेलर अँड फ्रान्सीस प्रकाशन संस्थेच्या मार्केटिंग प्रमुख शफीना सेगन यांनी व्यक्त केले.

ई बुकच्या जमान्यात पारंपरिक मुद्रित पुस्तके टिकणार का? स्वप्रकाशित पुस्तकांच्या आक्रमणात पारंपरिक पद्धतीने पुस्तक प्रकाशन करणारे प्रकाशक टिकणार का? हे प्रश्न सातत्याने उपस्थित केले जात आहेत. भविष्यकाळ हा निश्चितपणे ई बुकचा राहणार आहे. भविष्यात पारंपरिक लायब्ररीजना ई लायब्ररीजचे स्वरूप येईल. त्याचप्रमाणे ई बुक वाचण्यासाठी वापरली जाणारी उपकरणेही स्वस्त होतील. त्यामुळे या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी प्रकाशक तसेच लेखकांना आपला मजकूर मर्यादित स्वरूपातच ठेवणे भाग पडेल. प्रकाशकांना वाचकांच्या संपर्कात राहून आपल्या साहित्याची जाहिरात करण्यासाठी फेसबुक आणि ट्विटर-बरोबरच इतर सोशल मिडियाचा उपयोग करणेही अनिवार्य ठरेल, असे मत सेगन यांनी व्यक्त केले.

## ई बुक मुळे पुस्तकांच्या वितरण पद्धतीत बदल

प्रकाशन व्यवसाय क्षेत्रात डिजिटलायजेशनमुळे खूप मोठे बदल होत आहेत. ई बुक च्या संकल्पनेमुळे प्रकाशकांची केवळ कामाची पद्धतच बदलली नसून पुस्तकांच्या वितरण पद्धतीतही मोठे बदल झाले आहेत असा सूर फिक्कीतर्फे नवी दिल्लीत आयोजित पब्लिकॉन या परिसंवादात उमटला.

या परिसंवादात राज्यसभा खासदार आणि लेखक पवन वर्मा म्हणाले की, आता वाचकांपुढे नेहमीच मुद्रित तसेच ई बुक पर्याय उपलब्ध राहील. तरुण पिढीत डिजिटल स्वरूपाची क्रेझ वाढत असली तरी प्रौढवाचक मात्र अजूनही छापील पुस्तकांनाच पसंती देत आहे.

फिक्की पब्लिशिंग कमिटीच्या अध्यक्षा उर्वशी बुटालिया म्हणाल्या की, आता प्रकाशन व्यवसाय केवळ पुस्तके छापण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. मोबाईल फोन, लॅपटॉप, टॅबलेट, आय पॅड यासारख्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट्समुळे प्रकाशकांच्या साहित्याला नवे माध्यम मिळाले आहे. या

प्रकारच्या डिजिटल पब्लिशिंगमुळे प्रकाशकांच्या पारंपरिक वितरण पद्धतीतही अनेक बदल होत आहेत.

ग्रीन गोल्ड ॲनिमेशनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजीव चिलका म्हणाले की, लहान प्रकाशकांसाठी डिजिटल पब्लिशिंग खूपच फायदेशीर ठरते. कारण डिजिटल साहित्य हे कधीच न संपणारे आणि हव्या त्या वेळी, हव्या त्या ठिकाणी एका बटन क्लिकद्वारे उपलब्ध होणारे असते.

## सलमान रश्दींचा कथासंग्रह

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ब्रिटिश लेखक सलमान रश्दी यांच्या नव्या कथासंग्रहामध्ये (टू इअर्स एट मन्थस अँड ट्वेंटी एट नाईट्स) अरेबियन नाईट्सप्रमाणेच लोककथांचा समावेश आहे. या कथांपासून वाचकांना इतिहास, पुराणशास्त्र, प्रेमकथा अशा सर्व घटकांचा आस्वाद घेता येईल, असे प्रकाशक जोनाथन केप यांनी सांगितले. या नव्या कथासंग्रहाची पाने केवळ अडीचशे आहेत असे त्यांनी इंग्लंडमधील साहित्य महोत्सवात सांगितले.

## चित्रपटांमुळे वाचन संस्कृतीस चालना

साहित्यकृतींवर आधारित चित्रपटांमुळे तरुणाई वाचनसंस्कृतीकडे पुन्हा एकदा वळत असल्याचे दिसून येत आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या ‘लोकमान्य’ व ‘रंगरसिया’ या चित्रपटांमुळे अनुक्रमे ‘दुर्दम्य’ व ‘राजा रवि वर्मा’ या पुस्तकांची मागणी वाढली आहे

गंगाधर गाडगीळ यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आधारित ‘दुर्दम्य’ ही कादंबरी लिहिली होती. अभिनेते सुबोध भावे यांनी लोकमान्य टिळकांची भूमिका साकारण्यासाठी ही कादंबरी विशेष उपयुक्त ठरल्याचे सांगितले. ‘लोकमान्य’हा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून वाचकांकडून या कादंबरीसाठी मागणी आहे. साहित्यिक रणजित देसाई यांनी महान चित्रकार राजा रवि वर्मा यांच्या आयुष्याचा पट उलगडला होता. दिग्दर्शक केतन मेहता यांनी या कादंबरीवर आधारित ‘रंगरसिया’ हा चित्रपट केला. त्याचा फायदा एका अर्थाने या पुस्तकालाही झाला. या पुस्तकाची मागणीही वाढली आहे.

## फेसबुकचे आवाज ओळखणारे स्टार्टअप

फेसबुकने आवाज ओळखणारे स्टार्टअप विकत घेतले आहे. या तंत्रज्ञानामुळे आवाजाचे रूपांतर 'कृतियोग्य माहितीमध्ये' करता येईल. विट.आयच्या तंत्रज्ञानाद्वारे वापरकर्ता तोंडी आदेश देऊन त्याचे रूपांतर लिखित स्वरूपात करून संदेश पाठवू शकेल.

विट डॉट आयच्या म्हणण्यानुसार, त्यांचे हे तंत्रज्ञान अनेक ॲप्लिकेशन्समध्ये आधीपासूनच वापरात आहे. फेसबुकमध्ये त्याच्या पुढील टप्पा गाठला जाणार आहे. जगातील कोट्यवधी लोकांना आपल्या नैसर्गिक भाषेत या तंत्रज्ञानाने संवाद साधता येईल.

फेसबुकच्या स्पर्धक असलेल्या ॲपल, गुगल आणि मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांच्या स्मार्टफोनमध्ये आवाज ओळखणारे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. हे तंत्रज्ञान फेसबुकने ॲप्लिकेशनद्वारे दिल्यास त्याचा अधिक फायदा होईल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

या वर्षाचा संकल्प म्हणून फेसबुकचा मार्क झुकेरबर्ग दर आठवड्याला एक पुस्तक वाचून त्याची माहिती फेसबुकवर देणार आहे. त्यासाठी त्याने 'इयर ऑफ बुक्स' हे पेजही तयार केले आहे.

## 'संवादिनी' फिरते ग्रंथालय

'चूल आणि मूल' या चाकोरीबद्ध आयुष्यात अडकून पडलेल्या ग्रामीण भागातील महिलांना बदलांची दिशा दाखवण्याचे काम आलोचना संस्थेने 'संवादिनी' या फिरत्या ग्रंथालयाद्वारे केले आहे. स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पुस्तके, वैचारिक साहित्य, मासिके आणि वर्तमानपत्रे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ग्रामीण भागातील निवडक स्वयंसेवी संस्थांशी संलग्न होऊन पुस्तके वाचनासाठी देण्याबरोबरच स्त्रियांच्या समस्यांवरील लघुपटांचे सादरीकरण, अनुभवकथन, भित्तिपत्रकातून मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या प्रकल्पाचे काम पाहणाऱ्या वंदना कुलकर्णी आणि वृषाली गायकवाड म्हणाल्या, ''महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी उपलब्ध असलेल्या माध्यमांचा वापर करून आयुष्याला उपयोगी पडेल असे ज्ञान त्यांच्यापर्यंत पोचविण्याची जबाबदारी घेऊन विविध कार्यक्रमांतून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.''

“महिलांसंबंधी ‘आलोचना’ने संकलित केलेले साहित्य इतर संस्थांनाही वापरता यावे म्हणून हा प्रकल्प राबवला जातो, यातून महिलांना वाचनाची सवय लागावी, त्यांनी बोलते व्हावे, दुसऱ्यांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहायला शिकावे” असे वंदना कुलकर्णी यांनी सांगितले.

## तेरा वर्षांच्या शुभमची अमेरिकेत कंपनी स्थापन

भारतीय वंशाच्या एका तेरा वर्षांच्या अमेरिकी मुलाने अमेरिकेत स्वत:ची कंपनी स्थापन केली आहे. शुभम बॅनर्जी असे त्याचे नाव असून, तो कॅलिफोर्नियात चँपियन स्कूलमध्ये आठवीत शिकत आहे. त्याने ब्रेगो लॅब्ज नावाची कंपनी स्थापन केली असून, ब्रेलमध्ये प्रिंटिंगसाठी कमी खर्चात प्रिंटर उपलब्ध करून देण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे.

विशेष म्हणजे इंटेल कॉर्पोरेशनने शुभमच्या कंपनीत गुंतवणूक केली आहे. अशा प्रकारचा निधी मिळवणारा तो सर्वांत लहान मुलगा ठरला आहे. शुभमने शाळेच्या विज्ञान प्रदर्शनात २०१४ लेगो रोबोटिक्सचा समावेश असलेला ब्रेल प्रिंटर तयार केला होता. अशा प्रकारच्या व्यावसायिक प्रिंटरसाठी दोन हजार डॉलर खर्च येतो, हे ऐकल्यावर त्याने कमी खर्चातील प्रिंटरवर काम केले होते. त्याच्या या प्रिंटरला खूप पारितोषिके मिळाली. शुभमला त्याच्या वडिलांनी ३५ हजार डॉलर दिल्यावर त्याने ब्रेगो लॅब्ज ही कंपनी सुरू केली. नोव्हेंबरमध्ये इंटेलने या कंपनीत गुंतवणूक केली.

## ‘शब्दधन काव्यमंच’ तर्फे फुलांच्या शेतात मैफल

‘फुलों के रंगसे, कवी की कलमसे’, ‘गुलाब सांगतो, येता-जाता रडायचं नसतं, काट्यात सुद्धा हसायचं असतं’, ‘घरातल्या मुलांवर संस्कार असा करायचा, बागेतल्या फुलांचा हार जसा गुंफायचा’, अशा वैविध्यपूर्ण रचनांनी पिंपळे गुरव येथील शब्दधन काव्यमंचने रासे (ता. खेड) येथे फुलांच्या शेतात मैफल रंगवली.

मैफलीचा प्रारंभ हिंदी शायर नीरज यांच्या ‘फुलों के रंगसे, दिल की कलमसे’ या राज आहेरराव यांनी गायलेल्या गीताने झाला. त्यानंतर अण्णा जोगदंड यांनी ‘फुले शिकवितात - गुलाब सांगतो, येता जाता रडायचं नसतं’ ही कविता सादर केली. पीतांबर लोहार यांनी ‘घरातल्या मुलांवर संस्कार असा करायचा ’ ही कविता सादर केली.

शरद शेजवळ, अनिल दीक्षित, सविता इंगळे, संतोष गाढवे, आय.के. शेख, अशोक कोठारी, तानाजी एकोंडे, वर्षा बालगोपाल, राधा वाघमारे, मनमोहन जालेपोलेलु, डी. के. वडगावकर, नितीन पवार, विकास राऊत, जैयनूल शेख, अंतरा देशपांडे, संगीता जोशी यांनीही कविता सादर केल्या.

## काळा घोडा महोत्सव

हिंदू हा धर्म, तर हिंदुत्व संप्रदाय आहे. धर्मात अनेक गोष्टींसह हिंदुत्वाचाही समावेश होतो. धर्म व संप्रदाय वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे त्यांची सरमिसळ करू नये, असे आवाहन 'सेव्हन सिक्रेट्स ऑफ विष्णू' 'शिव' आणि 'जय' आदींचे लेखक देवदत्त पटनायक यांनी केले. काळा घोडा महोत्सवात पॉप्युलर प्रकाशनचे संचालक हर्ष भटकळ यांनी पटनायक यांच्याशी धर्म, पुराण, वेद, शास्त्र, उपनिषद, मनोविज्ञान आदी विषयांवर संवाद साधला. इतिहास, भूगोल, संस्कृती, तत्त्वज्ञानाचा सहभाग असलेला महाभारत हा ग्रंथ नाही तर परंपरा आहे, हे समजावून सांगण्यासाठी पुस्तक प्रपंच केल्याचे पटनायक म्हणाले.

## 'गुगल मॅप्स' रस्त्याचे वर्णन करणार

तुम्हाला देशातील एखाद्या मोठ्या शहरात फिरायचे आहे. रस्ते माहीत नाहीत, वळणे आणि चौकांवर गोंधळ उडतो. अशा वेळी तुम्ही तुमच्या हातातील स्मार्ट मित्राच्या स्क्रीनवरील मॅपिंग ॲपकडे मदत मागू शकता. हे ॲप तुम्हाला हवी असलेली माहिती ऑडिओद्वारे सांगेल. स्मार्ट फोनवर मॅपिंगच्या ॲप्लिकेशनद्वारे शहरातील रस्त्यांची दिशादर्शक माहिती ऑडिओ स्वरूपात मिळू शकेल. देशातील २० शहरांमध्ये ही सेवा उपलब्ध आहे. 'व्हाईस बेस्ड लेन गायडन्स' असे या सेवेचे नाव आहे. अँड्रॉईड आणि आयओएस ऑपरेटिंग सिस्टिम असणाऱ्या स्मार्ट फोनवर ही सेवा नेव्हिगेशन मोडचा वापर करून वापरता येईल. त्यासाठी जीपीएस नेटवर्क आवश्यक आहे. मॅप हिंदी आणि इंग्रजीत ही सेवा उपलब्ध होईल, असे गुगल मॅप्सचे संचालक सुरेन रुहेना यांनी सांगितले.

मॅप्स नेव्हिगेशनची सेवा मुंबई, पुणे नागपूर, अहमदाबाद, बंगळूर, भोपाळ, चंदिगड, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदौर, जयपूर, कोलकता,

लखनौ, म्हैसूर, सूरत, तिरुअनंतपूरम, वडोदरा आणि विशाखापट्टणम या शहरांमध्ये उपलब्ध आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गांवरही ही सेवा उपयुक्त ठरेल.

## ऑक्सफर्ड प्रेसचे 'प्रिंट ऑन डिमांड'

भारतात शंभर वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेली ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस ही संस्था भारतीय ग्राहकांसाठी 'प्रिंट ऑन डिमांड' योजना सुरू करणार आहे. तसेच स्थानिक लेखकांचे साहित्य आणि प्रकाशन संस्थांचे आंतरराष्ट्रीय उपक्रम डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून जागतिक स्तरावर राबवणार आहे.

ऑक्सफर्ड प्रेसच्या प्रकाशन विभागाचे कार्यकारी संचालक टीम बर्टन यांनी म्हटले आहे, 'ऑक्सफर्ड भारतात गुंतवणूक, एकीकरण आणि स्वायतत्ता या तीन बाबींवर अधिक लक्ष देणार आहे. भारतात शैक्षणिक प्रकाशनासाठी नवी संघटनात्मक व्यवस्था उभी करण्यात येणार आहे.'

दरम्यान, भारतातील लेखक आणि प्रकाशक ऑनलाइन मार्केटिंगच्या क्षेत्रात उतरले आहेत. भारतात पुस्तक प्रकाशनासाठी पाच वरिष्ठ अभ्यासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार भारतीय संपादक भारतीय लेखकांबरोबर काम करीत आहेत, असेही बर्टन म्हणाले.

## नेमाडेंवर टीका करताना सलमान रश्दी घसरले

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक सलमान रश्दी यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी लेखक भालचंद्र नेमाडे यांच्यावर अत्यंत शेलक्या भाषेत टीका केल्याने खळबळ माजली.

''चिडक्या म्हाताऱ्या, गुपचूप पुरस्कार घे आणि सभ्यपणे आभार मान. ज्यांच्यावर टीका करत आहात त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा एक शब्दही तुम्ही वाचलात की नाही याचीच शंका वाटते,'' असे ट्विट सलमान रश्दी यांनी केले आहे. याआधी नेमाडेंनी व्ही. एस. नायपॉलवर आणि आपल्यावर अशिष्ट पद्धतीने टीका केली होती याची आठवण करून दिली आहे.

हे टीकास्त्र डागताना रश्दी यांनी एका इंग्रजी दैनिकाची लिंकही ट्विटरवर दिली आहे. रश्दी यांचे लिखाण पाश्चिमात्यांची भलामण करणारे

आणि कलात्मक मूल्य नसलेले साहित्य असल्याची टीका नेमाडे यांनी केली होती. वादग्रस्त ट्विटनंतर नेमाडे समर्थक आणि रश्दी समर्थक यांच्यात चांगलेच ऑनलाईन वाक् युद्ध पेटले होते.

## कोलकाता बुक फेअर 'मध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जलवा

प्रसिद्ध पत्रकार सुजित रॉय यांनी बंगालीमध्ये लिहिलेल्या 'स्वप्नेर फेरीवाला' (ड्रीम मर्चंट) या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर आधारित ग्रंथाला पश्चिम बंगालमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे.

कोलकाता बुक फेअर मध्ये हे पुस्तक हातोहात खपत आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात प्रकाशित झालेल्या या ४३० पानी पुस्तकाची पहिली आवृत्ती सहा महिन्यांत संपली. 'डी पब्लिकेशन' या संस्थेने हे पुस्तक प्रसिद्ध केले असून, त्याची किंमत केवळ दोनशे रुपये आहे.

या पुस्तकामध्ये नरेंद्र मोदी यांचा सामान्य विक्रेता ते पंतप्रधान असा प्रवास मांडण्यात आला आहे. मोदींनी देशवासीयांना दाखवलेली अच्छे दिनची स्वप्ने प्रत्यक्षात येतील का, असा सवालही त्यांनी केला आहे.

## ९५वे नाट्य संमेलन

९५व्या नाट्य संमेलनाचे उद्‌घाटन राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष डॉ. अशोक साठे, मावळते अध्यक्ष अरुण काकडे, नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, सचिव दीपक करंजीकर, कोषाध्यक्ष लता नार्वेकर, स्थानिक संमेलनाध्यक्ष वीणा लोकूर आणि माजी संमेलनाध्यक्ष व्यासपीठावर होते.

दिवंगत अभिनेते आत्माराम भेंडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शरद पवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून तसेच नटराज आणि शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचे पूजन करून संमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले.

रंगभूमीच्या विविध प्रवाहांचा आढावा घेतानाच फैयाज यांनी रंगभूमीच्या भवितव्याबद्दलचाही विचार मांडला. त्या म्हणाल्या, ''आठ ते १५ वयोगटातील मुलांना टीव्हीतून बाहेर काढायचे असल्यास त्यांना रंगभूमीकडे वळवले पाहिजे. तरच बालरंगभूमीची चळवळ उंची गाठेल.''

'प्रायोगिक रंगभूमीविषयी आपण आशावादी आहोत. जुन्या संगीत नाटकांचे संक्षिप्त रूपात सादरीकरण झाले पाहिजे. संगीत रंगभूमीवरचे

संगीत हा वेगळा फॉर्म आहे. आजच्या अभिनेत्यांनी नाट्यसंगीत काय आहे हे समजून घ्यायला पाहिजे,' असा सल्लाही फैयाज यांनी दिला.

नाटक हा मनाला समाधान देणारा प्रकार असल्याचे सांगून पवार म्हणाले, 'नाटक मोठ्या शहरांतून तालुक्यांच्या गावी जाणे आवश्यक आहे. संगीत रंगभूमीला जिवंत ठेवण्याचे आव्हान फैयाज पेलतील. मात्र रंगभूमी जिवंत कशी ठेवायची हा प्रश्न आहे. तरुण पिढीला जुनी नाटके दाखवणे गरजेचे आहे.'

अशोक याळगी यांनी संपादित केलेल्या 'वंशकुसुम' या स्मरणिकेचे आणि ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांच्या 'नटरंगी रंगलो' या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले. बेळगावातील नाट्यपरंपरेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संस्थांनी सढळ हाताने मदत करावी, अशी अपेक्षा स्वागताध्यक्ष साठे यांनी व्यक्त केली. 'दिल्लीत पूर्वी होणारा नाट्यमहोत्सव यंदापासून पुन्हा सुरू होईल,' असे मावळते अध्यक्ष अरुण काकडे म्हणाले.

बेळगावशी सीमाप्रश्न जोडला गेलेला आहे. साहजिकच येथे होणाऱ्या नाट्य संमेलनात सीमावादाविषयी काही ठोस घडणे अपेक्षित होते. त्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांचा दबावही होता. मात्र, संमलेनाध्यक्ष फैयाज, उद्घाटक शरद पवार यांच्यापैकी कोणीही सीमाप्रश्नाविषयी एक शब्दही उच्चारला नाही.

## 'अडगळ'चे प्रकाशन

'साहित्याला चौकटीत बंदिस्त करता येत नाही. ती एका प्रतिभेची अभिव्यक्ती असते,' असे मत ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी मांडले. दिलीपराज प्रकाशनाच्या वतीने कौशिक नगरकर यांनी लिहिलेल्या 'अडगळ' या पुस्तकाचे प्रकाशन सारडा यांच्या हस्ते नुकतेच झाले.


साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, डॉ. मंदार परांजपे, राजीव बर्वे, मंदाकिनी नगरकर आदी या वेळी उपस्थित होते. रवींद्र खरे यांनी सूत्रसंचालन केले. कविता, प्रवासवर्णन गझल, खगोल, विज्ञान असे विविध विषय या पुस्तकात समाविष्ट आहेत. त्यामुळे त्याचा वेगळाच आकृतिबंध तयार झाला आहे, असे वैद्य यांनी सांगितले. नगरकर गेली २४ वर्षे अमेरिकेत राहत आहेत.

**आगामी**

# जिच्या हाती पाळण्याची दोरी...

मूळ लेखक
स्टेफनी हर्श आणि हॅना सेलिग्सन

अनुवाद
सुनीति काणे




'आई' असो किंवा 'ममा', 'मदर' असो मुलांच्या जडणघडणीत तिचा वाटा महत्त्वाचा असतो. मग आयुष्यात यशस्वी झालेल्या, असामान्य व्यक्तिमत्त्वांना त्यांच्या मातांनी कसं घडवलं असेल, असा प्रश्न पडणं साहजिक आहे.

हे लक्षात घेऊन तयार केलेलं हे पुस्तक मुलांच्या संगोपनाबद्दल तुमच्या मनात असलेल्या प्रश्नांची उत्तर शोधण्यासाठी तुम्हाला दिशा देईल. यातल्या मुलाखतींमध्ये सांगितलेले काही अनुभव, गोष्टी तुमच्या अंत:करणाला भिडतील, तर काही तुमच्या विचारांना चालना देतील, काही तुम्हाला वेगळाच मार्ग दाखवतील. यात तुम्हाला पालकत्वाची सुज्ञ मौक्तिकं सापडतील, हे नक्की!

## फैयाज यांची मुलाखत

गेल्या पन्नास वर्षांतील रंगभूमीवरील आठवणी आणि किस्से... नकला.. अशा मनमोकळ्या वातावरणात संमेलनाध्यक्ष फैयाज यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन नाट्यप्रेमींना घडले.

बेळगाव नाट्यसंमेलनाचे उद्‌घाटन झाल्यानंतर दुपारच्या सत्रात निवेदक सुधीर गाडगीळ यांच्यासह नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर, अभिनेते गिरीश ओक, अशोक कुलकर्णी आणि आसावरी भोकरे यांनी फैयाज यांच्याशी संवाद साधला. या मुलाखतीत फैय्याज यांनी शब्दसुरांची मैफल रंगवत उपस्थितांची मने जिंकली. भारद्वाज प्रकाशनाच्या वतीने श्रीराम रानडे यांनी लिहिलेल्या 'कालमुद्रा मराठी नाट्यसृष्टीची' या पुस्तकाचे प्रकाशन मावळते संमेलनाध्यक्ष अरुण काकडे यांच्या हस्ते झाले. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकापासून रंगभूमीवरील वाटचाल सुरू झाली. पं. वसंतराव देशपांडे, पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेता आले. पं. रविशंकर, गयिका बेगम अख्तर अशा दिग्गजांनी 'कट्यार' पाहिले. याच नाटकामुळे सी. रामचंद्र यांच्याकडे पार्श्वगायनाची संधी मिळाली. लहान असताना जब्बार पटेल यांच्यासमवेत 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात भूमिका केली, मात्र पुढे नाटक-चित्रपटांत त्यांच्याबरोबर काम करण्याचा योग आला नाही, असे त्या म्हणाल्या. विक्रम गोखले यांच्यामुळे अभिनयात फरक पडल्याचा उल्लेख त्यांनी केला. बऱ्याच नाटकांतील भूमिका रिप्लेसमेंट म्हणून केल्या, मात्र त्या आपल्या पद्धतीने साकारल्या असे फैयाज म्हणाल्या.

मुलाखतीदरम्यान त्यांनी पं. वसंतराव देशपांडे, दादा कोंडके, प्रभाकर पणशीकर, पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या नकलाही करून दाखवल्या. तसेच लागी कलेजवा कटार, पिकल्या पानाला हिरवी गोडी, अनाथ प्रीती अशी नाट्यपदे, आज जाने की जिद ना करो ही गझल, विच्छा माझी पुरी करा या नाटकातील पाडाला पिकलाय आंबा ही लावणी सादर करून रसिकांची दाद मिळवली.

''मुंबईत आले तेव्हा रत्नाकर मतकरी, विजया मेहता आदींची प्रायोगिक नाटके सुरू होती. ती नाटके काम करण्यासाठी खुणावत होती. मात्र, आर्थिक कारणांमुळे व्यावसायिक रंगभूमीवर काम करत राहणे भाग पडले. त्यामुळे प्रायोगिक नाटक करता आले नाही,'' असेही फैयाज यांनी सांगितले.

## मोडी लिपीमध्ये 'श्री गजानन विजय' ग्रंथ

निवृत्तीनंतर मोडी लिपी शिकण्याचा ध्यास घेतलेले विलास जोगदेव हे केवळ लिपी शिकूनच थांबले नाहीत, तर त्यांनी 'श्री गजानन विजय' हा ग्रंथ मोडीमध्ये लिहून तो शेगाव येथील गजाननमहाराजांच्या चरणी अर्पण केला.

''लहानपणापासून वडिलांच्या ट्रंकेतील मोडी लिपीमध्ये असलेल्या कागदपत्रांचे मला आकर्षण होते. कधीतरी आपण ही लिपी शिकायची असे तेव्हा मी मनोमनी ठरविले होते. मात्र टाटा मोटर्समधील तीन पाळ्यांतील नोकरी आणि प्रापंचिक जबाबदारी सांभाळताना मोडी शिकायचे राहूनच गेले. निवृत्तीची वेळ जवळ आली तशी मोडी शिकण्याच्या इच्छेने उचल खाल्ली. भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मंदार लवाटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोडी लिपीचे धडे गिरविले. मग 'श्री गजानन विजय' ग्रंथ मोडीमध्ये लिहिण्यास सुरुवात केली. रोज पहाटे उठून दोन-तीन तास ही साधना करीत दोन वर्षांत ३६६८ ओव्या असलेल्या या ग्रंथाचे मोडीमध्ये लिप्यंतर झाले. शेगाव येथे जाऊन पोथी स्वरूपातील हा ग्रंथ गजाननमहाराजांच्या चरणी अर्पण केला. एवढ्यावरच न थांबता आता 'संक्षिप्त श्री गुरुचरित्र', 'हनुमान चालिसा' (हिंदीतून मोडीत) 'श्री गुरुगीता' (संस्कृतमधून मोडीमध्ये) अशा छोट्या पोथ्या लिहून झाल्या असल्याचे जोगदेव यांनी सांगितले.

## मराठीच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना

मराठी भाषेच्या विकासास योगदान देणे, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणे आणि विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देणे अशा महत्त्वपूर्ण मुद्यांबाबत पुणे विद्यापीठातील मराठी विभागाच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात निर्णय घेण्यात आला. या निमित्ताने माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्याचाही निश्चय करण्यात आला.

पत्रकार अरुण खोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी पत्रकार महावीर जोंधळे, विभाग प्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर, डॉ. मनोहर जाधव, डॉ. अविनाश अवलगावकर, डॉ. विद्यागौरी टिळक व माजी विद्यार्थी मेळाव्याचे समन्वयक डॉ. प्रभाकर देसाई उपस्थित होते.

## ऑक्सफर्डच्या नव्या आवृत्तीत 'खिमा' आणि 'पापड'

ऑक्सफर्डच्या इंग्रजी शब्दकोशात नऊशेहून अधिक शब्दांचा

अंतर्भाव करण्यात आला असून, त्यात भारतीय खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य घटक असलेल्या पापड आणि खिमा या दोन शब्दांना मानाचे स्थान मिळाले आहे.

ऑक्सफर्डच्या इंग्रजी शब्दकोशाच्या नव्या आवृत्तीमध्ये एकूण ९००नवे शब्द आहेत. त्या शब्दांपैकी २४० शब्द भारतीय आहेत. त्यातही ६० टक्क्यांहून अधिक शब्द हिंदी भाषेतील आहेत. त्यामध्ये कर्रकुर्रम अशा पापडाचा आणि मटण चॉप करून तयार होणाऱ्या स्वादिष्ट खिम्याचा समावेश आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे फोडणीला टाकल्या जाणाऱ्या आणि आयुर्वेदात औषधी म्हणून गौरविलेल्या कडीपत्त्याचा म्हणजेच 'करी लीफ'चा समावेशही या शब्दकोशात करण्यात आला आहे.

''इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. त्यामुळे साहजिकच तिच्यात जगभरातील विविध संस्कृती, देश आणि परंपरेतील शब्दांचा अंतर्भाव होत असतो. त्यामुळेच ही भाषा अधिकाधिक सर्वसमावेशक होते. भारतीय खाद्यसंस्कृतीचे चाहते जगभर आहेत. त्यामुळेच या शब्दांचा समावेश आम्ही शब्दकोशासाठी केला आहे,'' अशी माहिती ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे पदाधिकारी पॅट्रिक व्हाइट यांनी दिली.

## बालकुमार साहित्य संमेलन

ढोल पथक, लेझीम पथक, वारकरी पथकासह पारंपरिक वेशभूषेत काढलेली ग्रंथदिंडी... विज्ञानकट्टा, जादूचे प्रयोग, विंदा करंदीकर यांच्या कवितांवरचे धमाल नाटक... कविता, गोष्टी, पुस्तके, साहित्यिकांची उपस्थिती... अशा वातावरणाने हिंजवडी जवळील मारुंजी गावाची दोन दिवस साहित्यनगरी झाली होती.

निमित्त होते उर्मी संस्था व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संमेलनाचे. दोन दिवस चाललेल्या या साहित्य संमेलनाला बालकुमारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संमेलनाध्यक्षा डॉ. संगीता बर्वे, मावळते संमेलनाध्यक्ष राजीव तांबे, उर्मी संस्थेच्या अध्यक्षा रेश्मा शेंडे, बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यवाह सुनील महाजन, कार्याध्यक्ष बवीन जिंदल, कोषाध्यक्ष अनिल कुलकर्णी, स्वागताध्यक्ष ज्ञानेश्वर भूमकर, मारुंजीच्या सरपंच हेमंती कांबळे,उपसरपंच गणपत जगताप आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बर्वे यांनी पूर्वीच्या आणि आताच्या शाळांत

झालेला बदल 'असे घडलो आम्ही' या आपल्या कवितेतून सादर केला. मारुंजी गावच्या माळरानावर संमेलनाच्या निमित्ताने साहित्याचा ताटवा फुलला आहे, असे जोशी यांनी सांगितले. 'आपल्या घरचे हॉटेल, चित्रपटगृह करू नका. जादूगार मुकुंदकुमार यांचे जादूचे प्रयोग, अशोक रुपनर, शिवाजी माने यांचा 'आयुका विज्ञान कट्टा' अशा कार्यक्रमांना बालकुमारांनी दाद दिली. टाकावू वस्तूंपासून शास्त्रीय उपकरणे कशी तयार करावी याची प्रात्यक्षिके झाली. कागदापासून अनेक शोभेच्या व दैनंदिन वापरातील वस्तू बनविण्याच्या ओरिगामी कलेचे प्रात्यक्षिक मिलिंद केळकर यांनी दाखवीत मुलांकडून वस्तू करवून घेतल्या.

'मातृभाषेवर प्रेम करून महाराष्ट्राचे नाव देशात उज्ज्वल करा. त्यासाठी खूप अभ्यास करा. भरपूर खेळा अन् टीव्ही पाहण्यात वेळ घालविण्यापेक्षा चांगली झोपही घ्या.' असा सल्ला डॉ. माधवी वैद्य यांनी संमेलनाच्या समारोपप्रसंगी दिला. याप्रसंगी संमेलनाच्या अध्यक्ष कवयित्री डॉ. संगीता बर्वे, माजी खासदार विदुरा नवले, प्रकाश पायगुडे, सरोजा टोळे, सुनील महाजन, अनिल कुलकर्णी, स्वागताध्यक्ष रेश्मा शेंडे, हिंजवडीचे सरपंच श्यामराव हुलावळे, मारुंजीच्या सरपंच हेमंती कांबळे आदी उपस्थित होते.

## साहित्य कृषी दिंडी

पंजाबमधील घुमान येथे आयोजित साहित्य संमेलनाच्या निमित्ताने 'मसाप' शाखा मोडनिंब आणि शेतकरी इर्जिक परिषद महाराष्ट्र यांच्या वतीने साहित्य कृषी दिंडी काढण्यात येणार आहे. दिंडीच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या आत्महत्या, स्त्रीभ्रूण हत्या, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, ग्रामस्वच्छता यासारख्या प्रश्नांवर कविसंमेलन, भारुड, पथनाट्य, कथाकथन, परिसंवाद, प्रवचन या माध्यमातून जनजागरण होणार असल्याची माहिती दिंडीचे आयोजक कवी नारायण सुमंत यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील अरण हे गाव संत सावता माळी यांच्या संजीवन समाधीसाठी ओळखले जाते. सुमारे २५०० किलोमीटरचा प्रवास करून ही दिंडी दोन एप्रिल रोजी घुमान येथे संमेलनस्थळी पोचणार आहे.

अरण, पंढरपूर, अहमदनगर, औरंगाबाद, जळगाव, इंदौर, उज्जैन, ग्वाल्हेर, मथुरा, दिल्ली, चंडीगड, अमृतसर आणि घुमान असा या दिंडीचा

मार्ग असणार आहे. लेखक, कलावंत, वादक, गायक, प्रगतिशील शेतकरी, कृषिभूषण, कृषितज्ज्ञ यांचा सक्रिय सहभाग असणार आहे.

## ‘सर्जनशीलतेला हवी वाचन व सरावाची जोड’

‘आपल्या विचारांतील कल्पना लेखनात उत्तम पद्धतीने मांडता आल्या पाहिजेत. चौफेर वाचन व योग्य सराव यांची जोड सर्जनशीलतेला मिळाल्यास उत्कृष्ट लेखन निर्माण होते,’ असे मत प्रा. बिल हर्बर्ट यांनी ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीच्या वतीने नुकत्याच झालेल्या क्रिएटिव्ह रायटिंग कार्यशाळेत व्यक्त केले. ‘भाषेतील सांगीतिक कल्पनांची काव्यात्मक रचना करताना कविता होते. जगाकडे एक चित्र म्हणून पाहात असताना त्याविषयी अधिक उमज होणे आवश्यक आहे. काव्य संपत चालल्याची चर्चा केली जाते, मात्र काव्य ही मूलभूत मानवी क्रिया आहे. सोशल मीडियामुळे काव्य नव्या सीमा ओलांडेल, असेही त्यांनी सांगितले.

## दलितांची परंपरा एकलव्यापासूनची

‘‘हजारो वर्षे अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या समाजाला आत्मभानाचा प्रकाश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. उपेक्षित समाजाच्या ठायी स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करून अन्यायाचा निर्धाराने प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निर्माण करणाऱ्या दलितांची परंपरा ही शूद्र एकलव्यापासूनची आहे,’’ असे मत प्रख्यात अर्थतज्ज्ञ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी भारती विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे आयोजित ‘उपेक्षितता आणि भारतीय इंग्रजी साहित्य’ या विषयावरील परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमास हैद्राबादच्या इंग्लिश ॲण्ड फॉरेन लॅंग्वेज युनिव्हर्सिटीच्या माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित-नानकर, कॅनडातील मानटोबा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. विलकिनसन लोरी, प्राचार्य, डॉ. के.डी. जाधव, डॉ. आर. एम. झिंगरे, डॉ. विवेक रणखांबे, डॉ. अशोक थोरात, डॉ. मुक्तजा मठकरी आदी उपस्थित होते.

## कादंबरीतून उलगडणारा ‘बॅरिस्टर ते गांधीभाई’ टप्पा

‘हिंसेच्या जोरावर हिंदूराष्ट्राची स्वप्ने पाहणाऱ्या मोदी सरकारमुळे गांधीवाद्यांच्या अग्निपरीक्षेचा काळ आला आहे. या परीक्षेत मोदींच्या तेजाला

आव्हान देत गांधीजींच्या तत्त्वांना जे पुढे नेऊ शकतील, असे गांधीवादी टिकतील आणि इतर मागे पडतील,' असे मत डॉ. कुमार सप्तर्षी यांनी व्यक्त केले.

महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून आले, या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत यानिमित्त प्रफुल्लता प्रकाशनने 'पहिला गिरमिटिया' या अनुवादित कादंबरीचे प्रकाशन केले. ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते तुषार गांधी, गोव्यातील पिसफल्लू सोसायटीचे कुमार कलाचंद मणी, पुस्तकाचे अनुवादक पांडुरंग कापडणीस, अन्वर राजन आणि प्रकाशनचे श्रीपाद सपकाळ उपस्थित होते.

''महात्मा गांधी अनेकांना माहिती आहेत, पण त्यांना 'बॅरिस्टर ते गांधीभाई' या भूमिकेत जाणून घेण्यासाठी हे पुस्तक महत्त्वाचे आहे. मनुष्य स्वभावानुसार अनेक कमतरता असलेली व्यक्ती लोकांचे नेतृत्व कसे करते, जगासमोर अहिंसेचा आदर्श कसा निर्माण करते, हे जाणून घेण्यासाठी गांधीजींची दक्षिण आफ्रिकेतील वाटचाल जाणून घेतली पाहिजे,'' असे तुषार गांधी यांनी म्हटले.

''आतापर्यंत गांधीवादी कर्मकांडात गुंतले होते. आता त्यांची अग्निपरीक्षा सुरू झाली आहे. काँग्रेसने गांधींना सोडले आहे. राज्यकर्त्यांमध्ये विरोधाभास दिसत आहे. मोदी सरकार आणि हिंदुत्ववादी संघटनांतर्फे देशभरात हिंदूराष्ट्र निर्माण करण्याची धडपड सुरू आहे. अशा परिस्थितीत गांधीजींचे विचार पुढे नेण्याचे आव्हान गांधीवाद्यांसमोर आहे,''असे स्पष्ट करून सप्तर्षी यांनी एकूणच राजकीय आणि सामाजिक समस्यांचा आढावा घेतला.

## इंग्रजी विरुद्ध प्रादेशिक

भालचंद्र नेमाडे यांनी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित झाल्याच्या संध्याकाळीच आपल्या लौकिकाला जागून बॉम्बगोळा फोडला आणि त्याचे पडसाद यावेळी महाराष्ट्रापुरताच न राहता देशभर उमटले. ज्या सलमान रश्दी यांना नेमाडे यांनी लक्ष्य केले त्यांनी तत्परतेने ट्विटरवरून नेमाडेंना असभ्य शिवी हासडली. रश्दी महाशयांनी इतक्या तत्परतेने एका मराठी लेखकाची दखल घेण्याचे कारण त्याला मिळालेला ज्ञानपीठ हा भारतातील सर्वोच्च साहित्य पुरस्कार हेच होय. अन्यथा भारतीय प्रादेशिक भाषांतले साहित्य न वाचताच बिनमहत्त्वाचे आणि अदखलपात्र असल्याचा साक्षात्कार त्यांना

पूर्वीच झाला होता व १९९७ साली त्यांनी संपादित केलेल्या 'मिरर वर्क्स' या पुस्तकात भारतीय इंग्रजी लेखन येथील प्रादेशिक साहित्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा देऊन ठेवला होता. या पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या भारतीय इंग्रजी लेखकांच्या निवडक साहित्यात रश्दी महाशयांनी स्वत:ची कथाही छापली होती. म्हणजे ते स्वत:स भारतीय लेखक मानत होते. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील भारतीयपण उपरे आहे, अशी मल्लिनाथी नेमाडे यांनी केली तेव्हा रश्दींवर भारतीयत्व लादण्याचा अगोचरपणा त्यांचा नव्हता तर स्वत: रश्दी यांचाच होता. आतादेखील या दोन मोठ्या लेखकांच्या शेरेबाजीमागे भारतीय प्रादेशिक साहित्य विरुद्ध भारतीय इंग्रजी साहित्य हा जुना वादच दडलेला आहे. पूर्वी आर. के. नारायण, कमला दास, राजा राव, मनोहर माळगावकर असे मोजके भारतीय लेखक इंग्रजीतून लिहित असत. पण पुढे इंग्रजी भाषेला जगभर बाजारमूल्य प्राप्त झाल्यावर इंग्रजीतून शिकणाऱ्यांची आणि पुढे लिहिणाऱ्यांचीही संख्या वाढली. देशात विविध ठिकाणी होऊ लागलेले लिट फेस्ट, मॅन बुकर सारखे परदेशी पुरस्कार यांमुळे भारतीय इंग्रजी लेखनाची विशेष दखल घेतली जाऊ लागली. विक्रम सेठ अमिताव घोष, सुकेतू मेहता, रोहिंग्टन मिस्त्री, अरुंधती रॉय, अनिता देसाई, झुंपा लाहिरी वगैरे नव्या भारतीय इंग्रजी लेखकांचा दबदबा निर्माण झाला.

## इंटरनेटला वाली कोण?

इंटरनेटचे दैनंदिन कार्य सुरळीत चालू राहण्यासाठी आवश्यक देखभाल व व्यवस्थापन करण्याचे काम आयकॉन (इंटरनेट कॉर्पोरेशन फॉर असाइन्ड नेम्स अँड नंबर्स) ही अमेरिकन संस्था पाहाते. आता अमेरिकेऐवजी सर्व देशांचे प्रतिनिधी असलेल्या एका संस्थेतर्फे हस्तांतरणाचे काम करावे. असा सल्ला 'आयकॉन'चे अध्यक्ष फॅडी चेहेड दिला आहे.

या हस्तांतरणासाठी या वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत ठरवण्यात आली आहे; मात्र काही घटकांकडून जाणीवपूर्वक या प्रक्रियेबाबत विलंब केला जात आहे असेही त्यांनी सांगितले. नुकतीच यासंबंधी सिंगापूर येथे चार दिवसांची जागतिक परिषद आयोजित करण्यात आली होती. इंटरनेटच्या डोमेनची नावे, तसेच ऑनलाइन अॅड्रेसचे कोड यांवर नियंत्रण करण्याचे काम १९९८ पासून आयकॅन करत आहे. या संस्थेबाबतचा करार या वर्षी सप्टेंबर

महिन्यात पूर्ण होत आहे. कॅनडा आणि रशिया या देशांनी ‘आयकॅन’चे नियंत्रण करणारी संस्था ही पूर्णत: देशोदेशीच्या प्रतिनिधींची असावी, असा प्रस्ताव ठेवला आहे; मात्र यामुळे या संस्थेचा वापर हा लहान देशांवर दबाव निर्माण निर्माण करण्यासाठी केला जाऊ शकतो, अमेरिकेतील काही सरकारी प्रतिनिधींचा तर या हस्तांतरणासच विरोध आहे, ‘आयकॅन’चे नियंत्रण अमेरिकेव्यतिरिक्त अन्य कोणी केल्यामुळे राष्ट्रीय हितास धक्का पोहचू शकतो अशी शंका प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.


जागतिक स्तरावर इंटरनेटशी संबंधित समूहांपैकी ज्यांचे हितसंबंध या नियंत्रण प्रक्रियेशी जोडले गेले आहेत, त्यांच्याकडून या प्रक्रियेला विलंब केला जात असल्याचे चेहेड यांनी नमूद केले; मात्र वेळीच यासंबंधी तोडगा न निघाल्यास इंटरनेटच्या व्यवस्थापनाविषयाची पेच निर्माण होऊ शकतो.


**आगामी**

## मृत्यायुषी

ओशो

अनुवाद
स्वाती चांदोरकर




शरीर आणि चेतना यांचा वियोग म्हणजे मृत्यू.
निर्वाणाचा अर्थ आहे, दोन सत्यांची जाण! ज्याला आम्ही मृत्यू म्हणतो. तो मृत्यू नाही आणि त्याला जीवन म्हणतो, ते म्हणजे जीवन नाही.
जो साधू निर्णय न घेता साधू झाला, त्याच्या तुलनेत निर्णयपूर्वक चोर हा श्रेष्ठ आहे, त्याची जीवनस्थिती श्रेष्ठ आहे, कारण निर्णय त्याचा कॉन्शन्स वाढवतो. त्याच्या व्यक्तित्वाला वजन देतो. त्याची जबाबदारी वाढवतो. तो निर्णय त्याचं दायित्व बनतं. आणि स्वत:ने निर्णय घेतल्यामुळे एक संकल्प निर्माण होतो. संकल्प निर्माण झाल्यामुळे चेतना जागृत होते...

## Ban English, says Jnanpith winner Nemade

On a day he was declared winner of the 2014 Jnanpith award, India's highest literary honour, Marathi writer Bhalchandra Nemade described English as a " killer language" and calling for its banning from the field of education in India. He also sharply criticized two Indian-origin writers, V S Naipaul and Salman Rushdie, for "pandering to the West" and dismissed their works as being of little value.

"Primary as well as secondary education should be in the mother tongue. What is so great about English? There isn't a single epic in the language. We have 10 epics within the Mahabharata itself. Don't make English compulsory; make its elimination compulsory," Nemade (77), who himself has been a teacher of English and comparative literature at various universities including the School of Oriental and African Studies in London, said. He was speaking at a function in Dadar organized by the Matrubhasha Samvardhan Sabha.

Nemade is only the fourth Marathi writer to win the award, after V S Khandekar (1974), V V Shirwadkar aka Kusumagraj (1987) and Vinda Karandikar (2003).

Espousing his pet theory of 'Deshivaad' (nativism) that rejects globalization, the writer of the 1963 novel Kosla, which is considered one of the seminal works of 20th century Marathi literature, said English had destroyed languages. "In North America, there were 187 languages 150 years ago. Now just 37 remain. Australia had 300 languages; only 65 remain, and of five languages in the UK, only Irish has survived alongside English," Nemade excoriated Naipaul and Rushdie in particular. "When Naipaul came to India, he saw an area of darkness. Then he saw a wounded civilization and blamed Islamic rule for the wounds and not the British because he was staying in England.

★

**आगामी**

# निर्व्याज प्रेम

मूळ लेखक
अॅन नेमार्क

अनुवाद
आनंद वैद्य




त्या सोनेरी केसांच्या पिटुकल्या गाठोड्यांकडे जॉयने टक लावून पाहिलं. त्यांच्या इवल्याशा नाकांना स्पर्श केला. त्यांच्या डोळ्यांवर असलेल्या पातळ आवरणाकडे बारकाईने पाहिलं. तिला वाटलं, 'या सिंहाच्या पिल्लांना आपण पाळलं, तर पहिल्यांदा डोळे उघडल्यावर ते मलाच आई समजतील.'

माणसाने वाढवलेली ही पिल्लं जंगलात जिवंत राहण्यासाठी अयोग्य ठरतील, हे तिला ठाऊक होतं. 'पण निदान आपण त्यांचा जीव तरी वाचवू', असा विचार तिने केला.

आपली मुलं गमावलेल्या जॉयला मोटारीतील त्या एकमेकांना बिलगणाऱ्या, बारीक लव असलेल्या, पोरक्या पिल्लांविषयी जिव्हाळा वाटू लागला.

ती हसत म्हणाली, ''आपण त्यांना आत आणू या!''




# मराठवाड्यातील स्त्रीलेखिकांचे योगदान

**६ वे मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन जालना येथे दि. १७-१८ जानेवारी २०१५ रोजी संपन्न झाले. त्याच्या अध्यक्षपदी डॉ. छाया महाजन या होत्या. त्यांच्या अध्यक्षीय भाषणातील काही भाग इथे देत आहेत.**

स्त्री स्वातंत्र्याचा विचार करताना एक गृहीतक असते ते म्हणजे स्त्री विरुद्ध पुरुष. पण खरे तर ते तत्त्व स्त्री विरुद्ध सत्ता असे आहे. सत्ता मिळवणे आणि मिळवलेली सत्ता टिकवणे ही माणसाची नैसर्गिक वृत्ती असली तरी तिच्यात अन्यायाखाली दबणारे असणारच. ती सत्ता महिलांकडेही कोणे एके काळी होती. नंतर पुरुषांकडे आली आणि सोयीने धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक बदल त्यांनी केले. ते नैसर्गिक होते म्हणून योग्य होतेच असे नाही, ही मानसिकता ठसली गेली. ती मानसिकता बदलण्याचा भाग आहे. आधीच्या काळात स्त्रियांची भूमिका सहन करण्याची आणि सामंजस्याचीच होती. म्हणून बहिणाबाई 'स्त्रियेचे शरीर, पराधीन देह. यावर उपाय विरक्तीचाही नाही' असे सांगतात. तर 'वृक्षवल्ली'चे एकमेकांवर अवलंबून असणे असे अनेक संत सांगतात. पण जेव्हा अन्याय, शोषण, छळ, शारीरिक अत्याचार गुलामासारखे व्हायला लागतात तेव्हा बंड होते. ते स्त्रियांनी केले आहे. केलेल्या प्रत्येक अपरिमित कष्टाची, शरीर शोषणाची, मानसिक घुसमट, छळाची, गुरासारख्या दिल्या गेलेल्या वागणुकीची आठवण उफाळून व्यक्त होते आहे. अजूनही होतेय, आता त्याहीपेक्षा सखोल माणूसपणाचा आणि अस्तित्वाचा विचार साहित्यातून डोकावतोय आणि आपल्या क्रोमोसोममधल्या (गुणसूत्रातल्या) स्त्रीत्वाच्या शृंखलांचा नाश कसा करायचा असा मूलभूत विचार सुरू झालाय.

मराठवाड्यातील लेखिकांचे मराठी साहित्यातील योगदान काय, हा

प्रश्न त्यांच्या जन्म किंवा कर्मभूमीच्या संदर्भात समोर आणला जातो.

मध्ययुगीन काळात सत्तेचे केंद्र देवगिरी हे होते. भाषेचा विकास हा राजसत्ता आणि अर्थसत्ता यांनी प्रभावीत होत असतो ही गोष्ट इथेही लागू पडते.

बाराव्या तेराव्या शतकापर्यंत मराठवाड्यात उत्तम साहित्य निर्मिती झालेली दिसते. या सुमारास ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, गोरा कुंभार इ. प्रसिद्ध वारकरी संप्रदायातल्या कवींबरोबर पंडित कवीही होते.

या काळात जीवनाच्या प्रेरणा या पारलौकिक असल्याने भक्ती हाच स्थायीभाव होता. भक्तिमार्गाने परमेश्वरापर्यंत जाऊन मुक्तीची वाट शोधली जात होती. ''तृप्ती आणि मुक्ती या भिन्न नव्हेत,'' या रामकृष्ण परमहंसांच्या वचनाप्रमाणे तो तृप्तीचा मार्ग होता. या काळात संत कवयित्री नाथ, महानुभाव व वारकरी संप्रदायाशी संबंधित होत्या. त्यांच्या साहित्यात व्यक्तिगत आयुष्य आणि स्त्रीजाणिवांचे दर्शन घडते. महानुभाव पंथातील महदंबा ही आद्य कवयित्री मानली जाते. ती पंडित परंपरेशी निगडित होती. तिने लिहिलेले धवळे, रुक्मिणी स्वयंवर, गर्भकांड, ओव्या इत्यादी रचना प्रसिद्ध आहेत. त्यानंतर नाईकबाईच्या कृष्णदर्शनाची व्याकुळता ओव्यात आली आहे. हिराईसा (नागदेवाच्या शिष्या, नाम महिमा वर्णनपर काव्य) गाईसा (१४ व्या शतकातल्या महानुभाव पंथातील ग्रंथकर्त्या, चार प्रमेये प्रसिद्ध) यांचे उल्लेख येतात. पण महदंबेचे नाव प्रामुख्याने येते. वारकरी सांप्रदायातली मधुर रचना करणारी कवयित्री मुक्ताबाई ही ज्ञानेश्वराची सर्वात लहान बहीण. वयोवृद्ध चांगदेवांसारख्या योगी तपस्व्याने तिचे शिष्यत्व घेतले त्यावरून तिचा आध्यात्मिक अधिकार समजतो. ती आध्यात्मिक अनुभूती जेव्हा काव्यात उतरते तेव्हा मोठमोठ्या विद्वानांना विचारात पाडते. 'वांझे पुत्र प्रसविला' सारखे अभंग त्याचे द्योतक आहेत.

'नामयाची दासी' म्हणून आध्यात्मिक बंधुत्वाचा मोठा मान मान्य करणारी जनाबाई कर्मयोगी आहे. सामान्य स्त्रीची झाडलोट, धुणं-भांडी अशी कामे करताना भावविश्वात ती पांडुरंगाला पाहते. 'विठोबा मला मूळ धाडा, माझा जीव झाला वेडा' अशी संवेदनशील हाक घालते तेव्हा हीच कर्मयोगी भक्तियोगात विरघळते. वारकरी पंथाची वाट 'आलीया जीवनासी' आनंदाने मान्य करून 'पक्षी जाय दिगंतरा, बालकासी आणी चारा' हे मातृत्वाने म्हणते तर डोईचा पदर आला खांद्यावर' असे बेभान होत स्त्री आचाराला झुगारायला

तयार होते. तिच्या नावावर ३५० अभंग, अनेक ओव्या व पाच आख्याने आहेत.

याशिवाय नामदेवाची आई गोणाई तसेच लाडाई, साखराई या त्यांच्या सुनांनीही अभंगरचना केल्याचे श्री. विद्यासागर पाटंगणकर सांगतात.

देवगाव रंगारीच्या बहिणाई या सामाजिक जाणिवा रुजवणाऱ्या संत तुकारामांच्या शिष्या. वज्रसूचिकोपनिषदाचा अभंगात्मक अनुवाद त्यांनी केला. त्याचा उपयोग म. फुलेंसारख्या अनेक समाजसुधारकांनी केला आहे.

वरील संत साहित्याचे योगदान पाहता समीक्षक, संशोधक लेखिकांना बरेच काही करता येईल.

मध्ययुगानंतर मधल्या काळात लेखन झालेले दिसत नाही. याचे कारण इस्लामिक सत्ता येथे स्थिरावली आणि निजामाच्या राजवटीचे दहशतीचे वातावरण जवळ जवळ २५० वर्षे होते. निजामाचे जनतेकडे लक्ष नव्हते. ही स्थिती उर्वरित भारत स्वतंत्र झाल्यावरही वर्षभरपर्यंत होती. त्या काळात लिखाण अत्यल्प झाले. पुढे इंग्रजी राजवटीत पश्चिम महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता असताना समाज सुधारणेच्या चळवळी व परिवर्तनाचा काळ सुरू झाला तरी निजामाच्या राजवटीत इकडे ते अशक्य होते. बुरखा व पडदा पद्धतीत स्त्री होती. पुरुषप्रधान संस्कृती होती. एकूण मराठवाडा दुष्काळी व मागसलेलाच होता. स्त्रियांमध्ये आपापसात स्नेहभाव नसल्याचे निशा वडगिरे नमूद करतात. १९४८ मध्ये हैदराबाद मुक्तिसंग्राम होऊन निजामाचे राज्य संपले. पण १९५६ पर्यंत म्हणजे राज्य पुनर्रचना होऊन मराठवाडा महाराष्ट्रात विलीन होई पर्यंत मराठवाड्याचे चित्र बदलले नाही.

१९३०-४०च्या दशकात काही लेखिकांचा उल्लेख सापडतो. हैदराबादचे डॉ. लेले यांच्या पत्नी लक्ष्मीबाई लेले यांच्या 'निरंजन' या काव्यसंग्रहाची आणि काही सुट्या कवितांची नोंद आहे. या कविता बाळबोध वळणाच्या आहेत. पती हा मित्ररूपातही असतो याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे. दुसऱ्या लक्ष्मीबाई टिळक. 'ऊन-सावली' हे स्वातंत्र्योत्तर प्रसिद्ध झालेले आत्मचरित्र त्यांनी लिहिलेय. या छोट्या पुस्तकात समकालीन हैदराबाद आणि निजामी राजवटीच्या समाजाचे चित्र दिसते. हे चित्र वास्तवाच्या अगदी जवळचे आहे. त्यानंतर उषा पगडींच्या कथा त्यांच्या 'सुवर्णमध्य' कथासंग्रहात आहेत. तरीही लेखिकांची संख्या बोटावर मोजण्याजोगी आहे. लता बोधनकर यांचा 'कर्पूर' हा काव्यसंग्रह, विमल

थत्ते, रत्नप्रभा शहाणे, प्रमिला भालेराव आणि माया सरदेसाई या कथालेखिकांचे संग्रह आहेत व काही स्वातंत्र्योत्तर काळात प्रसिद्ध झालेत. शांताबाई तडवी या समकालीन लेखिकेचे बालवाङ्मय आहे.

मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतरच स्त्री लेखनाचा काळ खऱ्या अर्थाने सुरू झाला असे म्हणावे लागेल. एरवी स्त्रीची निर्माणशक्ती ही रूढी-परंपरेच्या चौकटीतच भरतकाम, विणकामात उमटत होती. समाज सुधारणा, परिवर्तनाचा ध्यास आणि शिक्षणाच्या परिणामाने स्त्री लेखनाकडे वळली. विशेषत: शिक्षणाने तिला आत्मभान दिले. तसे अस्तित्वभानही दिले. आजूबाजूच्या वास्तवाकडे ती तुलनात्मक, विश्लेषणात्मक दृष्टीने पाहू लागली. १९७५ नंतरच्या काळात स्त्री लेखनात परिपक्वता दिसू लागली. मराठवाड्यातल्या लेखिका लेखनाचे अनेक प्रकार हाताळताना आज दिसताहेत त्याची ही पार्श्वभूमी.

यावेळी जगात स्त्री-पुरुष समानतेचा हुंकार उमटला. स्त्री मुक्तीची चळवळ फ्रान्समध्ये राजकीय मताधिकार मिळविण्यासाठी सुरू झाली आणि ती पुढे युरोपे-अमेरिकेमध्ये स्त्री हक्क चळवळीच्या रूपात पसरली. ती चळवळ भारतात यायला साठोत्तर साल उजाडले. मुहूर्तमेढ१९७५ साली झाली. त्यावरून स्त्रीवाद हे साहित्यातले समीक्षा तत्त्व नव्हे हे लक्षात घ्यायला हवे. ती बहुआयामी चळवळ आहे. यातून स्त्री विषयाचा स्वतंत्र विचार सुरू झाला आणि काही मुद्यांचा विचार पुढे आला. १) तिची सनातन प्रतिमा २) दर्जा व स्थान ३) कुटुंब व्यवस्थेत दिली गेलेली भूमिका ४) या भूमिकांचे उदात्तीकरण ५) व्यक्ती म्हणून तिची ओळख ६) समाजाचा जबाबदार घटक म्हणून क्रियाशीलता ७) निर्णय प्रक्रियेत सहभाग ८) असमानता.

आपल्या लेखिका या जगाच्या पातळीवर जाऊ इच्छित असताना काही फरक लक्षात घेतले पाहिजेत. पाश्चात्य स्त्री ही मोकळी, व्यक्तिस्वातंत्र्य असलेली, भूमिकेत न जखडलेली, शारीरिकदृष्ट्या सक्षम व लैंगिकतेशी पावित्र्य न जोडणाऱ्या देशातून आलेली होती. पण या तुलनेत भारतीय स्त्री दलिताहून दलित आहे.

कुठल्याही लेखकाचे वाङ्मयातील स्थान काळ ठरवतो. त्याच्या मूल्यमापनासाठी काही काळ जावा लागतो. पण इथे मूल्यमापन हा हेतू नाही.

आधुनिक काळात मराठवाड्यातील लेखिका जे योगदान देताहेत याची सुरुवात डॉ. सुहासिनी इर्लेकरांपासून झालेली दिसते.

पुढील काळात लेखिकांनी जे योगदान दिले आणि आपली नाममुद्रा उमटवली, त्याचा हा आढावा मी घेते आहे. ही समीक्षा नव्हे.

कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, आत्मचरित्र, विज्ञानकथा, चरित्र, लोकसाहित्य, लघुतमकथा, संगीत, बालवाङ्मय, भाषांतर किंवा स्वैरानुवादाच्या क्षेत्रात इथल्या लेखिकांचे योगदान आहे. उषा हस्तक, अनुराधा पाटील, अनुराधा वैद्य, रेखा बैजल, छाया महाजन, ललिता गादगे, मथू सावंत, सुनंदा गोरे, रसिका देशमुख, विद्या दिवाण, उर्मिला चाकूरकर, वृषाली किन्हाळकर, कंधारकर, अनेक लेखिकांना पुरस्काराने गौरवले गेले आहे. सगळी नावे इथे सांगणे शक्य नाही. त्यांनी राग मानू नये. कारण पुरस्कार हा त्यांचा गौरव आहेच.

लेखनाची सुरुवात बहुधा कविता लेखनाने होते. त्यामुळे कुठलाही साहित्य प्रकार हाताळला तरी मूळची संवेदनशीलता त्याला कारणीभूत ठरते.

मराठवाड्यातील कवयित्रींच्या व कथालेखिकांच्या लेखनातून स्त्री मनाचे कंगोरे दिसणे अपरिहार्य आहे. कुठेही असली तरी स्त्रीचे भावविश्व तिच्या कुटुंबाशी व घराशी जोडलेले आहे. परंपरागत वातावरणातच बहुसंख्य लेखिका वाढलेल्या. त्यामुळे नकळत ती संस्कृती व परंपरेशी बांधली गेलेली आहे. हे कविता तसेच कथांमधून ध्वनित होते. घर, कुटुंब, प्रेम देण्याची क्षमता, नात्यांचा पट हा तिचा मानस निसर्ग आहे. याच्या छटा काव्यात आणि कथेत पाहायला मिळतात. अनेक आघाड्यांवर समायोजन करताना होणारी कुतरओढ, घुसमट, दबलेपणाची चीड कवितेत येते. या कवयित्रींचा आता भावकवितेकडे अधिक कल आहे. क्वचित चारोळी व गझलही लिहिली जाते आहे. काळाबरोबर ही कविता अंतर्मुख होताना दिसतेय. निसर्ग कवितांमधून हे विशेषत्वाने जाणवते.

आत्माविष्काराच्या शोधाला प्राधान्य देणारी, अनेक पातळ्यांना स्पर्श करणारी कविता डॉ. सुहासिनी इर्लेकरांनी लिहिली आहे. त्याचबरोबर संतसाहित्याचे वाङ्मयीन कार्य यामध्ये संत कवयित्रींचे समीक्षणात्मक विश्लेषण त्यांनी केलेले आहे.

स्त्री जीवनाच्या सुख-दु:खांच्या कंगोऱ्यांना संवेदनशीलतेने स्पर्श करणारी कविता अनुराधा पाटील लिहिताहेत. त्यांच्या कवितांवर शोकात्म छटा दिसते. एकूण दु:खाच्या जवळ जाणाऱ्या कविता वाचकांच्या भावविश्वाशी सहज नाते जोडतात. अनेक कवयित्री ग्रामीण जीवनाचे चित्रण

करताना दिसताहेत. स्त्री जाणिवा कवयित्री जास्त प्रमाणात आणि जास्त सामर्थ्याने, प्रकट करताना दिसतात.

ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर, रसिका देशमुख, संजीवनी तडेगावकर, ऊर्मिला चाकूरकर, प्रिया धारूरकर, गीता लाडकर, रंजन कंधारकर, वैशाली दंडे, तृप्ती अंधारे, संध्या रंगारी या कवयित्रींनी अखिल भारतीय व्यासपीठांवरून कविता सादर करून प्रशंसा मिळवली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर रसिका देशमुख यांच्या सारख्यांना संधी मिळाली आहे.

सगळ्याच साहित्यविश्वाला जगण्याचे नवे संदर्भ आले आहेत. त्यामागे राजकीय, सामाजिक चळवळी व घडामोडी आहेत. अगदी थोड्या काळात अनेक परिवर्तनशील घटना घडताहेत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात की, ''भारतात अनेक युगे एकदम एकत्रित होऊन आली आहेत. त्यामुळे कुठलीही वेगळी चळवळ उमटून दिसत नाही. याचा एक परिणाम म्हणून एखाद्या दृष्टिकोनाचा विचार, विस्तार किंवा प्रचार होईतो दुसरी विचारधारा उंबऱ्यावर येऊन ठेपते. यात अनेक विचारसरणींची सरमिसळही होऊन त्यांचा प्रभाव साहित्यावर पडतो. उदा. मार्क्सवादी, स्त्रीवादी इ. हा ठसा सर्व आकृतिबंधात पाहावयास मिळतो. आज अनेक प्रथितयश व उदयोन्मुख कवयित्री लिहिताहेत. मराठवाड्यातील लोकसाहित्याचे संकलन, संपादन, विश्लेषण काही कवयित्रींनी केले. सिंधूताई भालेराव यांनी लोकगीते व स्त्रीगीते संकलित केली आहेत. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जाई मोगरा व राजस केवडा या ग्रंथात ही समाविष्ट झाली आहेत. तारा परांजपे व डॉ. शैला लोहिया यांचे लोकवाङ्मयातील कार्य व संशोधन उल्लेखनीय आहे. समाजसेवेच्या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांना या कार्यासाठी पोषक वातावरण मिळाले. ताराबाई परांजपेनी सीमावर्ती साहित्यात बरंच काम केलंय. शैला लोहियांचेही लोकसाहित्यावर काम आहे. संत साहित्यातून येणारे ग्रामीण कष्टकरी जीवनाचे दाखले हे 'आलिया भोगासी' म्हणून स्वीकारण्याचीच वृत्ती दिसते.

कविता या मुक्तछंदात जास्त लिहिल्या जातात. क्वचित अतिमुक्त होऊन गद्याकडे जाऊ पाहतात. स्त्री, तिचे जीवन व स्वातंत्र्य या परिघात जास्त फिरताना दिसतात.

कथा हा साहित्यप्रकार लेखिकांनी समृद्ध केला असे म्हणता येईल. तो सहजपणे हाताळताना त्या दिसताहेत, लघुकथा ही मनोरंजनात्मक व स्वरूप

घटनाप्रधान होते. अशा घटनाप्रधान कथांमधील व्यक्तिरेखा समर्थपणे रेखाटता येतात. व्यक्तिचित्रण व योग्य वातावरणातून कथेचा परिपोष होतो. अशा कथा लिहिल्या जाताहेत. मनोविश्लेषणात्मक कथाही आहेत. लेखिका या अनुभवकेंद्रात बंदिस्त न राहता स्वत:च्या कल्पना आणि भावना यातून बाहेर पडून मनोविश्लेषणात्मक कथांकडे वळल्या आहेत.

स्त्रीमुक्तीची संकल्पना शिक्षित समाजात काही प्रमाणात चांगली रुजली आहे. सांस्कृतिक भूमिका आणि बंधनातून बाहेर पडताना जे वैचारिक आणि मानसिक परिवर्तन होते, त्याचे चित्रण लिखाणात दिसते. तरीही संस्कृतीचा पगडा इतक्या सहजी उठणे शक्य नाही. वैचारिक चिंतनातून त्या चांगला आकार घेऊ शकतील. एकूण सामाजिक कथालेखनाकडे लेखिकांचा कल असला तरी मुख्यत्वाने स्त्रीच्या भावना, पीडा, कष्ट, वेदना, नात्यांचा परस्पर संबंध हे ललिता गादगे, अनुराधा वैद्य, सुनंदा गोरे यांच्या लेखनातून दिसते. कथा सरळ सांगितली गेली तरीही त्यातील प्रगल्भता, भाषाशैलीचे वेगळेपण जाणवते. अनुराधा वैद्य, छाया महाजन, रेखा बैजल, मथू सावंत, ललिता गादगे, वृंदा दिवाण, शैला लोहिया, सुनंदा गोरे, कुंदबाला खांडेकर, कमल गेडाम, कमल नलावडे, प्रभा पार्डीकर, सुषमा मुंजे, मीनाक्षी वैद्य अशी अनेक लेखिकांचा समावेश आहे. या कथालेखिका इतरही साहित्यप्रकार समर्थपणे हाताळताहेत.

एकूणच लघुतम कथा ते दीर्घकथा असा प्रवास मराठवाड्यातल्या लेखिकांनी पार केलाय असे दृश्य आहे. विज्ञानकथांमधून संशोधनातील गूढता, त्यातील ताणतणाव रेखा बैजल यांनी त्यांच्या ‘किडनॅपिंग’ मधून दाखवला आहे. लघुतम कथांचा आकृतिबंध छाया महाजनांनी कमीत कमी पण अचूक अर्थवाही शब्दासह ‘नकळत’ या संग्रहातून हाताळला आहे. तर मथू सावंतांनी ग्रामीण जीवनाचे चित्र आपल्या कथातून रेखाटले आहे. मथू सावंत, उषा जोशी यांच्या कादंबऱ्यांत ग्रामीण जीवन प्रामुख्याने आलेय. जवळजवळ सगळ्याच कथा, लेखिकांच्या लिखाणात व कवितांमध्ये ग्रामीण जीवनाचे संदर्भ येतात. विशेषत: स्त्रीचित्रणात ते जास्त स्पष्टपणे पुढे येतात.

या सगळ्या लेखिकांच्या मनोविश्लेषणात्मक व स्त्रीवादी कथाही प्रसिद्ध झाल्या आहेत. इथे सगळी नावे घेणे शक्य नसले तरी कथेच्या क्षेत्रात मराठवाडा आघाडीवर आहे असेच म्हणावे लागले.

कादंबरी हा प्रकार ही अनेक लेखिका हाताळताहेत. कादंबऱ्यांचे विषय

मुख्यत: कौटुंबिक, सामाजिक आहेत. यात नातेसंबंधाचे चित्रण आहे. त्यातली गुंतागुंत आणि ताणतणाव आहे. पौराणिक पार्श्वभूमीवरही कादंबरी लेखन झाले आहे. कथाविषय अनेक पातळ्यांवर नेण्याचा प्रयत्न काही लेखिका करताना दिसतात. काही स्वानुभवावर आधारित काल्पनिक कादंबऱ्या असल्यामुळे त्यांची भाषा सरळ, सोपी आणि निवेदनात्मक आहे. नवीन शैली, घाट किंवा तांत्रिकदृष्ट्या कुठलाही प्रयोग झालेला दिसत नाही. 'काव्यांबरी' ही गद्य-पद्य कादंबरी अनुराधा वैद्य यांनी लिहिली आहे. शिक्षणक्षेत्रावर छाया महाजन, स्त्रीमुक्ती प्रश्नावर रेखा बैजलांनी लिहिलय. इथे सगळ्यांचा उल्लेख करू शकत नाही.

शिक्षणक्षेत्राशी संबंधित अनेक स्त्रिया संशोधन करत आहेत. यात संत साहित्यावर डॉ. सुहासिनी इर्लेकर, लोकसाहित्याच्या क्षेत्रात अभ्यास केलेल्या तारा परांजपे, शैला लोहिया, कादंबरीवरील अभ्यासक आणि सातत्याने समीक्षणात्मक लेखन करणाऱ्या उषा हस्तक, डॉ. लता मोहरीर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. प्राचीन मराठी लेखनावर आणि संत साहित्यावरही बरेच लेखन झाले आहे. तौलनिक साहित्यावर लता मोहरीरांनी काम केले आहे. उषा हस्तक, चंद्रज्योती भंडारी, डॉ. मीरा धांडगे, अरुणा लोखंडे, कांचन पाडगावकर, प्रतिमा जोशी, शुभदा धारूरकर, मंगला वैष्णव याही समीक्षेच्या भूमिकेतून साहित्याचा वैचारिक वेध घेत आहेत. पण बरेच काम विद्यापीठीय पातळीवर होते आहे. बालवाङ्मय हा अवघड प्रकार आहे. नैतिक तत्त्वे, सत्य, सांस्कृतिक ठेवा किंवा विज्ञान सोप्या शब्दात सांगणे ही कला आहे. लीला शिंदे, वंदना अघोर, सविता वैद्य इ. या क्षेत्रात चांगले काम करताहेत.

आत्मचरित्रात जनाबाई गिऱ्हे, इंदू जोंधळे ही नावे ठळकपणे येतात.

भाषांतर संस्कृती मराठी साहित्यात फार मोठ्या प्रमाणावर येत आहे. जगभराच्या साहित्याबरोबर प्रांतीय साहित्यही भाषांतरीत होत आहे. हरझॉग ही नोबेल प्राईझ विनर अमेरिकन ज्यू लेखक सॉल बेलो यांची कादंबरी, फ्रेंच लेखक गाय. दि. मोपासांच्या कथा, प्रेमचंद, रवींद्रनाथ टागोर यांचे साहित्य छाया महाजन यांनी भाषांतरीत केले आहे. भावना वैष्णवांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीचे भाषांतर केले आहे. माधवी आपटेंनी नोबेल पारितोषिक विजेत्या कथा भाषांतरीत केल्या आहेत.

परदेशी राहूनही मराठीविषयी प्रेम बाळगणाऱ्या उषा प्रभुणे

यांच्यासारख्या सक्षम लेखिका नव्याने लिहिताहेत. अलास्कन कथा या जागतिक पातळीवरील पुस्तकाचे संपादक जॉन स्मेल्सर यांची मुलाखत त्यांनी अनुवादित केली आहे. तसेच प्रवासवर्णनात्मक अमेरिकन संस्कृतीचे दर्शन घडवणारे लेखनही केले आहे. यातून एक तौलनिक चित्र उभे राहते. मराठी साहित्य कुठे आहे याचाही धांडोळा सोपा होतो. या सगळ्यांचे योगदान चालूच आहे. वर उल्लेखित केलेल्यांच्या शिवाय इतर लेखिका अनुवादाच्या क्षेत्रात काम करीत असतीलच.

दलित कवितेत जनाबाई गिऱ्हे, विमल पंडित, प्रज्ञा लोखंडे, प्रतिभा अहिरे, संध्या रंगारी, हिरा बनसोडे, अरुणा लोखंडे, मून या आणि यासारख्या कवयित्रींची कविता लक्षणीय आहे.


★

**आगामी**

# नो ऑर्डिनरी डे

मूळ लेखिका
डेबोरा एलिस

अनुवाद
तोषदा आलटकर




‘नो ऑर्डिनरी डे’ या आपल्या पुस्तकाच्या रूपाने डेबोरा एलिसने आपल्या ब्रेडविनरच्या चाहत्यांना एका लहान मुलीच्या अद्‌भुत कथेची जणू मेजवानीच दिली आहे. ही मुलगी तिला असणाऱ्या व्यवहारज्ञानाच्या आणि थोड्या बहुत नशिबाच्या जोरावर अडचणींतून कशी मार्ग काढते आणि प्रत्येक गोष्टीत कसा आनंद, समाधान शोधते; हेच या कथेतून सांगितले आहे. या पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारी रॉयल्टी ही सबंध जगभरातून आपल्या विविध शाखांद्वारे कार्य करणाऱ्या ‘लेप्रसी मिशन’ या संस्थेला सुपुर्द केली जाणार आहे.

**आगामी**

# स्ट्राँग अ‍ॅट द ब्रोकन प्लेसेस

मूळ लेखक
रिचर्ड एम कोहेन


अनुवाद
डॉ. वसु भारद्वाज




''असाध्य विकारांनी ग्रस्त पाच विभिन्न व्यक्तींसोबत रिचर्ड एम कोहेन यांनी तीन वर्षे घालवली. डेनिस, जी एएलएस या आजाराने ग्रस्त आहे, बझ, जो नॉन हॉकिन्स लिम्फोमाशी आपल्या ख्रिश्चन धर्मावरील अढळ श्रद्धेने लढतोय, सारा, एक आत्मविश्वासपूर्ण स्त्री क्रॉन्स डिसीजसोबत संघर्ष करतेय, कॉलेजकुमार असणाऱ्या बेनची लढाई चालू आहे मस्क्युलर डिस्ट्रॉफीसोबत आणि लॅरीत दबा धरून बसलेला आहे, बायपोलर डिसऑर्डर. विभिन्न वयाची, जातीची आणि विभिन्न आर्थिक स्तरावर जगणारी ही माणसं! प्रत्येकजण आपापल्या आखलेल्या वाटेने या जीवनाच्या प्रवासाला निघालाय. 'स्ट्राँग अ‍ॅट द ब्रोकन प्लेसेस'मध्ये कोहेन या प्रेरणादायी आणि जीवनामागचे यथार्थ दर्शन घडवणाऱ्या कथांचे सहप्रवासी आहेत. प्रतिकूल असणाऱ्या परिस्थितीत आणि जनसामान्यांच्या अज्ञानी सहवासातही आशेचा दीप तेवता ठेवत अभिमानाचे जीवन जगण्याची शिकवण आपल्याला या पुस्तकातून मिळते.
या अशा दुभंगलेल्या क्षणांतही आपण खंबीर, कणखर राहू शकतो, आपण कल्पना करू शकतो त्यापेक्षा कैक पट जास्त खंबीर!''



# अभिप्राय




## गीतांजली

रविंद्रनाथ टागोर यांच्या गीतांजली या काव्यसंग्रहाचा मराठी भावानुवाद डॉ. अमिता गोसावी यांनी केला असून ते गीतांजली या पुस्तकाच्या रुपात मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाला आहे. देशाला प्रथमच साहित्यातील नोबेल मिळवून देणाऱ्या त्यांच्या गीतांजली या काव्यसंग्रहाचा मराठी भावानुवाद उत्तम साधला आहे. या काव्यसंग्रहातून हळूवार कवी, नितळ मनाचा माणूस उलगडतो. आशा निराशेवर हिंदकळणारं मन या कवितांमधून प्रकट होतं. समर्पक शब्दांमध्ये मांडलेले जीवन तत्वज्ञान, सहज सुलभ भावाविष्कार वैशिष्ट्यांसह टागोरांची कविता व्यक्त होते.

-लोकप्रभा

रविंद्रनाथ टागोर

भावानुवाद - डॉ. अमिता गोसावी,

प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस

पृष्ठे -१०८, किंमत -१०० रुपये

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी
www.wordpowerbookshop@gmail.com
येथे संपर्क साधा.


**वाचकांना आवाहन**

मेहता मराठी ग्रंथजगत वाचकांना त्यांच्यातील लेखन कौशल्याचा शोध घेण्याची संधी देत आहे. जर आपणाकडे आतापर्यंत अप्रकाशित असणारे साहित्यविषयक लिखाण असेल तर ते सुवाच्च अक्षरात लिहून आमच्याकडे पाठवावे. योग्य लिखाणास ग्रंथजगतच्या अंकात संधी देण्यात येईल.

-संपादक



# पुरस्कार

## डॉ. भालचंद्र नेमाडेंना ज्ञानपीठ पुरस्कार



साहित्य अभिव्यक्तींची भाषा, आशय, घाट, सूत्र या सगळ्यांच्या कृतक सापळ्यात न अडकता मानवी अस्तित्वाच्या समस्त प्रश्नांना समग्रपणे आणि निर्धाराने भिडणारे ज्येष्ठ मराठी लेखक, कादंबरीकार, समीक्षक, कवी प्रा. भालचंद्र नेमाडे यांना भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार ६ फेब्रुवारी रोजी जाहीर झाला. 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या भरभक्कम कादंबरीसाठी प्रा. नेमाडे यांचा हा गौरव करण्यात आला आहे. सुमारे बारा वर्षांनंतर मराठीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याने मराठी साहित्य विश्वात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, विंदा करंदीकर यांच्यानंतर 'ज्ञानपीठ'वर मराठीची मुद्रा उमटण्याची ही चौथी खेप आहे. समृद्ध असा पुरातन वारसा सांगणाऱ्या मराठीला 'अभिजात दर्जा' मिळण्याची सुचिन्हे समीप दिसत असताना, असंख्य वादांचे हल्ले झेलत देशीवादाचा किल्ला लढवणारे नेमाडे यांच्या रूपाने मराठी साहित्यिकाच्या कर्तृत्वास राष्ट्रीय पातळीवर गौरवण्यात आले आहे, हे महत्त्वाचे. पंचविशीत 'कोसला' ही कादंबरी लिहून मराठी साहित्यविश्वास हादरा देणारे नेमाडे यांनी पुढच्या साहित्यप्रवासात 'बिढार', 'जरीला', 'झूल', 'हूल असे महत्त्वाचे टप्पे गाठले. 'हिंदू' हा त्यांच्या आजवरच्या कर्तृत्वाचा कळसाध्याय म्हणता येईल.

नामवरसिंह, रमाकांत रथ, नित्यानंद तिवारी, सुरजित पातर, चंद्रकांत पाटील, सुरंजन दास, आलोक रॉय, दिनेश सिंग, दिनेश मिश्र आणि भारतीय ज्ञानपीठाचे संचालक लीलाधर मंडलोई हे निवड समितीचे सदस्य होते.

विंदा करंदीकरांना २००३ साली मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्कारानंतर तब्बल ११ वर्षांनी हा पुरस्कार मराठीच्या वाट्याला आला आहे. भालचंद्र नेमाडे यांचे नाव यापूर्वीही ज्ञानपीठसाठी विचारात घेण्यात आले होते, पण यावर्षी निवड समितीच्या चर्चेत त्यांचा नंबर लागला.

या चर्चेत सर्व भारतीय भाषांतून तीन नावे अंतिम फेरीपर्यंत पोचली. त्यात भालचंद्र नेमाडे यांच्यासह बंगाली लेखक शंखो घोष आणि आसामी लेखक नीलमणी फुकन यांचीही नावे होती. बंगाली साहित्याने भारतीय साहित्यात मोठे योगदान दिले असूनही गेल्या १७ वर्षांत बंगालीच्या वाट्याला ज्ञानपीठ आलेले नाही, म्हणून घोष यांच्या नावासाठी निवड समितीतील बंगाली प्रतिनिधी फार आग्रही होते तर ईशान्यकडील काही भाषा अद्यापही ज्ञानपीठ पुरस्कारापासून वंचित असल्यामुळे यंदा नीलमणी फुकन यांना पुरस्कार देऊन हा अभाव भरून काढावा, असा आग्रह ईशान्येकडील साहित्यिकांनी धरला होता. या तिन्ही नावांवर जोरदार चर्चा झाली, तरी शेवटी भालचंद्र नेमाडे यांचे साहित्यिक योगदान निर्विवादपणे मोठे आहे, हे सर्वांनी मान्य केले आणि मराठी भाषेच्या शिरपेचांत ज्ञानपीठाचे चौथे पीस रोवले गेले.

* जन्म - २७ मे १९३८, सांगवी (जि. जळगाव)
* शालेय शिक्षण - भालोद (जि. जळगाव)
* पुणे विद्यापीठातून बी. ए. (१९६१)
* मुंबई विद्यापीठातून एम. ए. (१९६४)
* १९६५ ते १९७१ या काळात नगर, धुळे, औरंगाबादमध्ये इंग्रजीचे अध्यापन
* गोवा विद्यापीठात इंग्रजीचे विभागप्रमुख
* तौलनिक अभ्यास विषयाच्या प्रमुखपदावरून मुंबई विद्यापीठातून निवृत्त
* उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून त्यांना डी.लिट. आणि पीएचडी हे सन्मान लाभले.

* छंद, रहस्यरंजन, प्रतिष्ठान, अथर्व या नियतकालिकांमधून कविता प्रसिद्ध
* १९६० मध्ये त्यांनी 'वाचा' या अनियतकालिकाचे संपादन केले. हल्ली लेखकाचा लेखकराव होतो, तो का?' हा 'वाचा' तील त्यांचा लेख खळबळजनक ठरला होता.
* १९६३ मध्ये, उमेदवारीच्या काळात 'कोसला' कादंबरी प्रकाशित... या कादंबरीने कादंबरीच्या रचनेचे संकेत मोडले.
* 'कोसला' नंतर तब्बल एका तपाने, समकालीन मराठी समाजावर भाष्य करणाऱ्या 'बिढार' (१९७५), 'जरीला' (१९७७), 'हूल' (१९७९) या कादंबऱ्यांनी मराठी रसिक वाचकांना वेगळी अनुभूती दिली.
* 'मेलोडी' (१९७०) आणि 'देखणी' (१९९१) हे काव्यसंग्रह... विंदा करंदीकरांच्या शैलीशी साधर्म्य साधणाऱ्या कविता... व्यवहारी, अमानुष जगातल्या वास्तवावर उपरोधिक भाष्य...
* 'साहित्याची भाषा' (१९८७) भाषाविज्ञानपर पुस्तक
* 'टीकास्वयंवर' (१९९०) समीक्षा लेखसंग्रह. या संग्रहाला १९९० मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार लाभला.
* साहित्य अकादमीसाठी 'तुकाराम' हा दीर्घ लेख.
* 'मराठीवरील इंग्रजीचा प्रभाव : शैलीशास्त्रीय दृष्टीने अभ्यास' हा इंग्रजी आलेख.
* 'हिंदू' या महाकादंबरीचे प्रकाशन (२०१०)

## सूर्योदय मानवता सेवा पुरस्कार

''समाजकार्य शब्दाला अर्थरूपी व्याख्या देण्याचे काम आमटे परिवाराने केले आहे. लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून मानवतेची आणि प्राणिमात्रांची सेवा करण्याचा ध्यास डॉ. प्रकाश आमटे यांनी घेतला. त्यांचे कार्य, संघर्ष, तपस्या हे सर्वांसाठी आदर्श आहेत. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना पुरस्कार देण्याची संधी मला मिळत आहे. हा माझाच सन्मान आहे,'' असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

अमानोरा पार्क येथे इंदूर येथील श्री सद्‌गुरू दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्टतर्फे समाजकार्याबद्दल डॉ. प्रकाश आमटे यांना फडणवीस

यांच्या हस्ते ‘सूर्योदय मानवता सेवा’ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी महिला बालकल्याण विकासमंत्री पंकजा मुंडे, खासदार अनिल शिरोळे, भय्यूजी महाराज, डॉ. मंदा आमटे, सिटी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध देशपांडे, चित्रपट निर्माते महेश मांजरेकर उपस्थित होते.

आमटे म्हणाले, ‘‘हा पुरस्कार स्वीकारताना बाबा व आई यांची मला खूप आठवण होते. माझ्या कामाला समाजाने ऊर्जा दिली आहे. मोठ्या संख्येने तरुणाई या प्रकल्पाशी जोडली गेली आहेत. या सन्मानामुळे माझी जबाबदारी वाढली आहे.’’

## साहित्य क्षेत्रातील पुरस्कारांचे वितरण

सोनइंदर प्रतिष्ठानतर्फे साहित्य व कलाक्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या साहित्यिकांना इंदर सिंहजी शेखावत यांच्या स्मृतिदिनी ‘सोनइंदर पुरस्कार २०१५’ देऊन गौरवण्यात आले.

प्रमोद आडकर यांना साहित्य सेवा कलश पुरस्कार, वैभव जोशी यांना सोनइंदर मराठी काव्य पुरस्कार, संजय भारद्वाज यांना हिंदी काव्य सोनइंदर, डॉ. नजीर फतहपुरी यांना उर्दू काव्य सोनइंदर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी प्रा. सरन घई, डॉ. सदानंद मोरे, डॉ. दामोदर खडसे उपस्थित होते. विजय सातपुते, डॉ. राजेश श्रीवास्तव, नीलम हिरवे यांनाही सन्मानित करण्यात आले. शाहीर अशोक भांबुरे यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन टिकम शेखावत यांनी केले.

## माधुरी शानभाग यांना पुरस्कार

‘‘स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची संख्या कमी आहे. त्यातही गंभीर समस्यांवर त्यांनी खूप कमी लिखाण केले आहे. त्यामुळे स्त्रियांनी समाजातील विविध घटनांचा अभ्यास करून उत्कृष्ट लिखाण करावे,’’ असे मत डॉ. रेखा इनामदार साने यांनी व्यक्त केले. स्त्रियांच्या लिखाणामध्ये लहान मुले, अंध, अपंग, मतिमंद यांचा समावेश होत नसून, उच्चवर्णीयांना केंद्रित ठेवून लिखाण होते, असेही त्या म्हणाल्या.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या वतीने दिला जाणारा ‘मालती दांडेकर पुरस्कार’ प्रा. माधुरी शानभाग यांना प्रदान करण्यात आला. या मंडळाच्या

अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना आफळे, मंजरी ताम्हणकर, डॉ. मंदा खांडगे, डॉ. विनिता महाजन उपस्थित होत्या.

साने म्हणाल्या, ''लेखिकांच्या कादंबऱ्यांतील वाङ्‌मयीन मूल्यांना सामाजिक दस्तऐवज म्हणून मान्यतेची आणि त्याच्या विश्लेषणाची गरज आहे. गेल्या दहा वर्षांत परिस्थिती बदलली असून, लेखिकांचे साहित्य सामान्य वाचकांपर्यंत पोचत आहे.''

प्रा. शानभाग यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे महत्त्व सांगितले. डॉ. महाजन यांनी 'डोळे' या कवितेचे वाचन केले. मीरा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

## पत्रकारिता पुरस्कार

राज्य सरकारचे लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक लक्ष्मण त्र्यंबकराव जोशी, विजय विश्वनाथ कुवळेकर तसेच दिनकर केशव रायकर यांना देण्यात येतील अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली.

## वंदना गुप्ते यांना जीवनगौरव पुरस्कार

नाट्य संमेलनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते यांना गोगटे फाउंडेशनच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. या वर्षीपासूनच गोगटे फाउंडेशनतर्फे हा पुरस्कार देण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. उद्‌घाटनप्रसंगी शरद पवार यांच्या हस्ते एक लाख रुपायांचा चेक देऊन गुप्ते यांना गौरविण्यात आले.

## दर्पण पुरस्कार

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे राज्यपातळीवरील दर्पण पुरस्कार देण्यात आले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ संपादक पुरस्कार बाळकृष्ण पाटील, महिला दर्पण पुरस्कार राही भिडे, विभागवार दर्पण पुरस्कार दिनकर झिंग्रे, विकास महाडिक, सूर्यभान राजपूत, राजीव पिसे, सावन डोये, राहुल कुलकर्णी, पत्रकार साहित्यिक पुरस्कार धनंजय राजे, विशेष दर्पण पुरस्कार व्यंकटेश देशपांडे, दत्तात्रेय सपकाळ यांना ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या

हस्ते पोंभुर्ले (जि. सिंधुदुर्ग) येथे देण्यात आले.

## अनुराधा पौडवाल यांना जीवनगौरव पुरस्कार

‘गायक-संगीतकार आपल्या स्वर-रचनेतून गाण्याचे सौंदर्य उलगडतो. मात्र, त्या गाण्याचे सौंदर्य त्यावरील अभिनयाने अधिक खुलते,’ असे मत ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांनी मांडले.

ग्रामकन्या साप्ताहिक आणि एस. आर. इलेक्ट्रॉनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने संगीतकार प्रभाकर जोग यांच्या हस्ते पौडवाल यांना संगीतक्षेत्रातील योगदानासाठी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. ‘मान्यवर संगीतकारांकडे गाण्याची संधी मिळाली. या गाण्यांवर रसिकांनी भरभरून प्रेम केले. ही गाणी रसिकांच्या आजही लक्षात असल्याचा आनंद वाटतो,’ अशी भावनाही पौडवाल यांनी व्यक्त केली. साहित्य, कला, सामाजिक कार्य आदी क्षेत्रातील कार्यासाठी डॉ. आशिष व डॉ. कविता सातव, चित्रकार अपर्णा देशपांडे, उद्योजक रामदास माने, नृत्य दिग्दर्शक नरेंद्र पंडित, धावपटू कविता राऊत, संगीतकार निखिल महामुनी, साहित्यिक दुर्गेश सोनार, निर्मात्या योगिता भावे, दिग्दर्शिका विधी धोडगावकर आदींना गौरवण्यात आले. ज्येष्ठ अभिनेते रमेश व सीमा देव, लेखक अच्युत गोडबोले, दिलीप प्रभावळकर, डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे, नृत्य कलावंत डॉ. नंदकिशोर कपोते, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, लक्ष्मीकांत देशमुख, दिग्दर्शक राजदत्त आदी या वेळी उपस्थित होते.

## साहित्यदीप पुरस्कार

‘वर्तमानातील बदलांचा वेग अफाट आहे. त्या वर्तमानात लेखकही सहभागी असतो. त्यामुळे या बदलत्या वर्तमानाबद्दल लिहिण्याचे लेखकांपुढे आव्हान आहे,’ असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी मांडले.

साहित्यदीप प्रतिष्ठानच्या वतीने साहित्यदीप पुरस्कार लेखक प्रा. मिलिंद जोशी यांना डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. अंतर्नादचे संपादक भानू काळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तडवळकर, संगीता सावंत आदी या वेळी उपस्थित होते. अमित वझे यांनी समाधी कथेचे अभिवाचन केले. ‘डॉक्टर, इंजिनीअर यांच्यासारखी विविध

क्षेत्रातील माणसे लिहिती झाल्याने साहित्याचा परीघ विस्तारत आहे. मात्र, आताचे ग्रामीण जीवन मानसिकदृष्ट्या आधुनिक होत आहे. त्याचे चित्रण मराठी साहित्यात येणे आवश्यक आहे.

'लेखकांनी अंतर्मुखता जपणे गरजेचे आहे. लेखणी आणि वाणी ही शब्दशक्तीचीच दोन रूपे आहेत. त्यांना साहित्यसंस्कृतीच्या देव्हाऱ्यात स्थान मिळाले पाहिजे. सध्या साहित्यविश्वात असलेला तुच्छतावाद कमी होण्याची गरज आहे.' असेही कोत्तापल्ले यांनी सांगितले.

## भारत अस्मिता पुरस्कार

'एमआयटी' तर्फे 'भारत अस्मिता पुरस्कार' गुलजार, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे प्रा. त्रिलोचन शास्त्री, उद्योजिका व सामाजिक कार्यकर्त्या अनु आगा, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, खासदार अनंतकुमार हेगडे यांना शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. राहुल कराड, डॉ. मंगेश कराड उपस्थित होते.

गुलजार म्हणाले, ''तरुणाईच्या मुठीत भारत सुरक्षित आहे. त्यामुळे भारताचे काय होईल, अशी चिंता अजिबात वाटत नाही. भ्रष्टाचारापासून नद्यांच्या प्रदूषणापर्यंत अनेक समस्या आजूबाजूला आहेत; पण आपण योग्यवेळी आवाज उठवला नाही, हातही उगारले नाहीत. त्यामुळे तरुणाईला काही सल्ला देण्याचा, मार्ग दाखविण्याचा आपल्याला हक्कच नाही. त्यांना आधी त्यांचे रस्ते माहिती आहेत. खरे काय, चुकीचे काय हेही ते जाणून आहेत. चित्रपट हा समाजाचा आरसा मानला जातो; पण समाजात सध्या जे चालू आहे ते सर्वच चित्रपटांत येते असे नाही.'' एखादा खून होतो. त्या वेळी चित्रपटात पार्श्वसंगीत असते. प्रत्यक्ष जीवनात सन्नाटा असतो, असा फरकही त्यांनी सांगितला.

''मला व्यक्त व्हायचे असते. त्यामुळे भाषेचा आधार घेतो आणि लिहीत राहतो; पण माझ्या लिहिण्यामुळे तुमची झोप उडते. कधी-कधी मी तुमची स्वप्नेही चोरतो. त्यामुळे मी साधा चोर आहे, असे मला कधी कधी वाटते.'' असे गुलजार यांनी म्हटले.

महात्मा गांधींनी मूल्याधिष्ठित राजकारणाची दिशा दाखवली. त्या

दिशेवरून आपल्याला जायचे आहे. भाषणबाजी आणि नाटकबाजीतून भारत बदलणार नाही, असे त्रिलोचन शास्त्री म्हणाले.

आकर्षणामागे धावण्यापेक्षा ध्येय उराशी बाळगून इतरांसाठी कामे करा. समाजसेवा करताना स्वार्थी वृत्ती बाळगू नका. देशात कुपोषण, महिला असुरक्षा, शिक्षण, भ्रष्टाचार असे अनेक गंभीर प्रश्न कायम आहेत, असे मत अनु आगा यांनी व्यक्त केले.

भारताच्या प्रगतीची चर्चा किंवा त्याचे नियोजन आपल्याकडे सुरू आहे; पण किती घरात स्वच्छतागृहे आहेत, किती घरात पिण्याचे पाणी पोचते, महिला खरोखरीच सुरक्षित आहेत का, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते का? हेही पाहिले जावे, असे प्रश्न दिलीप पाडगावकर यांनी उपस्थित केले.

आमच्या सरकारमध्येही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले राज्यकर्ते आहेत. हे खरे आहे. राजकारणात कधी-कधी कटू वास्तव स्वीकारावे लागते. हे चित्र बदलण्यासाठी चांगल्या विचारांच्या तरुणांनी या क्षेत्रात यावे, असे अनंतकुमार हेगडे यांनी प्रतिपादन केले.

## डॉ. यशवंत मनोहर यांना जवळकर पुरस्कार

''भारतीय संविधान हे पाश्चात्य मूल्यांवर आधारित असल्याचा प्रचार केला जातो. मात्र, जगाला आधुनिक मूल्यांच्या तत्त्वज्ञानाची शिकवण बुद्ध, चार्वाक यांच्या विचारांनीच दिली आहे. त्यांच्यापासून चालत आलेली आधुनिक मूल्यांची परंपरा भारतीय सविधानापर्यंत येऊन पोचली आहे,'' असे मत साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांनी व्यक्त केले.

समता प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार' डॉ. मनोहर यांना पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवाले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी समाजवादी विचारवंत भाई वैद्य, मधुकर निरफराके, विशाखा खैरे, ॲड. संपत कांबळे, ॲड. मल्हारी जायभाव उपस्थित होते.

## सातारा भूषण पुरस्कार

मनोरंजन आणि बाजारपेठीय दडपणांना बळी पडत अनेक वर्तमानपत्रे उथळ पत्रकारिता करीत आहेत. परंतु माध्यमांची ही मनोरंजनी रंगवलेली

अवस्था लवकरच दूर होईल आणि त्यांना पुन्हा अभिजात पत्रकारितेकडे वळावेच लागेल, असे ठाम प्रतिपादन अरुण टिकेकर यांनी व्यक्त केले. सातारा येथील रा. ना. गोडबोले प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'सातारा भूषण' पुरस्कार यंदा लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांना टिकेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी 'प्रसारमाध्यमांची भूमिका' या विषयावर टिकेकर यांनी मते मांडली.

टिकेकर यांनी यावेळी बड्या वर्तमानपत्रांना भांडवलदारी पत्रे म्हणून हिणवणाऱ्यांचाही समाचार घेतला. 'देशातील लोकशाही टिकवण्याचे काम या बड्या भांडवलशाही वर्तमानपत्रांनीच केले आहे. लहान वर्तमानपत्रे ही जगण्यासाठी पूर्णपणे सरकारी जाहिरातींवरच अवलंबून असतात. त्यामुळे त्यांच्या पत्रकारितेवर मर्यादा येतात,' असे असे सांगून टिकेकर यांनी लातूर, यवतमाळ अशा काही जिल्ह्यांतून शेकड्यांनी प्रकाशित होणाऱ्या वर्तमान-पत्रांचा दाखला दिला. 'ही इतकी वर्तमानपत्रे कोण काढते, त्यांचे उद्दिष्ट काय असते याचा अंदाज बांधणे अवघड नाही. तेव्हा लोकशाही संवर्धनाचे काम प्रामुख्याने बड्या वर्तमानपत्रांकडून होते,' असे टिकेकर म्हणाले. आजचा महाराष्ट्र हा विचारांना घाबरणारा महाराष्ट्र होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. 'कोणत्याही उन्मादाच्या फुग्याला टाचणी लावून त्यातील हवा काढणे हे पत्रकारांचे आद्य कर्तव्य आहे आणि त्याचाच विसर सध्या माध्यमांना पडला आहे. पत्रकारच हे अशा उन्मादनिर्मितीत सध्या सहभागी होतात,' असे कुबेर म्हणाले.

## पं. जसराज यांच्या हस्ते स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे सन्मानित

''पुरीया कल्याणमधील होवन लागी शाम ही प्रभाताईंची रचना १९५५ मध्ये पहिल्यांदाच ऐकत होतो. जणू सांजवेळ झाल्याचा आभास त्यांच्या त्या बंदीशीतून होत होता. प्रभाताईंनी गावे अन् तसेच व्हावे हा ईश्वराचा आशीर्वादच. त्यांची प्रशंसा मी काय करणार? वयाने मी मोठा असलो, तरी गाण्याने त्या मोठ्या आहेत. त्यांची उंची मोजता येणार नाही.' असे स्वरमार्तंड पं. जसराज यांनी गौरवोद्गार काढले.

किराणा घराण्याच्या गायकीला वेगळे आयाम देणाऱ्या चिंतनशील गानसाधिका प्रभा अत्रे यांना पं. जसराज यांच्या हस्ते भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

★




## ।।मराठी कविता जुनी आणि नवी।।

अभिजात मराठी वाङ्मयावर आपल्या चिंतनगर्भ रसिकतेची सुवर्णमोहर उमटवणाऱ्या, अत्यंत मर्मग्राही भाष्य करणाऱ्या समीक्षकांमध्ये प्रा.वा.ल. कुलकर्णी ह्यांचे नाव घेतले जाते. आस्वादक समीक्षेच्या अप्रतिम ताकदीवर साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळवणाऱ्या प्रा.वा.ल. कुलकर्णी ह्यांचा कालखंड आहे 1911 ते 1991. ऐन तारुण्यात वा. ल. कुलकर्णी ह्यांनी कथालेखनाने सुरुवात केली खरी, परंतु पुढे त्यांनी मराठी वाङ्मयात श्रेष्ठ समीक्षक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. वा.ल. कुलकर्णी ह्यांना जाऊन पंचवीस वर्षे झाली तरी, त्यांच्या समीक्षेचे पडसाद रसिक वाचकांच्या अंतःकरणात झंकारत असतात. समीक्षक म्हणून वा.ल. कुलकर्णी ह्यांनी अभिजात मराठी साहित्यावर आपली छाप उमटवलीच (ढवळे प्रकाशनाच्या उत्कर्ष काळात ‘ढवळे’, ‘खेळगडी’ आणि ‘इथे मराठीचिये नगरी’ या नियतकालिकांचे संपादनही केले. अत्यंत समतोल विचारवृत्तीने ‘वा.ल.’ आपले वाङ्मयीन मत मुद्देसूदपणे मांडत.

1965साली हैद्राबाद येथे संपन्न झालेल्या शेहेचाळीसाव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून आपली भूमिका मांडताना वा.ल. कुलकर्णी म्हणाले होते, ‘‘माझे पुष्कळसे लेखन वाङ्मयाच्या अध्यापनासाठी मी जे वाचन व मनन केले, त्यातूनच तर जन्मलेले आहे. विद्यार्थ्यांना शिकवीत असता अनेक प्रश्न निर्माण होत असतात व त्यांतील अनेकांचा विचार आपल्यालाच नव्याने करावा लागतो, असा माझा अनुभव आहे. अशा प्रकारच्या प्रश्नांच्या विचारातून माझे बरेचसे लेखन जन्माला आलेले आहे. माझ्या समीक्षा लेखनाला पंतोजीगिरीचा वास येतो, असे कोणीतरी म्हटले आहे. माझे बरेचसे लेखन मी

वेगवेगळे वाङ्मयीन प्रश्न स्वतः समजून घेण्याच्या दृष्टीनेच केलेले असले तरी, माझा व्यवसाय समजून सांगण्याचा असल्यामुळे, तो भाग माझ्या लेखनात येणे अपरिहार्य आहे. त्यालाच उद्देशून पंतोजीगिरी हा शब्द वापरलेला असणे शक्य आहे.''

'साहित्य आणि समीक्षा', 'साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन' ह्यासारखे समीक्षा-ग्रंथ आणि 'काव्यातील दुर्बोधता', 'हरिभाऊंच्या कादंबरीतली व्यक्ती' यासारखे संपादित ग्रंथ निर्माण करणाऱ्या वा.ल. कुलकर्णी यांच चिंतनशील, तसेच विचारगर्भ लेखन म्हणजे त्यांचा 'मराठी कविता : जुनी आणि नवी' हा समीक्षा ग्रंथ.

'मराठी कविता : जुनी आणि नवी'ह्या समीक्षा ग्रंथाचे दोन विभाग आहेत. पहिला विभाग हा प्राचीन मराठी कवितेतले महत्त्वाचे जे टप्पे आहेत त्या संदर्भात आहे. आणि दुसरा विभाग हा अर्वाचीन मराठी कवितेतले जे महत्त्वाचे टप्पे आहेत, ह्या संबंधीचा आहे. गेल्या सव्वासातशे वर्षातील उमलत गेलेल्या एकूणच कवितेची सुंदर वळणे 'वा. ल.'नी धुंडत अत्यंत रसिकतेने, एकूणच शाश्वत मराठी कवितेचा अप्रतिम वेध घेतला आहे. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम आणि एकनाथांची भारूडे हा संतकवितेचा वेध आणि पंडित कवींमध्ये केवळ मोरोपंताच्या कवितेचा विस्ताराने वेध घेत, त्यावर अप्रतिम असे भाष्य केलेले आहे. विशेषतः संतांचे अभंग हा केवळ छंद प्रकार नसून तो एक काव्यप्रकारच आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे.

दुसऱ्या विभागात अर्वाचीन कवितेची वळणे समजावून सांगताना, केशवसुत, बालकवी, तांबे, बी, बोरकर, कुसुमाग्रज, मर्ढेकर, इंदिरा संत, पु.शि. रेगे, मंगेश पाडगावकर आणि सदानंद रेगे ह्यांच्या कवितेविषयी, मूलगामी चिंतन प्रगट केले आहे.

कवींना आणि कवितेच्या अभ्यासकांना प्रस्तुत ग्रंथ, आस्वादक समीक्षेच्या वाटेवरून घेऊन जातो, हे सर्वात महत्त्वाचे आहे. ज्ञानदेवांच्या समग्र वाङ्मयाचा रसिकतेने आस्वाद घेणारे जे वाचक आहेत, त्यांच्या मनाशीच संवाद साधताना डॉ. कुलकर्णी म्हणतात,

''ज्ञानेश्वरी हा ग्रंथ तत्त्वजिज्ञासूंचा जसा आवडीचा ग्रंथ आहे, तसाच वाङ्मयप्रेमिकांचाही आवडीचा ग्रंथ आहे. परंतु जेव्हा एखादा तत्त्वजिज्ञासू हा वाङ्मयाचाही रसिक वाचक असतो, म्हणजे जेव्हा तत्त्वजिज्ञासा आणि अभिजात रसिकता यांचा एखाद्या वाचकाच्या ठिकाणी एकत्र आढळ होताना दिसतो, तेव्हा

तर ज्ञानेश्वरी त्याच्या पदरात हा दुहेरी आनंद भरभरून टाकते. ज्ञानेश्वर हे मनच तसे आहे.''

जगद्‌गुरु श्रीसंत तुकारामांच्या अभंगवाणीची वैशिष्ट्ये सांगताना वा. ल. म्हणतात,

''तुकारामांच्या अभंगवाणीत भावसामर्थ्य आणि विचारसामर्थ्य सतत जाणवते; परंतु ही अभंगवाणी खडबडीत आहे. ह्या अभंगवाणीत एक प्रकारचा रांगडा निर्व्याजपणा आणि कणखरपणा आहे.


बालकवींच्या कवितेविषयी आपले मत नोंदवताना वा. ल. म्हणतात ''बालकवींच्या निसर्ग कवितेतील सौंदर्याचे रहस्य त्यांच्या वृत्तीत आहे. वृत्तीचे जडत्व गेल्याशिवाय खऱ्याखुऱ्या सौंदर्याची प्रतीती घडणे किंवा घडविणे अशक्य, ही बालकवींची समजूत, नव्हे, हा बालकवींचा जणू नेहमीचा अनुभव होता.''

इंदिरा संत ह्यांच्या एकूण कवितेवर भाष्य करताना वा.ल. म्हणतात,''इंदिराबाईंची कविता ही मनाच्या आर्ततेतून जन्माला येते. त्यांच्या कवितांना शीर्षके आहेत. परंतु विषय नाहीत. त्यांच्या कवितेत भडकपणाचा लवलेश नाही.''

वा.ल. कुलकर्णी ह्यांचा 'मराठी कविताः जुनी आणि नवी' हा ग्रंथ म्हणजे मराठी कवितेचा मानदंड तोलणारा आहे.आपण एखाद्या कवीची कविता वाचतो तेव्हा आपला परिचय एका श्रेष्ठ कविमनाशी होत असतो. त्याच्या चिंतनाचे विषय काय आहेत, त्याची स्वप्ने आणि आदर्श काय आहेत ह्यांचा वेध घेत जातो. ह्या वेधाचा वेध घेण्याचे सामर्थ्य ह्या ग्रंथात आहे. म्हणून हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा वाटतो.....


-वामन देशपांडे
9324615077

★




# प्रयत्ने धरू यशपंथ!

**'द एक्स्ट्रा वन पर्सेंट' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद**




मूळ लेखक : रॉब युंग

अनुवाद : सुजाता राऊत

पृष्ठे २२० । किंमत २४० रु. । पोस्टेज ३० रु. । सभासदांना सवलतीत

## स्वयंविकासाचे सूत्र स्पष्ट करणारे पुस्तक

**आज जागतिकीकरणानं जोडल्या गेलेल्या जगात स्वयंविकासाचे वेगवेगळे मार्ग खुले झाले आहेत. डॉ. रॉब युंग यांनी मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारित शास्त्रीय कसोट्या लावून सांगितलेले वर्तणूक-विषयक सिद्धान्त, नियम व असामान्य लोकांच्या कहाण्या देश, खंड, भाषा, संस्कृती यांच्या सीमा ओलांडून आपल्यापर्यंत पोहोचतात.**

**मानवी भावभावना व काही सनातन मूल्यं ही वैश्विक आणि मूलभूत आहेत हे चिरंतन सत्य यातून समोर येतं.**

**विश्वनागरिकत्वाच्या या काळात म्हणूनच या पुस्तकाचं मूल्य मोठं आहे. यातील काही गोष्टी आणि तत्त्वं आपल्याला पूर्वी माहीत आहेत असं वाटलं, तरी त्यामागचा वेगळा दृष्टिकोन, व्यवहारात वापरण्या-विषयी केलेल्या सूचना व त्यातून मिळणारा प्रेरणादायक संदेश मराठी वाचकांना नक्कीच आवडेल.**

## छोट्या-छोट्या बदलांतूनच घडतात असामान्य माणसे!

**काही विशिष्ट** लोकच यशस्वी होताना दिसतात, नाही का? सर्वसामान्य परिस्थितीतून भरारी घेण्यासाठी स्वत:ची उन्नती साधून असामान्य नेता, डॉक्टर, पालक, व्यावसायिक, नट, शिक्षणतज्ज्ञ किंवा दुसरं काही होण्यासाठी त्यांना कशाचं साहाय्य मिळतं?

या प्रश्नांच्या उत्तरासाठी तुम्हाला माहीत असलेल्या यशस्वी लोकांचा एका क्षणापुरता विचार करू या. कोणत्या गोष्टींनी त्यांना परिपूर्ण केलंय? तुमचं कुटुंब व परिचयातले लोक यांचं वर्तुळ लक्षात घ्या. यशाच्या शिखरावर असलेल्या, तुम्हाला माहीत असलेल्या मूठभर लोकांचा विचार करा. आता त्यांना त्यांच्या यशाचं गमक काय हे विचारा. प्रयत्न तर करा. विचारा की, ‘‘तुमच्या मते असं काय आहे ज्यामुळे तुम्ही यशस्वी झालात?’’

ते सगळे मनोधैर्य, हिंमत, परिश्रम करण्याची गरज आणि दृढनिश्चय यांविषयी बोलतील. जेव्हा चुका होतात, तेव्हा लक्ष देण्याची गरज असते असंही म्हणतील. ते पुढे सांगतील की, त्यांना प्रवाह बदलण्याचीही इच्छा आहे. ते परिस्थितीनुरूप बदलू शकतात. त्याचबरोबर जेव्हा काहीतरी चुकीचं

घडत जातं, तेव्हा ते सहजपणे बाहेर पडतात.

दृष्टिकोन, आत्मविश्वास, उत्कट इच्छा, सर्जनशीलता, जोखीम पत्करणं आणि वेळोवेळी आपल्या मनातील सहज प्रवृत्तींवर विश्वास ठेवणं या सर्व गोष्टींबद्दल ते बोलतील.

हुशार यशस्वी लोकांच्या मुलाखती घेतल्या, तर तुम्हाला समजेल की, ते सगळे याच पद्धतीनं बोलतात. जवळजवळ अशाच प्रकारचं ठाम प्रतिपादन प्रत्येक जण करेल.

व्यावसायिकांचं आत्मकथन वाचा किंवा प्रसिद्ध व्यक्ती बोलताना ऐका. तेसुद्धा अशाच प्रकारची विधानं करताना दिसतील. व्यापारातलं बडं प्रस्थ असलेले रिचर्ड ब्रॅन्सन आणि बिल गेट्स किंवा मॅडोना, टॉम क्रुझ या प्रसिद्ध व्यक्ती सारखंच बोलतात. टायगर वुड्स किंवा व्हिनस विल्यम्स हे स्पर्धावीरदेखील हेच सांगतील.

एका पद्धतीने ते सगळे जण बरोबर आहेत. त्यांच्याकडे योग्य कल्पना आहेत, पण तरीही सगळेच जण काही निष्णात, पारंगत नसतात. मला खातरी आहे की, तुम्हाला अशी काही माणसं माहीत असतील; जी विचार करतात, त्यांच्याकडे दृष्टिकोन, सर्जनशीलता, दृढनिश्चय, बदलांना सामोरं जाणं अशा सर्व गोष्टी आहेत. पण ज्यांचे स्पर्धक व्हायला आवडेल अशा यशस्वी लोकांसारखा परिणाम मात्र त्यांना साधता येत नाही. कारण देदीप्यमान कामगिरी करणारे क्वचितच असा तपशील देऊ शकतील, ज्यायोगे इतर लोकांना त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाता येईल. तेव्हा प्रश्न असा आहे की, ठरावीक लोकांना यशस्वी करणारी अशी जी गोष्ट आहे, ती नेमकेपणानं शोधायची कशी?

## यशाची व्याख्या

एका क्षणापुरतं तुमच्यावरच लक्ष केंद्रित करू या. १ ते १०च्या श्रेणीमध्ये तुम्ही स्वत:ला कितपत यशस्वी म्हणवून घ्याल? **हे पुस्तक म्हणजे यशाचं शास्त्र आहे. काही ठरावीक लोकांना यश का मिळतं, ते यशोशिखरावर कसे पोहोचतात; हे शिक्षणतज्ज्ञ, समुपदेशक यांनी शोधून काढलंय.** या असामान्य लोकांविषयी काही गोष्टी व शास्त्रीय माहिती मी तुम्हाला सांगणार आहे. यश मिळवण्यासाठी त्यांनी वेगळ्या पद्धतीनं काय केलं हे समजायला त्यामुळे मदत होईल. संशोधक कशा प्रकारे

परिपूर्ण शोध घेतात, तेही उमगेल. म्हणूनच आता माझं म्हणणं ऐका आणि स्वत:ला एक श्रेणी द्या.

बहुसंख्य लोक स्वत:ला ५ ते ८ यांमधील गुण देतात. क्वचितच कुणी म्हणेल की, ते १० किंवा ९च्या जवळ आहेत. यातून असं जाणवतं की, आयुष्यात झुंजायला झगडायला जे काही लागतं; ते त्यांनी मिळवलंय आणि त्यातून थोडा अहंपणाचाही भास होतो. खरंय ना?

खूप कमी लोक स्वत:ला १ ते २ गुण देतात, ३ किंवा ४ गुणही दिलेलेही फारसे दिसत नाहीत. जेव्हा लोक स्वत:ला कमी गुण देतात, तेव्हा त्यांचं म्हणणं असतं की, ते वाईट काळातून गेले आहेत. पण त्यातून बाहेर पडण्याचेही त्यांचे असे काही मार्ग असतात.

हा अनावश्यक प्रश्न आहे असाही विचार कदाचित तुम्ही कराल. आपण जी यशाची व्याख्या करतो, परिपूर्णतेचं मूल्यमापन करण्यासाठी जी पद्धत वापरतो, त्यावर हे उत्तर अवलंबून असतं अशी कारणमीमांसा तुम्ही कराल. काही विशिष्ट वस्तुस्थितीवर यश आधारलेलं आहे असाही विचार तुमच्या मनात येण्याची शक्यता आहे. यात तुम्ही किती कमावता, तुमच्या कामाचा किती आनंद घेता, तुमच्या आयुष्यात प्रेमाचे, स्नेहाचे बंध कुठवर आहेत, तुम्हाला किती लैंगिक सुख मिळतं, तुम्ही किती वेळ मित्रांबरोबर आनंदात घालवता – या आणि अशाच गोष्टींचा अंतर्भाव होतो. जर आपण या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या, तर आपलं १ ते १० वर आधारित गुणांकन खूपच तकलादू वाटतं.

कधीकधी साध्या सरळ गोष्टीच आपल्याला मुद्द्यावर येण्यास मदत करतात. जसं अनेक संशोधक करतात, तसं मला काही काळापर्यंत तरी गुंतागुंतीच्या गोष्टींतून बाहेर पडू द्या आणि आर्थिक यशाची व्याख्या एखादा माणूस किती 'कमावतोय' इतपतच मर्यादित स्वरूपात करू द्या. अर्थात मी असं म्हणत नाहीये की, एखादा श्रीमंत बँकर, गुंतवणूकदार हा एखाद्या नर्सपेक्षा चांगला माणूस असतो. पण मी यशाच्या अधिक अर्थपूर्ण, परिपूर्ण अशा व्याख्येपाशी येतोय.

### अधिकचा एक टक्का कशाने बनतो?

मी तुम्हाला विल्यम चॉक आणि जॅस्पर अल्क्विस्ट या दोन व्यक्तींची ओळख करून देतो. हे दोघंही श्रेणीच्या दोन टोकांना आहेत. ते दोघंही

युरोपीय माहिती-तंत्रज्ञान कंपनीसाठी मुख्य अकाउंट्स मॅनेजर म्हणून काम करतात. हे नामाभिधान फारसं प्रचलित नसलेलं आहे. ते वास्तविक विक्री क्षेत्रातील लोक असतात. कंपनीतील संगणक उत्पादन व त्याच्याशी संबंधित सेवा ते कार्पोरेट ग्राहकांना देतात.

चॉक आणि अल्क्विस्ट यांना श्रेणीच्या दोन टोकांचं गुणांकन मिळालंय हे मी सांगितलं. त्यांच्या कंपनीनंच ते केलंय. गेल्या वर्षी या दोघांपैकी एक जण विक्री क्षेत्रात वरच्या १० टक्क्यांमध्ये होता. त्यानं दुसऱ्या व्यवस्थापकांपेक्षा ९० टक्के जास्त संगणक, सेवा, संगणक प्रणाली इत्यादी विकल्या. दुसरा माणूस तळातल्या १० टक्क्यांमध्ये होता. दुर्दैवानं १० सहकाऱ्यांपैकी नऊ जणांनी त्याला मागे टाकलं.

ते दोघं चार वर्षांपासून कंपनीसाठी काम करत होते. प्रत्येक वर्ष त्यांच्यासाठी सारखंच चांगलं किंवा वाईट नव्हतं. तरीही वर्षानुवर्षं त्यांच्यापैकी एक नेहमीच वरच्या ४० टक्क्यांमध्ये होता, तर दुसरा तळातल्या ५० टक्क्यांच्या बाहेर कधीच नव्हता.

गेल्या वर्षी त्यांच्यापैकी ज्यानं ५ लाख पौंड पगार व बोनस मिळवला, तो कंपनीच्या वरच्या १० टक्क्यांमध्ये जाऊन बसला. ज्यानं १ लाख पौंड मिळवले, तो तळातल्या १० टक्क्यांमध्ये होता. तर मग वरची श्रेणी संपादन केलेला कोण होता चॉक? कि अल्क्विस्ट?

दोघांकडेही चांगल्या विद्यापीठाची पदवी होती आणि त्यांच्या करिअरच्या प्रगतीचे आलेखही चांगले होते. दोघंही कठीण, दमछाक करणाऱ्या निवड प्रक्रियेतून गेले होते; ज्यात संख्येतील अनेक वरिष्ठ व्यवस्थापकांबरोबर मुलाखतीच्या अनेक फेऱ्या होत्या. संस्थेमध्ये सर्वांनाच ते दोघंही आवडत होते. पण एक जण दुसऱ्यापेक्षा जबरदस्त यशस्वी होता. सरळसरळ त्या दोघांपैकी एकाकडे तो जास्तीचा एक टक्का होता – ज्यामुळे सगळा फरक पडतो.

## जिंकण्याचं सूत्र काबीज करणं

'काही लोक दुसऱ्यांपेक्षा खूप जास्त यशस्वी का होतात?' हा प्रश्न मार्गारेट टेलरनं मला विचारला. ती चॉक आणि अल्क्विस्टच्या तंत्रज्ञान कंपनीच्या मनुष्यबळ खात्याची प्रमुख होती. तंत्रज्ञानाचं क्षेत्र उंचावत असल्याचं तिनं मला सांगितलं. मागणी खूप मोठी होती आणि कंपनी

अतिशय झपाट्यानं विस्तारत होती. त्यांचे काही स्पर्धकही त्यांच्यापेक्षा अधिक गतीनं प्रगती करत होते. मागणी व पुरवठा यांचा सुयोग्य मेळ घालू शकतील अशा मुख्य अकाउंट्स मॅनेजरची नेमणूक करणं ही त्यांच्यापुढची प्रचंड मोठी समस्या होती आणि त्यामुळे त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होत होता. मुख्य समस्या होती की, ते निग्रहाने पुढे वाढत होते. मागणी पुरवण्यासाठी ते चांगल्या मुख्य अकाउंट्स व्यवस्थापकाची नेमणूक करत होते.

टेलर मान्य करते की, जेव्हा विक्री खात्यात चांगले लोक नियुक्त करण्याची वेळ आली; तेव्हा कंपनीची आधीची नोंद गलथान असल्याचं दिसलं. कधीकधी त्यांनी अगदीच नवे चेहरे घेतले होते. कधीकधी आत्मप्रौढी मिरवली की, प्रतिस्पर्ध्यांचे उच्चस्तरीय लोक त्यांनी स्वत:कडे ओढून घेतले आहेत. हेतू एकच की, वरच्या मंडळींनी जळावं.

नुकतीच नियुक्ती झालेल्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कंपनी मूल्यवान वेळ व पैसा खर्च करत होती. मात्र साधारण वर्षभरानं विक्रीकरता नवीन माणसांची भरती करत असत. ही नवीन माणसं कंपनीच्या काही विशिष्ट उत्पादनांना पूर्ण हातात घेत, कामाची पद्धत पाहत. सर्वसामान्यपणे १२ ते १८ महिन्यानंतरच यशापयशाचा परामर्श घेता येत होता.

**अर्थातच वरच्या श्रेणीतील विक्री क्षेत्रांतली माणसं कोण होती ते टेलरला माहीत होतं. पण ते वेगळेपण कशामुळे आलेलं आहे हे तिला समजलं नव्हतं, त्यामुळे भविष्यात अशी जादू करण्यासाठी काय करावं ते कळत नव्हतं. कोणाला सर्वांत जास्त यशस्वी ठरवावं याबाबतीत वरिष्ठ व्यवस्थापकांमध्ये अनेक वादाचे मुद्दे होते. त्यामुळे यांपैकी कोण विक्रीक्षेत्रात पुढे जाऊन स्टार शकेल, आणि त्याकरता त्या व्यक्तीच्या अंगी कोणते विशिष्ट गुण आहेत हे ती ठामपणे सांगू शकत नव्हती.**

यशस्वी झालेल्या आणि न झालेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न टेलरनं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनं केला होता. उत्तरादाखल तिला पठडीतील उत्तरं मिळाली. सर्वांनीच साधारणत: समान कौशल्यांचा उल्लेख केला. खरोखरच यशस्वी म्हणता येतील अशांनादेखील आपल्या यशामागची कारणमीमांसा देता आली नाही. म्हणूनच तिनं माझी मदत मागितली. **तिनं मला गोपनीयरीत्या काही काम करण्यास सांगितलं. विक्री-खात्यातील काही माणसांच्या सखोल मुलाखती घ्यायच्या होत्या. काही प्रश्नांची उत्तरं शोधायची होती. जसे उच्च कामगिरी**

**करणाऱ्यांमध्ये काय वेगळेपणा होता? वरच्या दहा टक्क्यांतले लोक आणि कमी गुणवत्ता असलेल्यांत काय फरक होता? ते शिखरावर कसे पोहोचले? या सर्व प्रश्नांच्या उत्तरांवरून काही ठरावीक सूत्र विशद करता येतं का की ज्याचा वापर करण्यानं उत्कृष्ट विक्री-कौशल्य विकसित होईल. असं झालं, तर कंपनी खरोखर गुणवत्ताधारक लोकांची नेमणूक करू शकेल.**

## खऱ्याखुऱ्या यशस्वी लोकांची मानसिकता

अशा प्रकारचा प्रकल्प करण्याची माझी ही काही पहिलीच वेळ नव्हती आणि काही विशिष्ट लोकच का यशस्वी होतात व बाकीच्यांना अपयश का येतं याच्या कारणांकडे दृष्टिक्षेप टाकणारा मी काही एकटाच मानसशास्त्रज्ञ नव्हतो. कोलेनेल जॉन सी फ्लॅनगन यांचे ऋण सर्व आधुनिक मानसशास्त्रज्ञ मान्य करतील.

आपण जरा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जाऊ या. ते १९४१ साल होतं. युरोपातील बहुतेक देश आणि जपान, चीन यांच्यासकट अनेक देश कितीतरी वर्षं युद्धात उतरले होते. संयुक्त राष्ट्र संघाचा अद्याप युद्धात सहभाग नव्हता. पण भाग घेतल्याप्रमाणे त्यांची तयारी चालू होती. २० जूनला 'युनायटेड स्टेट्स आर्मी एअर फोर्स' ची निर्मिती झाली. त्यांनी वेगवेगळी हवाईदलं एका छत्राखाली आणली.

**तुम्ही कल्पना करू शकता. हवाई प्रशालेतून प्रशिक्षणार्थींना वगळण्याचा निर्णय हा सहज घेण्यात आलेला नव्हता. ज्या वेळी देशात युद्धसदृश परिस्थिती होती, तेव्हा त्यांना सांगण्यात आलं होतं की, तुम्ही पायलट बनण्यासाठी पुरेसे सक्षम नाहीत. भावनिक कडेलोट करणारा भयावह निर्णय होता तो. मुळातच पायलट प्रशिक्षण हा अत्यंत खर्चिक कार्यक्रम असल्यानं अशा प्रशिक्षणार्थींना डच्चू देणं हे आर्थिकदृष्ट्या-देखील बिकट होतं.**

**तज्ज्ञ प्रशिक्षक व पायलट ज्यांनी हा निर्णय घेतला, त्यांना लेखी स्पष्टीकरण देणं भाग होतं की, त्यांनी काही उमेदवारांना या कार्यक्रमामधून का वगळलं होतं? 'प्रकृती अनुरूप नाही', 'निकस निर्णयशक्ती', 'प्रगती समाधानकारक नाही' किंवा अगदी 'वैमानिकाच्या जन्मजात क्षमतेचा अभाव' अशी काही कारणं त्या वेळेस दिली गेली.**

**पण म्हणजे नेमकं काय हे कोणालाच नक्की कळलं नाही. चुकीच्या उमेदवारांची निवड टाळण्यासाठी ही स्पष्टीकरणं पुरेशी योग्य नव्हती. हजारो उमेदवार अशा संदिग्ध कारणांपायी काढून टाकण्यात आले.** सर्वांत वाईट म्हणजे प्रत्येक वर्षी प्रशिक्षणादरम्यान होणाऱ्या अपघातांमध्ये हजारो तरुण मुले बळी पडत राहिली.

प्रशिक्षणार्थींचं मूल्यमापन करताना अनुभवी प्रशिक्षक आणि पायलट हे निरुपयोगी अशी सर्वसाधारण मतं प्रदर्शित करत होते. हे हवाईदलाला कळून चुकलं. ही समस्या लक्षात घेऊन त्यांनी एक जबाबदार दल निर्माण केलं. पायलट होण्याकरता काही उमेदवारांनाच हिरवा कंदील तर काहींना लाल कंदील का दाखवला याचा खोलवर शोधक अभ्यास करण्याचं काम त्यांचं होतं. अधिकारी मानसशास्त्रज्ञ जॉन सी. फ्लॅगॅनन हे या संशोधनाचे प्रमुख होते.

फ्लॅगॅननला अत्यंत जोखमीच्या व मोठ्या जबाबदारीला तोंड द्यावं लागलं, जी लवकरच भव्य-विशाल होऊन प्रकटणार होती. युद्धात लढण्यासाठी हवाई दलाने अक्षरशः प्रचंड प्रमाणात लोकांची भरती केली. ३१ डिसेंबर, १९४१ मध्ये ३ लाख वैमानिक आणि १२ हजार विमानं होती. फक्त दोन वर्षांनंतर २३ लाख इतके महिला-पुरुष कर्मचारी व ६४,००० विमानं इतका झाला.

फ्लॅगॅननचा निष्कर्ष धक्कादायक होता. अगदी भूकंपाच्या प्रचंड हादऱ्यासारखा. त्यानुसार 'प्रशिक्षणार्थी असो वा अत्यंत अनुभवी प्रशिक्षक कोणालाच धड माहीत नव्हतं की, यश आणि अपयश मिळण्यामागे काय कारणं असू शकतात.' याबाबतच्या निष्कर्षांच्या अहवालात तो लिहितो – 'अगदी नेहमीच नोकरीच्या गरजा स्पष्ट करणारी विधानं म्हणजे माणसांच्या अपेक्षित खुबींची निवळ यादी असते. वास्तवात निवड व वर्गीकरण करून विशिष्ट कामासाठी उमेदवारांना प्रशिक्षण देताना त्याची काहीही मदत होत नाही.'

म्हणून त्यानं ही कार्यपद्धती बदलली. आपण ध्येय गाठण्यात यशस्वी किंवा अयशस्वी का झालो याचा काथ्याकूट करण्यापेक्षा त्यानं पायलटना त्यांच्या यश अपयशाबद्दल वकिलाच्या कौशल्यानं तपशिलात बोलायला लावलं. त्यामध्ये त्यांनी काय केलं, ते काय म्हणाले किंवा त्या वेळी ते कसा विचार करत होते यावर लक्ष केंद्रित करायला लावलं.

फ्लॅगॅननं पुढील काही वर्षांत १५० मानसशास्त्रज्ञ आणि १०००पेक्षा जास्त साहाय्यकांची/मदतनिसांची नेमणूक केली. अनेक वर्षं त्यांनी एकत्रितपणे हजारो लोकांच्या मुलाखती घेण्यास मदत केली. या लोकांना

त्यांनी आपण यशस्वी झालो होतो किंवा आपल्याला अपयश आलं होतं अशा काही विशिष्ट प्रसंगांबद्दल बोलायला सांगितलं. या सगळ्यांतून त्यानं युद्धात भरीव असं योगदान दिलं. त्याच्या मूलभूत संशोधनानं USAAF ला निवडीच्या दरम्यान योग्य निर्णय घेण्यास मदत झाली. असे उमेदवार जे पायलट प्रशिक्षणात येणं असंभवनीय होतं किंवा या प्रक्रियेत त्यांचा बळी जाण्याचा संभव होता, त्यांना प्रशिक्षणात सहभागी केलं नाही. नंतर फ्लॅगॅननला त्याच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'लीजन ऑफ मेरिट' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. युद्ध जिंकण्यासाठी त्यानं व त्याच्या संघानं जे प्रयत्न केले, त्यासाठी हा पुरस्कार होता.

## ठळक उदाहरणं

फ्लॅगॅनन आणि त्याचे सहकारी यांनी मुलाखतीची एक पद्धत निर्माण केली व ती अधिकाधिक निर्दोष केली. त्या पद्धतीला 'टीकात्मक प्रसंगाचं चित्र' (CIT सीआयटी – Critical incident technique ) असं म्हणतात. आजही मानसशास्त्रज्ञ ही पद्धत वापरतात. इतरांमध्ये वेगळं उठून दिसणारं चित्र हे तंत्र सामोरं आणतं. मीदेखील मार्गारिट टेलर व विक्री क्षेत्रातील व्यवस्थापक चॉक आणि अल्क्विस्ट यांची मुलाखत घेण्याकरता 'सीआयटी'चा वापर केला.

यामागची भूमिका म्हणजे 'मी का हरलो किंवा जिंकलो' याबद्दलचं समोरच्याचं सर्वसाधारण मत जाणून घेण्याऐवजी त्या काळात मी 'काय काय' केलं ह्याचं सविस्तर वर्णन समोरच्याला सांगायला लावणं. ''तुम्ही तेव्हा काय करता?'' किंवा ''तुम्ही काय करताय असं तुम्हाला वाटतं?'' असं थेट विचारण्यापेक्षा ''तुम्ही तेव्हा काय केलं?'' यावर भर दिला जातो.

यश किंवा अपयश यांचा विशिष्ट भाग, वृत्तान्त ऐकवणं हे अनुस्युत आहे. ते जवळजवळ यातनामय होईल इतकं तपशिलात ऐकायचं. त्यातून समजून येईल की, लोकांनी काय केलं, कोणते पर्याय निवडले आणि क्षणाक्षणाला कोणती कृती केली. ते आपल्या तंत्राची कल्पना कृतीद्वारे देतात. हाच एक प्रथमदर्शनी दिसणारा आधार होता, जो मी टेलरबरोबरच्या प्रत्येक मुलाखतीत वापरला. वर्षानुवर्षं मी एकाच पद्धतीची प्रस्तावना पुन्हा पुन्हा वापरली – ''विक्रीचं यश कशात असतं याचा मुख्य अकाउंट मॅनेजरच्या भूमिकेतून आम्ही सध्या अभ्यासत आहोत ज्यायोगे आम्ही प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात सुधारणा

करू शकू. त्यामुळे भविष्यात अधिक चांगली नियुक्ती करण्याचे निर्णय घेणं शक्य होईल. आमचा विश्वास आहे की, यशस्वी विक्रीबद्दल सांगण्यासाठी तुम्ही योग्य आहात.''

एकदा मी एका तंत्रज्ञान संस्थेत मोठ्या संख्येनं लोकांच्या मुलाखती घेतल्या. मला उमगलेल्या गोष्टींचं मी विश्लेषण केलं. त्यात सकृद्दर्शन क्षुल्लक फरक आढळला. वैशिष्ट्यपूर्ण यश मिळवलेल्या व कमी उत्कर्ष झालेल्यांमधला तो फरक होता उदा. – वरच्या टप्प्यातील व्यवस्थापकांची प्रवृत्ती गप्पागोष्टींच्या द्वारे सहसंबंध निर्माण करण्याकडे होती. ई-मेल्स पाठवण्यावर भर देण्यापेक्षा प्रत्यक्ष फोनद्वारे त्यांनी अधिक जणांशी संपर्क साधला.

विक्रीक्षेत्रातल्या उत्तुंग आणि नैराश्यजनक कामगिरी करणाऱ्या लोकांविषयी मी बोलतोय. त्यांच्यातल्या वेगळेपणाचं विश्लेषण केलं. मी वर्तणूकविषयक गुणांची अशी एक यादी तयार केली, ज्यातून असामान्य व सर्वसामान्य वर्तणुकीतला फरक स्पष्ट होतो. 'सामुदायिक परिभाषा' वापरण्यासाठी मी 'सामर्थ्य' किंवा 'सामर्थ्याची रचना' यांचा संच तयार केला.

सर्वोत्कृष्ट माणसं इतरांपेक्षा वेगळी कशी हे दाखवणारी वर्तणूक कोणती यावर थोडक्यात काम केलं, यामुळे संस्थेला योग्य प्रकारचे लोक घेणं आणि नको त्यांना वगळणं शक्य होईल. लोकांना प्रशिक्षण कसं द्यावं, असामान्य नेत्यांची पुढची पिढी कशी विकसित करावी, त्याचप्रमाणे डॉक्टर्स, तंत्रज्ञ, ग्राहक, सेवा देणारे किंवा तत्सम यांविषयी संस्था विचार करेल. पण 'सामर्थ्याची रचना' ही फक्त मोठ्या व्यवसायांसाठी नसते. त्यातून व्यक्तींनाही फायदा होतो.

## नियंत्रण मिळवण्याजोगी परिस्थिती

**इथे सकृद्दर्शनी एकसारख्या दिसणाऱ्या गोष्टी आता पाहू या. कदाचित त्या तुम्हाला एखाद्या मोठ्या स्पर्शरेषेसारख्या वाटतील. एकदा तुमचं वाचून झालं की, मग मी थोडक्यात स्पष्ट करेन.**

**तुम्हाला माहिती आहे का जास्त उंच लोक अधिक पैसा कमावण्याकडे प्रवृत्त होतात? फ्लोरिडा विद्यापीठातील संशोधक टिमॉथी ज्यूड यांनी मिळकत व उंची यांवर आधारित युके व युएसए इथल्या ८,५९० स्त्री-पुरुषांकडून माहिती गोळा केली. वय, लिंग, वजन यांच्यामधला फरक लक्षात घेऊन त्यानं शोधून काढलं की, उंच लोकांना अधिक पैसा मिळतो. त्यानं अंदाज बांधला की, उंचीतला**

**प्रत्येक एक जास्तीचा इंच वर्षाला ७०० डॉलर्स मिळवून देतो.**

पीटर क्रिस्टेन्सन आणि टॉर जॅरकेडेल या नॉर्वेजिअन शास्त्रज्ञांनी एका वेगळ्या अभ्यासात दाखवून दिलं की, पहिल्या अपत्याची बौद्धिक धाव ही दुसऱ्यापेक्षा जास्त असते आणि दुसऱ्याची तिसऱ्यापेक्षा अधिक असते.

संपूर्ण जगभरात यशाच्या कारणांकडे दृष्टिक्षेप टाकणारी अनेक सारखीच संशोधनं आहेत. असं काय आहे ज्यामुळे काही माणसं जास्त बुद्धिमान निपजतात, ते जास्त कमावतात, त्यांची जास्त भरभराट होते. दुसरा अभ्यास असं दाखवतो की, आपल्या पालकांची शैक्षणिक पातळी व आपलं लहानपणचं संगोपन यांचाही परिणाम आपल्या उत्कर्षातल्या संधींवर होतो. पण अशी उदाहरणं आपण प्रत्यक्षात आणू शकतो का?

**उत्तर – नाही!**

आपण सहजपणे आपली उंची बदलू शकत नाही. (म्हणून तर उंच टाचांचे बूट इतके लोकप्रिय आहेत. हॉलिवुडमधला एक हिरो आपल्या कमी उंचीवर मात करण्यासाठी बुटांच्या आतून उंच सोल्स वापरतो असा प्रवाद आहे.) आपण आपल्या जन्माच्या वेळची परिस्थिती नाही बदलू शकत. आपण मागे जाऊ शकत नाही आणि आपले पालक, आपली पार्श्वभूमी, संस्कृती किंवा आपण कुठून आलो आहोत यांमध्ये फेरफार करू शकत नाही. असं संशोधन आपल्याला प्रगतिशील बनवण्याकरता, आपलं आयुष्य सुधारण्याकरता मदत नाही करू शकत.

सामर्थ्याची चळवळ ही वेगळी असते. यश मिळवून देणारी माणसाची जी कायमस्वरूपी वैशिष्ट्यं आहेत, त्यांच्याकडे पाहण्यापेक्षा जी वर्तणूक यश संपादन करून देते, त्यावर भर देते त्याचा मी चाहता आहे. **माणसं काय करतात, कसला विचार करतात आणि काय बोलतात यांवर सामर्थ्याचं संशोधन लक्ष केंद्रित करतं. फक्त ती माणसं कोण आहेत हेच ते पाहत नाहीत. काही माणसांमध्ये नैसर्गिक वेगळेपण असतं ज्याबाबत आपल्याला काहीच करता येत नाही. त्यापेक्षा आपण वेगळं काय शिकू याकडे ते पाहतात. सामर्थ्याचं संशोधन हे आश्चर्यजनक प्रोत्साहन देतं. कारण आपल्याला स्वत:मधील संभाव्य शक्यता विकसित करायच्या असतील; तर आपण काय करू शकतो, स्वत:ला बदलण्यासाठी कशाची निवड करू शकतो या संशोधनाद्वारे दिसून येतं.**

**यशाचं समृद्ध चित्र**

आत्तापर्यंत मी जवळजवळ फक्त पैसा हेच यशाचं मोजमाप आहे यावर लक्ष केंद्रित केलं. अर्थातच खरी प्रगती ही फक्त पैशांतूनच येत नाही. हो, आयुष्यात थोडा अधिक पैसा मिळवायला त्याची मदत होते खरी. आणि ज्यामुळे लोकांना अधिक कमाई करता येईल. अशा वागणुकीवर मी निश्चितच थोडा प्रकाश टाकणार आहे. **कदाचित माणसं आर्थिकदृष्ट्या अधिक समृद्ध होतील, पण मित्र नसल्यानं त्यांना एकाकीपणा जाणवेल. ते त्यांच्या कामाचा द्वेष करू शकतील. वेगळा मार्ग चोखाळला असता तर बरं, असं त्यांना वाटू शकेल किंवा आपल्या आतल्या दुष्ट राक्षसाशी ते लढत बसतील ज्यामुळे त्यांना भौतिक संपत्तीचाही आनंद घेता येणार नाही. भल्यामोठ्या रकमेचा चेक आणि मोक्याच्या जागेवर असलेलं ऑफिस यांतून आनंद मिळेलच याची शाश्वती नाही.**

यश हे फक्त पैशांशी संबंधित नसतं. त्यातून करिअरमधलं समाधान, नातेसंबंधांतला निश्चिंतपणा, चांगले पालक होणं, आपल्यामागे सकारात्मक वारसा ठेवून जाणं, चांगलं आरोग्य आणि समाधानाची भावना असणं आणि अगदी मजेत जगणं हेही अपेक्षित आहे. आयुष्य आव्हानात्मक वाटणं, जिवंतपणाची जाणीव असणं, रात्री शांत झोपणं शक्य होणं हेदेखील यशाचं द्योतक आहेत. यामध्ये कंटाळा, छळ, ताण यांचा मागमूसदेखील असत नाही. या पुस्तकात मी या सर्व गोष्टींकडे पाहणार आहे आणि त्याद्वारे यशाची परिपूर्ण व्याख्या बांधणार आहे. काही विशिष्ट लोक अशी कोणती कृती, विचार वा संभाषण करतात; ज्यामुळे ते प्रचंड उंचीवर जाऊन पोहोचतात तर इतर मात्र तसेच गाळात रुतून राहतात?

शेकडो कर्मचारी व व्यवस्थापक यांच्या मुलाखती वर्षानुवर्षं मी घेतल्या आहेत. ते संस्थांमध्ये वेगवेगळ्या भूमिका बजावत होते. त्यात विधी-संस्था, सरकारी खाती, मोठ्या बँका व विम्याची ऑफिसं, जाहिरात कंपनी, व्यवस्थापकीय सल्लागार, धर्मादाय संस्था, हवाई कंपन्या आणि अगदी प्राण्यांच्या उत्पादनांची कंपनी इत्यादी क्षेत्रं येतात.

वेगवेगळ्या ज्ञानशाखांमध्येही काही एकजिनसी विषय दिसून येतात; जिथे ह्या यशस्वी व्यक्तींची हाताळायची, विचार करण्याची, वागण्याची, कृती करण्याची व निर्णय घेण्याची प्रक्रिया साधारण सारखी आहे. अशाच मुद्द्यांचा शोध मी या पुस्तकात घेणार आहे. व्यापक दृष्टिकोन आणि तशाच

वर्तणुकीमुळे अनेक क्षेत्रांत व विद्याशाखांत उच्चस्तर कामगिरी झालेली दिसून येते. तुम्ही काय बदलू शकता, कशावर प्रभाव पाडू शकता आणि सर्वोत्तम कामगिरीसाठी काय करू शकता, तुमचं संभाव्य सामर्थ्य कसं मिळवू शकता यांवर मी लक्ष केंद्रित केलं आहे. असेच माझ्याबरोबर राहा.

**यशाचं शास्त्र व कहाण्या**

संशोधक थॉमस एडिसनचं एक वचन प्रसिद्ध आहे. प्रतिभाशाली व्यक्ती म्हणजे ९९ टक्के श्रम असतात आणि फक्त १ टक्का उत्स्फूर्तपणा असतो. सफल झालेल्या ज्या लोकांच्या मुलाखती मी घेतल्या, ते सर्व जण त्यांच्या श्रमांविषयी बोलले. यशस्वी लोक प्रचंड परिश्रम घेतात. पण कष्ट करणारी सगळीच माणसं नेहमीच यशस्वी होत नाहीत. कारण नुसतीच ढोरमेहनत करणं आणि योग्य गोष्टींसाठी परिश्रम घेणं यांत खूप फरक आहे आणि हे पुस्तक त्याबद्दलच आहे. सर्वोत्तम लोक इतरांपेक्षा वेगळे कसे हे सूचित करणारे सूक्ष्म, मार्मिक; पण महत्त्वाचे भेद आहेत.

**तुमच्या कल्पनेप्रमाणे यशाचा अभ्यास वर्षानुवर्षं संशोधकांना आकर्षित करत आला आहे. उत्तुंग झेप घेणाऱ्या व्यक्तींकडे वेगळेपण असतं. त्यांची वर्तणूक व एकंदर तंत्र यांकडे जगभरातील शास्त्रज्ञांचं लक्ष वेधलं आहे. कसलाही शास्त्रीय पुरावा नसताना आपण स्वतःला साहाय्य करण्याचा आव आणतो आणि स्वतःचीच फसवणूक करतो. म्हणून संपूर्ण पुस्तकात जगातलं उत्कृष्ट संशोधनही दाखवणार आहे. त्यातून काय उपयोगाचं आहे आणि काय नाही याचंही प्रात्यक्षिक दिसतं.**

यश मिळवलेल्या अनेक कथा मी प्रत्यक्ष यशकर्त्यांकडून ऐकलेल्या आहेत. म्हणून त्यांपैकी काही गोष्टी मी तुम्हाला सांगणार आहे. ज्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यातल्या काहींची नावं बदलली आहेत. प्रसंगानुरूप काही हळव्या गोष्टीही त्यांनी सांगितल्या आहेत. काही मोठ्या संस्थांनी ठरवलंय की, कोणालाही ते खास वागणूक देणार नाहीत. त्यांना भीती वाटते की, एखाद्या व्यक्तीनं उत्कृष्ट कामगिरी केलीय असं म्हटलं, तर आपल्याला वगळून टाकलंय, आपण कुणी खास नाही असं इतर सहकाऱ्यांना वाटू शकेल. सुदैवानं मी ज्या व्यावसायिकांच्या मुलाखती घेतल्या, त्यांपैकी बहुतांशी लोकांचा स्वतःच्या मालकीचा व्यवसाय होता. त्यांचे स्वतःचे नियम होते. त्यांची खरी नावं व तपशील मला वारंवार वापरता आले. माझा असा

दावा नाही की, खातरीने यश मिळेल अशी काही गहन गुपितं मी सांगतोय. पण मी शास्त्रीय आधार वापरून सफल माणसांच्या कहाण्या उलगडत जाईन. आयुष्यात भरभक्कम असं काही मिळवण्यासाठी असामान्य लोकांकडे असं काय आगळंवेगळं आहे त्याचं चित्र यातून समोर येईल आणि तुम्हालादेखील 'अधिक' काही मिळवता येईल.

## असामान्य लोकांच्या क्षमता

अनेक सल्लागार, शिक्षणतज्ज्ञांना 'सामर्थ्य' ही संज्ञा वापरायला आवडते. त्यातून ते यशस्वी लोकांची कौशल्यं व वर्तणूक यांचं वर्णन करतात. पण मला हा शब्द आवडत नाही. नुसतंच सामर्थ्यवान कुणाला व्हायचंय? खातरीने आम्हाला तर असामान्य, विशेष, अद्वितीय व्हायचं आहे, नाही का?

वेगवेगळ्या प्रकारच्या वर्तणुकीलाच 'क्षमता' असं म्हणणं मला आवडतं. कारण ही अशी कौशल्यं आहेत, जी आपल्या सर्वांकडे आहेत. अधिक व्यापक अर्थानं बोलायचं झालं, तर असामान्य लोकांचा वेगळा वर्ग कशानं होतो? आजच्या सांस्कृतिक सरमिसळीच्या, आत्यंतिक तणावाच्या, तरीही सुधारित तंत्रज्ञानाच्या जगात अशा आठ क्षमता आहेत ज्यांच्यामुळे हा फरक पडतो.

✦ **प्रभुत्व** – असामान्य लोक जन्मतःच अधिक सर्जनशील असतात. जोडीला ते सजगपणे नवीन अनुभवांचा शोध घेत स्वतःच्या कल्पनाशक्तीला इंधन पुरवतात आणि मनाची दारं जाणीवपूर्वक उघडी ठेवतात किंवा नवीन शक्यतांच्या शोधात असतात. स्वतःच्या क्षेत्रात, उद्योगात आपल्याला सारंकाही कळतंय अशा कल्पनेत ते रमत नाहीत. ते नेहमीच जिज्ञासू असतात. शिकण्यासारखं, विचार करण्यासारखं खूपकाही आहे याची त्यांना सातत्यानं जाणीव असते.

✦ **जोपासना** – आपल्याकडे उपजतच असा गुण असतो ज्यामुळे इतर लोकांच्या भावना, त्यांना काय वाटतं ते आपण जाणून घेऊ शकतो किंवा ते काय विचार करत असतील ते आपल्याला समजू शकतं. पण हे कौशल्य वापरण्यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. हे नेहमीच आपसूक येत नाही. उत्तम कामगिरी करणारे लोक इतर लोकांच्या भावना, मन समजण्यासाठी, लक्षपूर्वक ऐकण्यासाठी पुरेसा वेळ देतात. कारण त्यातून परस्परांमधील मतभेद, वादाचे मुद्दे कमी करण्यास त्यांना मदत

होते. ते इतरांवर प्रभाव पाडतात व त्यांचं मन वळवतात.

✦ **अस्सलपणा** – कोणत्याही क्षेत्रात मोठं कर्तृत्व गाजवणारे नेहमी म्हणतात की, ते जे काही करतात त्यावर त्यांचं प्रेम आहे. अस्सलपणा ही स्वत:च्या अंत:प्रेरणा शोधण्याची, कधीकधी आपल्यातलीच सुप्त शक्ती शोधण्याची पात्रता आहे. त्यातून मग आपल्याला, आपलं काम व वैयक्तिक गोष्टी दोन्हींमध्ये 'जिवंतपणा' व समाधान या दोन्हींची जाणीव होते. दैनंदिन जीवनातही ज्या लोकांची उत्कट भावना असते, ते रोजच स्वत:ला समरसून झोकून देतात आणि असामान्य परिणाम साधतात.

✦ **केंद्रीकरण** – उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांकडे लक्ष केंद्रित करण्याचीही क्षमता असते. टोकाच्या विपरीत परिस्थितीत काम करतानाही ते आपल्या प्रेरणा टिकवून ठेवतात. वैयक्तिक अपेक्षाभंग आणि कामातील आकस्मिक आपत्ती या दोन्हींतूनही ते चटकन सावरतात. नैराश्य व राग अशा अतिशय विषारी भावनांना हाताळतानाही ते त्यांचं भावनिक संतुलन राखतात त्यामुळे त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येते.

✦ **अनुसंधान** – दुसऱ्यांसमवेत काम करताना प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याची जाणीव या उत्कृष्ट काम करणाऱ्यांना असते. सहकार्य, भागीदारी, संघभावना, संपर्कजाळे आणि संयुक्त पक्ष या सगळ्यांची ते कदर करतात आणि त्याचा शोधही घेतात. प्रत्येक गोष्ट स्वत:वरच ओढून घेण्यापेक्षा ती दुसऱ्यांमध्ये विभागतात, मदतीची विचारणा करतात आणि एकमेकांना समृद्ध करणारे नानाविध नातेसंबंध उभारतात.

✦ **धाडस** – अनेक लोक अपयशाच्या कल्पनेलाच घाबरतात, पण असामान्य लोक अशा अपयशी काळातही संधींचा लाभ घेण्यास जाणीवपूर्वक तयार असतात. जबाबदारी घेण्यास निवळ बंधमुक्त अशा शोधकार्यातून जेव्हा संधी चालून येतात, त्यामधून आणि काही प्रसंगानुरूप चुका करूनही ते खरोखर स्वत:ला पुढे नेऊ शकतात हे त्यांना समजलं असतं आणि मग त्यातून काहीतरी विशेष घडून येतं.

✦ **नागरिकत्व** – चांगल्या नागरिकत्वाचं कौशल्य आत्मसात करणारे असामान्य लोक त्यांचं काम आणि आयुष्याच्या भव्य पटाबद्दल विचार करतात. ते जे काही करतात, त्याच्या इतरांवर होणाऱ्या व्यापक परिणामांचा ते विचार करतात. त्यांच्याकडे सचोटी असते. ते जबाबदारीनं व नीतिमत्तेनं वागतात. फक्त महिना, दोन महिन्यांच्या कालावधीपुरतं सीमित न राहता ते दूरदृष्टीनं वर्षं व दशकांचा विचार करतात.

✦ **दृष्टीकोन** – आपण आयुष्यात जे काही मिळवणार आहोत, घडवणार

आहोत त्याविषयी समतोल दृष्टी निर्माण करण्याची क्षमता म्हणजे दृष्टिकोन. तसं पाहिलं, तर अनेक लोक महत्त्वाकांक्षी व बुद्धिमान असतात. पण असामान्य लोक अंतर्दृष्टीनं समजून घेतात की, त्यांना कोण व्हायचं आहे, दैनंदिन आयुष्य जगत असताना त्यांना काय मिळवायचं आहे. कारण यश म्हणजे नुसतं यशस्वी असणं नव्हे, तर यश व परिपूर्णता या दोन्हींमुळे मिळणारं समाधान आहे याची जाणीव असणं आहे. हे यश भविष्यातल्या ध्येयांबाबत काम करताना प्राप्त होतं आणि रोजच्या जगण्यातल्या घटनांमधून आनंद शोधण्यानं, त्यात रूची निर्माण करण्यानंही मिळतं.

स्वयंप्रकाशी ताऱ्यांकडे या क्षमता असल्या, तर इतर तारकापुंजापेक्षा ते वेगळे ठरतात. हे दाखवण्यासाठी मी शास्त्रीय पुरावा वापरणार आहे. मला खातरी आहे की, हे सगळं नजीकच्या भविष्यकाळात अपरिहार्य ठरणार आहे. कारण जागतिक स्पर्धा आणि बदलांची गती सातत्यानं वाढत जाणार आहे.

## पुस्तक वाचन आणि योजनेचा पाठपुरावा

कलावंत, प्रतिभाशाली व्यक्तींविषयी वाचणं, त्यांच्याकडची कौशल्यं, कार्याची पद्धत जाणून घेणं हे उन्नती घडवणारं, थरारून टाकणारं असतं यात काही शंकाच नाही. तुम्हाला फक्त करमणूक हवी असेल, तर तुम्ही हे पुस्तक जरूर वाचा.

या पुस्तकात समाविष्ट असलेल्या गोष्टी प्रत्यक्ष अमलात आणण्याची तुमची जर इच्छा असेल, तर पुस्तकाचा उपयोग करून घ्यावा लागेल. आपल्याकडे उपलब्ध असलेलं संशोधन व ज्ञान यांवर आधारित काही व्यावहारिक तंत्रं मी सुचवली आहेत. त्याद्वारे तुमच्या ध्येयापर्यंत पोचण्यास मदत होईल. मग तुम्ही भरभराटीला आलेले व्यावसायिक, व्यवस्थापक, पालक, निधी उभा करणारे किंवा इतर कुणीही असा. मी, 'हे फक्त तुमच्याकरता' या चौकटींचा समावेश केला आहे. ज्यात तुम्ही जे काही वाचलं, त्याचा विचार करता येईल किंवा मिनिटभरात करता येण्यासारखी कृती प्रत्यक्षात आणता येईल.

**'तुमच्यामधील सर्वोत्तम' या चौकटी तुम्हाला अधिक खोलात जाऊन काही स्वाध्याय व प्रयत्न करण्यासाठी तंत्र पुरवतील. त्याला जास्त वेळ लागेल; पण अधिक प्रभावी बनण्यासाठी, चांगले निर्णय घेण्यासाठी आणि तुमच्या ध्येयापर्यंत पोचण्यासाठी त्यामुळे मदत**

**होईल. संपूर्ण एकसंध पुस्तक पाहिलंत, तर तुम्हाला समंजस, सुज्ञ, कसलाही अनुनय न करणारा असा सल्ला सापडेल; जो तुम्हाला तुमच्या किंवा तुमच्या अवतीभोवतीच्या लोकांमधील सामर्थ्य आजमावण्यासाठी उपयोगी पडेल.**

**तर मग करू या का आपण सुरुवात?**


★

**आगामी**

# क्षितिजापार

मूळ लेखक
फराह अहमदी । तामिम अन्सारी

अनुवाद
विनिता जोगळेकर





फराह अहमदीची ‘तग धरून राहाण्याची मर्मभेदक कहाणी, तिचा युद्धाकडून शांततेकडे झालेला प्रवास आपल्याला उलगडून दाखवते. जितकं दुःख तितकीच आशा, जितका निश्चय तितकंच साहस, अहमदीचं अनुभवकथन, तिचं काबुलमधील बालपण आपल्या दृष्टीसमोर हुबेहूब साकार करत, तोफांचे धडधडाट आणि बॉंब गोळ्यांचा वर्षाव या पार्श्वभूमीवरच फराह लहानाची मोठी होत असते आणि हीच परिस्थिती तिच्या कुटुंबाला तिच्यापासून हिरावून घेते. तिचा पाय चुकून एका भू सुरुंगावर पडतो आणि ती मरता मरता वाचते; पण पाय गमावते. अफगाणिस्तानातले पर्वत उल्लंघून जायला युद्ध तिला भाग पाडतं. सरहद्दी पलीकडच्या निर्वासितांच्या छावणीत ती प्रथम आश्रय घेते आणि शेवटी अमेरिकेत पोहोचते. प्रतिकूल परिस्थितीत एखादी व्यक्ती जिद्दीनं कशी तग धरून राहू शकते; इतकंच नव्हे तर आपली उन्नतीही करून घेऊ शकते हेच अहमदीनं सिद्ध केलंय.

**आगामी**

# अतरापी

मूळ लेखक
ध्रुव भट्ट

अनुवाद
सुषमा शाळिग्राम





तशी सकृत्‌दर्शनी ही दोन भावांची-कुत्र्यांची-कथा... एक भाऊ स्वतंत्र विचारांचा... त्याचं आयुष्य एक खळाळता प्रवाह असतो; नात्यांना, विकारांना न जुमानणारा. आयुष्य समरसून पण अलिप्तपणे जगणारा... दुसरा भाऊ सरळमार्गी आयुष्य जगणारा... नातेसंबंध जपणारा; रूढी, परंपरा, नीतिनियम यांचं पालन करणारा... आध्यात्मिक विचारांचा... त्या भावांचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास ही ‘अतरापी’ची कहाणी. हे भाऊ जन्माला येणाऱ्या जीवांचं प्रातिनिधिक रूपक आहे. ओघवत्या, रसाळ शैलीतली ही ‘वेगळी’ कादंबरी वाचकांना अंतर्मुख व्हायला, विचार करायला प्रवृत्त करते.

सृष्टिकर्त्याच्या इच्छेने जन्म घेणारा जीव असतो परका...
तिऱ्हाईत... एक अतरापी!




# एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट

**बंदिजनांच्या बगीच्यातील संजीवन!**




मूळ लेखक : थॉमस फ्रेंच

अनुवाद : मयुरी गांधी

पृष्ठे २९२ । किंमत ३०० रु. । पोस्टेज ३० रु. । सभासदांना सवलतीत

# थॉमस फ्रेंच याने सांगितलेली
# एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट

**'मला माहीत आहे की, लोकांना प्राणिसंग्रहालयाविषयी फारशी आत्मीयता नाही.**
**सांप्रत स्थितीत धर्मश्रद्धादेखील याच समस्येशी सामना करते आहे.**
**'स्वातंत्र्य' या संकल्पनेविषयीच्या काही आभासी कल्पनांनी दोघांनाही ग्रासले आहे.''**

– यान मार्टेल
**लाइफ ऑफ पाय**

## अकरा हत्तींचा विमानप्रवास

ताम्पा येथील लॉवरी पार्क प्राणिसंग्रहालयासंबंधी तसेच आफ्रिका, पनामा व न्यूयॉर्कमधील केलेल्या वृत्तान्तलेखनावर आधारित हे एक वास्तवदर्शी लिखाण आहे. यामध्ये मानव आणि प्राणी दोघांच्याही जीवनाचा व जगण्याचा मागोवा घेत असताना वापरलेली नावे व तपशील हे कल्पनानिर्मित नसून पूर्णपणे खरे आहेत. त्यामधील अनेक प्रसंगांचा मी स्वत: समक्षदर्शी आहे, तर बऱ्याच संवादांचा मी प्रथम श्रोता आहे. तथापि काही प्रसंगांची रचना ही संबंधित व्यक्तींच्या मुलाखती व त्या संदर्भात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे केली आहे. काही मानवी व्यक्तींच्या विचार व भावनांचे वर्णन हे त्यांच्या अनेक वर्षांच्या स्नेहमयी सहवासातून साकारले आहे. प्राण्यांच्या अंतर्मनाचे आलेखन तर अशक्यच म्हणावे लागेल. तथापि प्राण्यांचे संवेदन, संप्रेषण (संवादक्षमता) आणि वर्तन यासंबंधीचे विस्तृत वाचन, माझ्या स्वत:च्या प्रत्यक्ष अनुभवातील निरीक्षणे तसेच प्राण्यांबरोबर जपलेल्या जवळीकतेतून त्यांना जाणणारे त्यांचे रक्षक किंवा इतर व्यक्ती यांच्या मुलाखती आणि प्राण्यांचा इतिहास यांचे केलेले सविस्तर आकलन या गोष्टींवर आधारित प्राणिजीवांच्या मनातील अज्ञात दिशा-रेषांचा माग काढण्याचा मी या पुस्तकात प्रयत्न केला आहे.

# झेप नवीन विश्वाकडे

अकरा हत्ती आणि एक विमान आकाश मार्गाने वेगाने जात होते. ऐकायला जरी हे काल्पनिक स्वप्नासारखे वाटले, तरी ते एक सत्य होते. हत्तींची ११ छोटी पिल्ले घेऊन बोईंग ७४७ हे विमान दक्षिण आफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंतचा अनेक तासांचा लांब पल्ल्याचा प्रवास करत होते. या हत्तींच्या पिल्लांकरिता तर हा प्रवास आगळा-वेगळाच होता. कारण हत्तींच्या या ११ पिल्लांना सर्कशीतील प्राण्यांप्रमाणे बंदिवासाची सवय नव्हती. ती सर्व आफ्रिकेतील स्वाझीलॅन्डच्या जंगलात जन्मलेली अरण्यवासी पिल्ले होती. मोठ्या कष्टाने व खूप खर्च करून त्यांना त्यांच्या कळपापासून वेगळे केले होते. ते सगळे अमेरिकेतील सॅनडिएगो व ताम्पा येथील प्राणिसंग्रहालयाकडे प्रवास करत होते.

ती तारीख होती, २१ ऑगस्ट, २००३. गुरुवारची ही सकाळ खूपच रेंगाळल्याप्रमाणे वाटत होती. बोईंग जेट विमानाच्या लांब गुहेसारख्या बोळकांडीतील अंधूक प्रकाशात लोखंडी पिंजऱ्यामध्ये या ११ पिल्लांना बंद करण्यात आले होते. विमानात चढवण्याच्या अगोदर त्यांना गुंगीचे औषध देण्यात आले होते. आताही ती सगळी पिल्ले गुंगीतच होती, म्हणूनच त्यांना भूकही जाणवत नव्हती. काही जण एका कुशीवर झोपले होते, तर इतर काही पिंजऱ्यात उभे राहून पिंजऱ्यासमोरून येरझारा घालणाऱ्या त्यांच्या रक्षकांच्या दिशेने आपल्या सोंडा वळवत होते. त्यांचे रक्षक पुन:पुन्हा त्यांना पाणी देत होते आणि धीराचे गोड शब्दही बोलत होते. मिक रेली त्यांना सांगत होता, ‘‘बाळांनो शांत राहा. सगळं काही ठीक होईल.’’

आफ्रिकेच्या जंगल-झाडोऱ्यात लहानाचा मोठा झालेल्या माणसाचा असतो तसा मिक रेलीचा रंग सावळा चकचकीत होता. फिकट भुऱ्या रंगाचे केस असणारा हा मिक फक्त ३२ वर्षांचा होता. आताही त्याने जंगल सफारीसाठी वापरतात तसेच खाकी कपडे घातले होते. चेहऱ्यावर शांत, दृढआत्मविश्वास दिसत होता. हाता-पायावर जंगलबाभळीच्या काट्यांचे ओरखडे स्पष्ट दिसत होते. आफ्रिकेतील पठारी कुरणातील लाल मातीने आत्तादेखील त्याचे जीर्ण बुट माखलेले होते.

जंगलातील पुरुषभर उंचीच्या घायपात व निलगिरीच्या गवतामधून सिंह, गेंडे, रानम्हशी यांचा मागोवा घेणे, त्यांच्या पिल्लांची अचूक मोजदाद करत त्याचे दिवस-दिवस फिरणे, त्याचबरोबर एके ४७ सारखी घातकी शस्त्रे

बाळगणाऱ्या चोरट्या शिकाऱ्यांचा शोध घेणे, इत्यादीबाबी मिकच्या देहबोलीमध्ये सहजच व्यक्त होत होत्या.

आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला, सर्व बाजूंनी जंगल व जमीन यांनी सीमित झालेली स्वाझीलॅन्डमधील दोन हत्ती अभयारण्ये मिक व त्याचे वडील चालवत होते. आत्ता बोईंग विमानात प्रवास करत असलेली हत्तींची ११ पिल्ले ही मिकबरोबरच लहानाची मोठी झालेली होती. या पिल्लांना मिकचा वास कळत असे, तर मिकला त्यांची भाषा समजत असे. तो त्यांच्यापैकी प्रत्येकाला नावाने ओळखत होता. त्यांच्या कौटुंबिक इतिहासाबरोबरच त्यातील कोण अधिक चिडखोर आहे, कोण अधिक सौम्य आहे, कळपामधील त्याचे स्थान काय आहे, इत्यादी सर्व गोष्टी तो जाणून होता. प्रवासादरम्यान त्या पिल्लांकडे पाहाताना तो विचार करत होता, 'काय विचार करत असतील ही सर्व पिल्ले?' त्यांना विमानाची घरघर तर स्पष्टच ऐकू येत असणार. समुद्रसपाटीपासूनची उंची व हवेच्या दाबात झालेला बदल तसेच त्यांच्या जाडजूड पावलांत असणाऱ्या मऊसर गादीमधील अतिसंवेदनशील मज्जातंतूमार्फत विमानाची होणारी कंपनेदेखील त्यांना जाणवत असणार. पण या सगळ्या फुटकळ व विखुरलेल्या संवेदनांचा अर्थ ते काय आणि कसा लावत असतील? आपण विमानातून प्रवास करतो आहोत, हे त्यांना समजत असेल का?

मिक पुन:पुन्हा त्यांना सांगत होता, ''सगळं अगदी ठीक होईल, काही काळजी करू नका.''

परंतु सर्वांनीच त्याच्या या आशावादाशी सहमत व्हावे, अशी परिस्थिती नव्हती. आणि मिकला त्याची पूर्ण कल्पना होती. एकतर या विमानप्रवासाअगोदर घडलेल्या अनेक घटनांना सामोरे जाताना मिकची अतिशय दमछाक झाली होती. आफ्रिका की जिथून हे प्राणी निघाले होते व अमेरिका की जिथे ते जाणार होते, या अटलांटिक महासागराच्या परस्पर विरुद्ध किनाऱ्यावर असणाऱ्या दोन देशांमधील प्रवासाअगोदर या दोन्ही देशातील प्रदीर्घ व किचकट अशी कायद्याची प्रक्रिया पार पाडावी लागली होती. याच दरम्यान दोन्ही देशातील प्राणी हक्क संघटनांनी या हत्ती स्थलांतराला प्रचंड विरोध केला होता. ज्या लोकांनी कधी स्वाझीलॅन्डमध्ये पाऊल ठेवले नव्हते, तेथील अभयारण्यात नेमके काय घडते आहे, याची तिळमात्र ज्यांना कल्पना नव्हती, अशा प्राणिप्रेमींमार्फत दाखल केलेल्या

खटल्यांना, दया अर्जांना व धिक्कारपत्रांना स्पष्टीकरणे, उत्तरे देऊन तो जेरीस आला होता. स्वाझीलॅन्डमध्ये हत्तींची संख्या इतकी वाढली होती की, त्यांच्याकडून वृक्षसंपदा नष्ट होत होती, जंगलाचा ऱ्हास झाल्याने जंगलातील इतर प्राणिप्रजातीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत होता. एकतर काही हत्तींना ठार करावे किंवा एखाद्या प्राणिसंग्रहालयात त्यांना नवीन घर निर्माण करून द्यावे इतकी निकराची परिस्थिती निर्माण झाली होती. सध्यातरी माइकला हा दुसरा पर्यायच योग्य वाटत होता. पण अनेक प्राणी अधिकार मांडणाऱ्या गटाकडून असे मत व्यक्त होत होते की, त्यांनी प्राणिसंग्रहालयाच्या बंदिवासात जगण्यापेक्षा जंगलाच्या स्वतंत्र, मुक्त वातावरणात स्वअस्तित्वाकरिता झगडत मरणे, अधिक योग्य आहे.

असे जीवनाहून मरणाला सरस मानणारे तर्कशास्त्र मिकला मान्य नव्हते. अशी स्वातंत्र्याची भाषा जणू जंगलातून खळाळणारी शुद्ध पण काल्पनिक नदी आहे जिच्या तीरावर जंगलातील सर्व प्राणिमात्र सुखाने एकत्र नांदत आहेत. जिथे मानव व प्राणी यांच्या संख्येचे ओझे रोज वाढते आहे, जिथे मोकळी जागा दिवसेंदिवस आक्रसते आहे, जिथे दर दिवशी अनेक जीव संपुष्टीपर्यंत पोहोचत आहेत, अशा या पृथ्वीवरती स्वातंत्र्याची स्पष्ट व्याख्या करणे तर खूप कठीण आहे. कोणत्याही एका जीवाला स्वत:च्या इच्छेनुसार आपली संख्या वाढवून दुसऱ्या जीवाला विनाशाकडे नेण्याचा इथे अधिकार आहे का?

मिकला तर इतकेच ठाऊक होते की, निसर्ग हा अस्तित्वाचा विचार करतो, आदर्शांचा नाही. आत्ता या विमानातून प्रवास करणाऱ्या हत्तींच्या ११ पिल्लांना त्यांचे अस्तित्व टिकवण्याची अशीच एक संधी देण्यात येत होती.

मिकच्या कुटुंबाने या पिल्लांना अशा तऱ्हेने प्राणिसंग्रहालयात रवाना करण्याचा निर्णय घेण्याअगोदर मिकने दोन्ही प्राणिसंग्रहालयांना भेट देऊन तिथे उपलब्ध असणाऱ्या सर्व सुविधा चांगल्या तपासल्या होत्या. पिल्लांना सांभाळणाऱ्या रक्षकांशीही संवाद साधला होता. त्याची पूर्णपणे खातरी झालेली होती की, नवीन प्राणिसंग्रहालयात पिल्लांना वावरायला पुरेशी जागा मिळणार आहे, त्यांना प्रेमाने व काळजीने मानवतेची वागणूक मिळणार आहे. अर्थात एका सर्वज्ञात विश्वातून दुसऱ्या अज्ञात विश्वाकडे होणाऱ्या स्थित्यंतराशी ही पिल्ले किती समायोजन साधतील हे सांगणे मात्र कठीण होते. हत्ती जंगलामध्ये अनेक मैलांच्या टापूत विहार करतात. ते अतिशय

सूज्ञ, स्वत्वाची जाण असणारे, भावनाप्रधान प्राणी असतात. ते परस्परांशी रागाची, प्रेमाची नाती जोडतात आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या प्रजातीकडे एक सक्षम अशी स्मृती असते. कोणतीही गोष्ट, व्यक्ती किंवा कोणताही प्रसंग ते दीर्घ काळ लक्षात ठेवू शकतात.

या स्थलांतरानंतर या हत्तींच्या ११ पिल्लांना जेव्हा जाणवेल की, त्यांच्या सभोवताली उगवणारे व मावळणारे दिवस-रात्र बदलले आहेत, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया कशी असेल? निसर्गाने जी काही आकलन क्षमता त्यांना प्रदान केली आहे त्यानुसार जेव्हा त्यांना कळेल की, ते पुन्हा कधीही त्यांची जन्मभूमी – आफ्रिका, पाहू शकणार नाहीत, या स्थलांतराच्या प्रक्रियेतून जरी त्यांची सुटका झाली तरी माणसाचा गुलाम म्हणून काम करणे, हे एकच त्यांचे प्राक्तन असणार आहे, तेव्हा....

असे हे सजीव सामान घेवून बोईंग ७४७ पश्चिम दिशेकडे झेपावत होते.

तिकडे आफ्रिकेतील गवताळ कुरणांना सूर्यास्ताबरोबर जाग येत आहे. अंधारणाऱ्या उजेडातून सर्वदूर पसरणाऱ्या संध्याकाळी ॲनविल वटवाघळांचा फळांचा शोध सुरू होतो आहे. झाडांवर कुठेतरी बुश बेबी कुरकुरत आहेत. दूर पूर्वेला मोझांबिक देशाच्या उंबरठ्यावर काळीशार मखमल पांघरून लेबोंबो पर्वतरांगा उभ्या आहेत.

मखाया अभयारण्यात माथ्यावर गोल गरगरीत चंद्र उगवला आहे. एरवी डेरेदार असणाऱ्या छत्री बाभळीचा उरला-सुरला पर्णसंभार तोडून चघळत हत्तींचा एक कळप रमतगमत चालला आहे. आत्ता विमानात असणारी हत्तींची पिल्ले आत्तापर्यंत त्यांचे घर असलेल्या स्वाझीलॅन्डच्या मखाया अभयारण्यातील अशाच एका हिरव्यागार प्रदेशातून आणलेली आहेत. प्राणिसंग्रहालयाकडे नेल्या जाणाऱ्या या ११ पिल्लांच्या भविष्याबद्दल कोणताही उजवा-डावा विचार करण्याआधी त्यांचा मूळ प्रदेश कोणता होता, या अतर्क्य प्रवासाअगोदर त्यांचे वास्तव काय होते, नेमक्या कोणत्या समस्येने त्यांना इथपर्यंत पोहोचवले आहे, हेही जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

मखाया अभयारण्यातील संध्याकाळची रपेट मोठी नाट्यमय असते. सोनेरी उन्हाच्या एखाद्या तिन्हीसांजेला तुम्ही लॅन्डरोवरमध्ये आरूढहोता, अभयारण्यातील धुळीच्या रस्त्याने हत्तींचा शोध घेत तुम्ही पुढे जात असता. मखाया अभयारण्यात हत्तींचा कळप बऱ्यापैकी मोठा असतो. एका कळपात छोटी पिल्ले धरून सोळापर्यंत संख्या असू शकते. हत्ती हा पृथ्वीवरील

आकाराने सर्वांत मोठा प्राणी असला तरीदेखील जंगलामध्ये त्याला शोधणे अनेक वेळेला कठीणच असते. कारण तो आश्चर्यकारकरित्या हळुवार चोर-पावलांनी वावरत असतो.

जसा अंधार अधिक दाटतो तसे परिसरात इतर प्राण्यांचे अस्तित्वही जाणवू लागते. झेब्रा व इतर प्राण्यांच्या कळपांच्या वावरामुळे सभोवताली धुळीचे ढग दिसू लागतात. केप बफेलोला त्यातून धोक्याची जाणीव होते. लागलीच शिंगे उभारून ती आपल्या बछड्यासाठी संरक्षणाचा पवित्रा घेते. जिराफ आपले मोठे तपकिरी डोळे विस्फारून झाडांच्या माथ्यावरून सभोवताली कानोसा घेतात. क्षणभराने निश्चिंत होवून ढेंगाळ्या पायांनी सावकाश पावले टाकत पुढे चरत जातात. पण या सर्वांमध्ये हत्ती मात्र दिसत नाहीत.

एक-दोन तास असेच सरतात. पर्यटक चिंता करू लागतात की, या अवाढव्य प्राण्याचे आज दर्शन तरी होणार की नाही आणि अशा वेळी अचानकपणे एक मोठा कळप त्यांच्या अगदी समोरच अवतरतो. गाडीच्या चालकाने अनवधानाने नेमकी एका हत्तींच्या कळपातच गाडी घातलेली असते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला राखी काळपट रंगाचे अवाढव्य हत्ती भूत-पिशाचाप्रमाणे सभोवताल घेरतात. झाडे तोडत, फांद्या मोडत, मुरगाळत, झाडांचे बुंधे सोंडेने सोलत अगदी आनंदात या हत्तींची खाद्यभ्रमंती सुरू असते. लॅन्डरोवर जशी फुसफुसत बंद होऊन स्थिर होते, तसे त्या हत्तींचे पसरट रुंद चेहरे या आगंतुक मानव प्राण्याकडे वळतात. दोन छोटी बछडी घाईघाईने आई व मावशीच्यामध्ये आसरा शोधतात. कळपाच्या म्होरक्याची सोंड चंद्रप्रकाशात चमकत असते. सावलीतून तो जवळच्या लेपर्ड गवतात सरकतो.

गाडीत मागच्या सीटवर बसलेली एक महिला हत्तींच्या दिशेने हात पसरून एकदम उद्गारते, ‘अरे हा बघ माझा बाळ. दादा मला हॅलो कर बरं!’

त्या म्होरक्याला ही जणू पुढे होण्याची सूचनाच वाटते. आरामात तो रस्त्यावर येतो आणि लॅन्डरोवरच्या दिशेने चालत राहातो. तो चिडलेला नसतो, पण त्याचा आग्रहीपणा निश्चितच लपून राहात नाही. गाडीचा चालक तत्परतेने गाडी सुरू करतो, रिव्हर्स गियर टाकतो. गाडी मागे घेऊ लागतो, तर आरशात गाडीच्या मागे उभी असलेली हत्तीण त्याला दिसते. त्या हत्तीणीनेही तितक्याच चपळाईने झाडाची एक फांदी मोडून माणसांचा मार्ग

अडवलेला असतो.

आता गाडीचालकही अधिक चपळाईने हालचाल करतो. वेग कमी न करता तसेच रिव्हर्समध्ये राहून ती हत्तीण व तिने घातलेला अडथळा यांना एक लांब वळसा घालतो. झाडाझुडपांना धडकत, अडखळत आधी एका टेकाडावरून नंतर एका कोरड्या नदी पात्रातून, मागून कोणीही पाठलाग करत नाही, याची खातरी होईपर्यंत गाडी तशीच मागे घेत राहातो.

लॅन्डरोवरमधील प्रवासी धोक्यातून बाहेर आल्यावरदेखील झाल्या घटनेवर गोंधळून विचार करत राहातात. मनातील प्रश्न सहजच ओठावर येतो, ''ते हत्ती नेमके काय करत होते?'' मार्गदर्शकालाही थोडी चेष्टेची लहर येते. तो हसून म्हणतो, ''काही नाही, तिचा थोडा खट्याळपणा होता तो. हत्तींकडे इतरांना समजणार नाही, अशी विनोदबुद्धी असते.''

''हा काय केवळ खट्याळपणा होता?''

पुन्हा खांदे उडवून मार्गदर्शक म्हणतो, ''हो, हे निश्चित की ती हत्तीण आपला मार्ग अडवण्याचा प्रयत्न करत होती. हत्तींच्या कळपात अशी गाडी घालणे ठीक नसतेच. त्यांना आपल्या कळपातून कुणी गाडी चालवावी हे अजिबात पसंत नसते आणि हे त्यांचे म्हणणे तुम्ही ऐकले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो.''

मग कॅम्पकडे परतत असताना निवांत क्षणी तो स्पष्ट करतो की, खूप संतापलेले हत्ती बेफाम होतात, नियंत्रणाच्या बाहेर जातात . पुढे तो पूर्वी घडलेला एक प्रसंग सांगतो. हत्तींच्या कळपावरून जाणाऱ्या हेलिकॉप्टरच्या चालकाने ते हेलिकॉप्टर हत्तींच्या अगदी जवळून नेले. त्या हत्तींना याचा इतका राग आला की, त्यांनी आपल्या सोंडेने छोटी झाडे तोडून हेलिकॉप्टरच्या दिशेने भिरकावण्याचा प्रयत्न केला.

परंतु मखाया अभयारण्यातील माणूस व हत्ती यांच्यातील संघर्ष खूप सौम्य स्वरूपाचा आहे. लॅन्डरोवरमधून कॅमेरे घेऊन येणाऱ्या असंख्य पर्यटकांना न्याहाळण्याची मजा इथले हत्ती दररोजच घेत असतात. कित्येकदा माणूस प्राण्याबद्दलचे कुतूहल त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते. काही फुटांच्या अंतरावरती उभे राहून ते आपली सोंड पुढे करतात. परंतु तरीसुद्धा जेव्हा कधी हत्ती व माणूस या दोन प्रजाती एकमेकांसमोर येतात, तेव्हा अचानकपणे काहीही अनपेक्षित घडू शकते. एकदा असाच एक सायकलस्वार दुर्दैवाने नेमका एका कळपात घुसला. त्याच्या सायकलच्या खडखड आवाजाने एक

सवत्स हत्तीण एकदम दचकली, भेदरली आणि त्या सायकलस्वारावर धावून गेली. पाठलाग करून तिने त्या सायकलस्वाराला सोंडेत पकडले व ती पुन:पुन्हा त्याला जमिनीवर आपटत राहिली. केवळ 'देव तारी त्याला कोण मारी,' या न्यायानेच तो बिचारा त्यातून कसाबसा वाचला.

आफ्रिकेतील इतर ठिकाणांप्रमाणेच स्वाझीलॅन्डमधील हत्ती 'हत्ती विरुद्ध मानव' या लढाईत कसेबसे तग धरून आहेत. अमेरिकन लोकांची आफ्रिकेबद्दलची अशी कल्पना आहे की, इथे विस्तीर्ण असा भूप्रदेश आहे की, जिथे अनेक प्रजाती अगदी क्षितिजापर्यंत – कदाचित पलीकडे – निर्धास्तपणे आरामात हिंडू-फिरू शकतात. वास्तव हे आहे की, इथेदेखील मानवाने इतका प्रदेश व्यापलेला आहे की, अनेक प्राण्यांचे जगणे केवळ अभयारण्यापुरतेच मर्यादित झाले आहे. ही सर्व अभयारण्ये निश्चितच विस्तीर्ण आहेत – काहीतर अनेक, शेकडो मैल पसरलेली आहेत – तरीदेखील मानवी सीमा, मानवी विस्तार व मानवी प्राधान्यक्रम यामुळे प्राण्यांच्या अस्तित्वावरती मर्यादा येत असलेल्या दिसतात.

जेव्हा एका बाजूला पृथ्वीवरील मानव ही प्रजाती इतर प्रजातींचे अस्तित्व संपुष्टात आणत आहे, त्या इतर प्रजातींचे जगणे संकुचित करते आहे, तेव्हाच दुसऱ्या बाजूला अमर्याद स्वातंत्र्याच्या कल्पनेचा आपण केवळ आधार शोधतो आहोत.

आपापल्या घरात मुलाबाळांसमवेत आपण 'द लायन किंग' पाहात असतो – ज्यात अमर्याद पठारी कुरणांमधून सिंहराज सिम्बा, पुम्बा आणि टिमॉनबरोबर आनंदगीत गात असतात. या सर्वांच्या प्रगाढमैत्रीमधून जीवनचक्र जणू पूर्णत्वास पोहोचलेले भासते. परंतु सत्य हे आहे की, जीवनचक्र प्रतिदिन आक्रसते आहे. आफ्रिकेतदेखील जरी तुम्ही एखादा खरोखरचा सिंह पाहाल तरी तो तारेच्या कुंपणातच असेल, हे निश्चित!

न्यूजर्सीपेक्षा लहान असणाऱ्या स्वाझीलॅन्डमध्येदेखील मानव विरुद्ध इतर प्राणी हा संघर्ष छोट्या स्वरूपात का होईना पण उपस्थित आहेच. कधीकाळी या ठिकाणी हत्ती मुक्तपणे वावरत असले, तरी सध्या मात्र फक्त मखाया अभयारण्य व ल्हाना राष्ट्रीय उद्यान या दोनच ठिकाणी हत्ती आढळून येतात. स्वाझीलॅन्डच्या शेजारील देश व दक्षिण आफ्रिकेतील इतर विस्तीर्ण अभयारण्याच्या तुलनेत ल्हाना व मखाया ही अभयारण्ये खूपच मर्यादित व विस्ताराने छोटी आहेत. या दोन्ही ठिकाणी आढळणाऱ्या हत्तींची संख्या काही

डझनच असेल.

पन्नास वर्षांपूर्वी स्वाझीलॅन्डमध्ये एकही हत्ती नव्हता. एकतर ते शिकाऱ्यांकडून मारले जायचे किंवा त्यांना नैसर्गिक मृत्यू येत असे. अशावेळी मिकचे वडील टेड यांचे या भागामध्ये कार्य सुरू झाले. टेडचा जन्म स्वाझीलॅन्डमधे झाला होता. लहानपणापासूनच सभोवताली फिरणारी काळविटे, मातीमध्ये चोचीने बीळ करून घर करणारे खंड्या पक्षी पाहात इथल्या झाडाझुडपांत तो मोठा झाला. त्याने तरुणपणात घर सोडले, ते आधी पर्यावरण संरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी व नंतर दक्षिण आफ्रिका व झिम्बाब्वे या शेजारच्या देशांमधील अभयारण्यामध्ये क्षेत्ररक्षकाचे काम करण्यासाठी. १९६० साली जेव्हा तो परत आला तेव्हा त्याला जाणवले की, त्याच्या अनुपस्थितीमध्ये बहुतांशी अरण्यजीवनाचा गंभीररित्या ऱ्हास झाला होता. पूर्वी तेथे प्रचंड संख्येने असणाऱ्या बहुविध प्रजाती नाहीशा झाल्या होत्या.

त्या अंतर्धान पावलेल्या सगळ्या प्राण्यांना परत आणण्याचा टेड रेलीने निश्चय केला. सर्वप्रथम त्याने म्लिल्वाना येथील कुटुंबशेती एका वन्यपशू अभयारण्यात रूपांतरित केली. त्याने वृक्षारोपण केले, कुरणे बनवणाऱ्या गवताची पेरणी केली, दलदलीचा प्रदेश निर्माण करण्यासाठी छोटे बंधारे बांधले. आणि मग काही प्राणी स्वत: पकडून म्लिल्वाना येथे आणले. काही प्राणी त्याने दुसऱ्या देशातूनही मागवले. या त्याच्या धाडसाने त्याला प्रचंड प्रतिष्ठा व प्रसिद्धी प्राप्त झाली. जझाबेल नावाच्या त्याच्या जीपमधून इम्पाला व वॉर्टहॉग प्राण्यांच्या शोधात त्याने तिथले जंगल अक्षरश: पिंजून काढले. अनाठायी धाडस करून आत शिरणाऱ्या चोरट्या शिकाऱ्यांवरदेखील करडी नजर ठेवली. विंचू, पाली, बेडकं यांनी स्वाझीलॅन्ड संपन्न केले. लंडन प्राणिसंग्रहालयातील एक हिप्पो – पाणघोडा – मादी विमानातून आणली. त्याच प्राणिसंग्रहालयातील एक हिप्पो नर जहाजातून इंग्लिश कालव्यामधून पॅरिसपर्यंत व तिथून पुढे विमानातून आणवला. त्याच्या क्षेत्ररक्षकांनी कोमती नदीकाठी नऊ फूट लांबीची मगर पकडली, तीदेखील ट्रकमध्ये घालून म्लिल्वाना येथे आणवली.

परंतु एकदा एक यातनादायक दिवस उगवला. तीस-एक जणांना बरोबर घेऊन टेड स्वत: गुंगीचे औषध दिलेल्या एका गेंड्याला ट्रकमध्ये घालून आणत होता. गुंगीत झोपलेल्या गेंड्याभोवती बसलेले लोक अचानकपणे

दचकले. तो गेंडा एकदम गुंगीतून जागा होऊन बांधलेल्या दोरीशी खेचाखेच करू लागला. तो त्या लोकांसमोर चक्क उभा राहिला. सर्व बाजूंनी बांधलेला गेंडा अशक्त होता, पण तितकाच भयावह होता. तो जागा होऊन उठून उभा राहाताच काही लोकांनी पटापट ट्रकमधून बाहेर उड्या टाकल्या. इतर काही जण ओरडत राहिले. त्यांचे ओरडणे ऐकून चालकाने ट्रक थांबवला. त्या गेंड्याला परत बंदिस्त करण्यात आले.

रेलींच्या या वन्यजीव पुनर्वसनाच्या मोहिमेमुळे राजा दुसरा सोभुझा यांचे त्यांच्याकडे लक्ष वेधले गेले. स्वाझीलॅन्डमधील दुसरा सोभुझा हा आफ्रिकेतील अखेरचा सार्वभौम राजा होय. पन्नास राण्या असणारा राजा म्हणून तो अधिक प्रसिद्ध होता. तिथे दरवर्षी साजरा केल्या जाणाऱ्या रीड नृत्याच्या दिवशी अनेक कुमारिका कंचुकी न घालता अनावृत छातीने नाचत असत. अशाच कुमारिकांमधून तो आपली नवी राणी निवडत असे. देशाच्या संपन्नतेचे चिन्ह म्हणून राजाला खूप राण्या असणे व त्या राण्यांपासून राजाला पुष्कळ संतती असणे गृहीत धरले जात असे. शेजारच्या दक्षिण आफ्रिकेमध्ये स्वाझीलॅन्डला मुख्यत: एक बॅकवॉटर प्रदेश समजला जाई. अशा या स्वाझीलॅन्डमधील कंचुकीविरहित कुमारिकांचा नाच व तेथील राजा यांविषयी दक्षिण आफ्रिकेत डोळे विस्फारून भुवई वाकडी करून तिरकस टीका होत असे. पण राजेशाही पद्धतीला मनापासून मान्यता व आदर देणाऱ्या रेलींनी राजा व इथल्या परंपरांबद्दल नाके मुरडणाऱ्या लोकांकडे कधीच लक्ष दिले नाही. शिवाय वन्यजीव पुनर्वसन मोहिमेदरम्यान त्याने अनेक अवैध शिकारी, चोरटे यांच्याशी शत्रुत्व पत्करले होते. त्याचे पडसाद संसदेतदेखील उमटत होते. अशा वेळी मोहिमेचे सातत्य अबाधित राखण्याकरिता रेलींना राजाच्या पाठिंब्याची नितांत गरज होती.

या दोन्ही अभयारण्यातील सर्व प्राणी परत यावेत, असे राजा सोभुझा यांचीदेखील मनोमन इच्छा होती. परिणामस्वरूप रेलींना सोभुझांच्या रूपात एक निष्ठावान मित्र मिळाला. म्लिल्वाना येथील अभयारण्य ही तर फक्त त्यांच्या एकत्र कार्याची सुरुवात होती. राजा सोभुझा व त्यानंतर गादीवर आलेला त्यांचा मुलगा तिसरा मस्वाती यांच्या संगतीत काम करत रेलींनी ल्हाना येथे पहिल्या राष्ट्रीय उद्यानाची स्थापना केली. त्यापुढे जाऊन मखाया इथे काळा गेंडा, न्गुनी कॅटल यांसारख्या अस्तित्व धोक्यात असणाऱ्या प्राण्यांच्या रक्षणाकरिता व संगोपनाकरिता एक आरक्षित अभयारण्य उभे

केले. ना नफा तत्त्वावर पशुकल्याण कल्पनाधिष्टित एक विश्वस्त व्यवस्था तयार करण्यात आली. या व्यवस्थेमार्फत तीनही वन्यपशू उद्यानाचा कारभार चालू लागला. एकीकडे रेलींनी अधिकाधिक वन्यक्षेत्ररक्षकांना प्रशिक्षण दिले, ज्यामध्ये त्यांचा मुलगा मिक याचाही समावेश होता, तर दुसऱ्या बाजूला या तीनही अभयारण्यात चित्ते, रानगवे, सेबल ॲन्टिलोप (काळवीट) व सिंह यासारख्या प्राण्यांच्या संख्येत ते वाढकरत राहिले.

१९८७मध्ये मिकने किशोरावस्था नुकतीच पार केली होती. याच सुमारास हत्तींचा या अभयारण्यात प्रवेश झाला. परंतु त्यांचे इथे येणे नेहमीच वादग्रस्त राहिले. एक वर्षे वयाची पिल्ले मोजली, तरी हे सगळे जास्तीत जास्त डझनभर हत्ती होते. त्यांना दक्षिण आफ्रिकेमधून ट्रकमध्ये घालून इथपर्यंत आणले होते. दक्षिण आफ्रिकेतील हत्तींची संख्या कमी करण्यासाठी दरवर्षी केल्या जाणाऱ्या 'सामूहिक हत्ये'मधून या पिल्लांचा स्वत:चा जीव वाचलेला असला, तरी त्यांनी आपल्या आत्मजांची हत्या समक्ष अनुभवलेली होती. त्यांना इथे आणण्यात काही शहाणपणा आहे याच्याशी सगळेच सहमत होतील असे नव्हते. ही अशी इतक्या लहान वयाची पिल्ले आईविना कशी जगतील? आणि जरी ती जगली तरी त्यांच्या कुटुंबीयांच्या निर्मम हत्येची स्मृती त्यांना सतावत राहील का? असे अनेक प्रश्न निर्माण होत होते.

टेड रेलींनी या सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. त्यांना हे मान्य होते की, आपल्या आईच्या संगतीत जंगलात भटकणे ही पिल्लांकरिता सर्वांत आनंदाची गोष्ट असते. परंतु वर्तमानातील सत्य असे आहे की, त्यांची आई आता जिवंत नाही. अशा परिस्थितीत मखाया व ल्हाना या आरक्षित अभयारण्यात सुरक्षित राहणे; त्यांना का आवडणार नाही?

आणि खरोखरच ती हत्तीची पिल्ले नवीन वातावरणात लवकरच सहजतेने रमून गेली. इथे आल्यानंतरच्या काही वर्षांतच येथील सर्व सामग्री स्रोतांचा त्यांनी यथोचित उपभोग घेतला. खरेच, हत्ती हा भूतलावरचा अतिशय प्रेमळ असा प्राणी आहे. पण त्याचबरोबर तो अतिशय खादाड असा प्राणी आहे. दिवसातील १८ तास तो चरतच असतो. त्याच्याठायी सभोवतालच्या पर्यावरणाला स्वत:च्या सोईनुसार बदलण्याची विलक्षण क्षमता असते, जी त्यांच्याखेरीज इतर प्रजातींमध्ये सहसा आढळत नाही. मखाया व ल्हाना इथे वाढणारे हे हत्ती झाडांचे बुंधे मोडत होते, इतर अनेक

झाडे उद्ध्वस्त करून नैसर्गिक जंगलांचा ऱ्हास करत होते. या सर्व विध्वंसातून झाडांवर वस्ती करणाऱ्या गरुड, गिधाड व घुबड कुलातील पक्ष्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला होता. आफ्रिकेतील धोक्यात असणाऱ्या काळ्या गेंड्याच्या अस्तित्वालाही एक मोठे आव्हान निर्माण झाले होते. कारण गेंडा व हत्ती समप्रकारच्या वनस्पतीवर – गवतावर – जगतात.

सध्या बोईंग ७४७ या विमानामधून प्रवास करणाऱ्या या ११ हत्तींना विमानात चढवण्याअगोदर अनेक प्राणीहक्क संघटनांनी असा युक्तिवाद केला होता की, मखाया व ल्हानाच्या जंगलामध्ये हत्तींना वावरण्यासाठी पुरेशी मोकळी जागा उपलब्ध आहे; इथे होणाऱ्या हत्तींच्या गर्दीचा मुद्दा अनाठायी आहे. या हत्तींना प्राणिसंग्रहालयाला विकण्याचे पोकळ समर्थन करण्यासाठी रेलींनी हत्तींच्या होणाऱ्या गर्दीचा खोटाच मुद्दा शोधला आहे.

परंतु आजदेखील या अभयारण्यांची डोळस पाहाणी करणाऱ्या कोणालाही या समस्येची गंभीरता कळू शकते. मखाया अभयारण्यातील वनसंपदेचा लक्षणीय विध्वंस झाला आहे. ल्हानामध्ये तर तो अगदी विनाशकारी आहे. जिथे हत्तींचा वावर नाही अशा तारांच्या कुंपणाने सीमित केलेल्या अभयारण्यातील टापूकडे नजर टाकली, तरी तिथला हिरवागर्द वनराईचा प्रदेश नजरेत भरतो. तिथेच उभे राहून जर आपली नजर केवळ काही इंच दुसऱ्या बाजूला जिथे हत्तींचा वावर आहे तिथे वळवली तर तेथील उजाड भकास भूप्रदेश दिसून येतो. बरीच झाडे जमिनीवर आडवी झालेली आहेत, इतर काही झाडे पर्णहीन, मोडलेल्या फांद्यांनी अस्थिपंजर होऊन उभी आहेत.

चंद्रप्रकाशात उजळणाऱ्या त्या उजाड रानाकडे पाहिले की वाटते, इथे हत्तीच काय कोणतीही जीवप्रजाती जगणे अशक्य आहे.


★

**आगामी**

# मृत्यूचं अमरत्व

ओशो

अनुवाद
स्वाती चांदोरकर






# कलावंत आणि विचारवंत हेच संस्कृतीचे मानदंड

बडोदा येथे मराठी वाङ्मय परिषदेचे ६वे अधिवेशन फेब्रुवारीमध्ये संपन्न झाले. अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या भाषणात बृहन्महाराष्ट्रातील मराठी जनांचे सांस्कृतिक संचित या विषयावर आपले विचार मांडले. त्या भाषणातील काही भाग येथे देत आहोत.

नक्षलवादाचा प्रश्न अनेक प्रांतांत उग्र बनलाय. पूर्व भारत अशांत आहे. काश्मीर सतत ज्वलंत व अस्वस्थ आहे. पूर्व-पश्चिम-उत्तर सीमा भारतीयांच्या काळजाला सतत छळत राहतात. आंतरराष्ट्रीय दहशतवाद आपल्या देशालाही व्यापून उरलाय. पेशावरच्या निष्पाप शाळकरी मुलांची आणि पॅरिसमधील पत्रकार व व्यंगचित्रकारांची दहशतवाद्यांनी केलेली हत्या हे सर्व जगासमोरचे मुख्य आव्हान आहे. संपूर्ण जगच अस्थिर आहे. महागाई, दारिद्र्य, बेकारी, उपासमार, कुपोषण हे अविकसित व विकसनशील राष्ट्रांचे कळीचे प्रश्न बनलेत. अण्वस्त्रांचा धोका तिसऱ्या महायुद्धाला जन्म देऊ शकतो. जागतिक स्तरावरील शीतयुद्ध संपले नाही! संपत नाही. नैसर्गिक तेल आणि पाण्याचे साठे संपत आहेत. लोकसंख्येचा पूर आलाय.

या सर्व जागतिक प्रश्नांची पुरेशी दखल मराठी साहित्याने घेतलीय का? मराठी लेखक सभोवताली आग लागली. तरी पांचट प्रेमकाव्यातच अडकून पडले, तर मराठी साहित्य व सांस्कृतीचा वाली कोण? मराठी संतांनी साहित्यातून विश्वात्मकता जोपासली. त्यांच्या भक्तीचे केंद्र ईश्वर होते, पण साहित्याचे केंद्र मानवी कल्याण होते. म्हणून तर त्यांनी साहित्याच्या

अंतरंगात ‘अवघाचि संसारा’चे कल्याणकारी चित्र रंगवले. संपूर्ण विश्वच आपले घर मानले. ‘वसुधैव कटुंबकम्’चा मंत्र संतांनी गायला. स्वामी विवेकानंदांनी अधोरेखित केला आणि तो त्याच उदात्त मंत्राचा उच्चार भारताचे नवे पंतप्रधान नरेंद्र मोदीही करत आहेत.

मराठी लेखक या विश्वात्मक जाणिवेपासून किती जवळ व किती दूर आहेत? या प्रश्नाच्या उत्तरात शब्दांची जाण असणाऱ्या प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आमचे पाय क्षेत्रीय मातीत भरभक्कम उभे हवेत; पण आमचा मेंदू आणि प्रज्ञा विश्वाला पेलणारी हवी. आमचे काळीज विश्व मानवाला कवटाळणारे हवे! अस्सल साहित्याचे खरे आशयसूत्र हेच आहे.

**सांस्कृतिक दुर्दैव आणि दहशतवाद**

मराठी संस्कृती अनेक मानदंडांनी आणि अनेक सांस्कृतिक केंद्रांनी भारावलेली आहे. मराठीचे वैभव कोरणारा ज्ञानेश्वर जसा आमचा; तसाच ढोंगी साधू आणि दांभिक पंडितांवर शब्दांचे कोरडे ओढणारा तुकारामही आमचाच! वारकरी पंथात ज्ञानदेव तुकाराम हा गजर निष्ठेने केला जातो. पण आजच्या महाराष्ट्रातील काही विद्वानांनी जातीय द्वेषभावना पेरून ज्ञानदेव-तुकारामांची नाळ तोडून ‘नामदेव तुकारामां’च्या नावाचा गजर रुजवण्याचा प्रयत्न केलाय. संतांना जातीत कैद करण्याचा महाराष्ट्रीय विद्वानांचा उद्योग आहे. हा सांस्कृतिक दहशतवाद संत साहित्यासह संपूर्ण मराठी संस्कृतीच्या दुर्दैवाचा भाग बनलाय. साहित्याची जात व धर्म केवळ माणुसकी असते. पण हे सत्य जातीयवादी विद्वानांना केव्हा कळणार?

दहशतवाद इस्लामी असो वा हिंदुत्ववादी असो, तो मानवतेला घातकच आहे. मानवी समाजाच्या ज्वलंत प्रश्नापासून कोणतेही साहित्य फारकत घेऊ शकत नाही म्हणूनच या व्यासपीठावरून वर्तमान समाजातील संस्कृतीला छळणाऱ्या प्रश्नांची मांडणी मी कर्तव्य भावनेने करीत आहे.

**समाजवास्तव आणि कळीचे प्रश्न**

या पूर्वी बडोद्याच्या याच व्यासपीठावरून अनेक साहित्य संमेलनांत विविध साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा अध्यक्षीय भाषणातून झालीय. परभाषेतील शब्द मराठी भाषेत घ्यावेत का, वाङ्मय आणि अश्लीलता, संपूर्ण रसचर्चा धर्मदास्याचा भाग आहे का? लेखकाची वाचक सन्मुखता, लेखकाची सामाजिक बांधिलकी, वाचकांच्या सदभिरुचीचा अंकुश, लेखन

स्वातंत्र्याच्या मर्यादा, नाटकातील सत्य म्हणजेच ललित सत्य, असे असंख्य प्रश्न त्या त्या वेळच्या अध्यक्षांनी चर्चेत आणले. त्यातील अनेक प्रश्न आजही चर्चेत आहेतच. आजचे वाङ्मयीन व सांस्कृतिक विश्वातील कळीचे प्रश्नही समजून घेणे आवश्यक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील सीमारेषा, सेन्सॉरशिप: शासनाची व समाजाची, सांस्कृतिक दहशतवाद, धार्मिक उन्माद आणि लेखन स्वातंत्र्य, धर्म आणि राज्यघटनेतील विसंवाद, धर्मभावना दुखावणारे साहित्य, श्लील-अश्लीलता आणि साहित्य निर्मिती, अशा अनेक प्रश्नांबाबत सुसंस्कृत व विवेकी भूमिका घेऊनच चर्चा करायला हवी.

साहित्यातील सामाजिकता आणि सांस्कृतिकता अधोरेखित करताना, समाजवास्तवाचे उभे-आडवे धागे टाळता येत नसतात. धर्माचा व जातीचा गुंता सोडवूनच साहित्याचे श्रेष्ठत्व ठरवता येईल. जातीचा-धर्माच्या संकुचित जीवन जाणिवेत बंदिस्त झालेली कलाकृती श्रेष्ठ मानता येत नाही. साहित्याचा केंद्रबिंदू माणूसच हवा. म्हणून इतिहाससुद्धा जात-जाणिवेतून लिहायचा नसतो, तसाच तो जात-जाणिवेतून अभ्यासायचासुद्धा नसतो.

कितीतरी वर्षांपासून हिंदू-इस्लाम-ख्रिश्चन-बौद्ध-जैन-शीख धर्मीय जनता भारताच्या मातीत जन्म-मरण स्वीकारून जगत आली. त्यांच्या धर्मश्रद्धा बदलणे शक्य आहे का? आवश्यक आहे का? सर्वच मुस्लीम दहशतवादी नसतात म्हणून तर पाकिस्तानच्या सैन्याची धुळधाण करून अब्दुल हमीद हुतात्मा झाला. सोलापूरच्या हुतात्मा चौकातील शहिदांच्या पुतळ्यात मुस्लीम राष्ट्रभक्त स्वातंत्र्य चळवळींतील हौतात्म्याने सन्मानित झालाय. बिसमिल्ला खानची शहनाई, झाकीर हुसेनचा तबला हिंदू कलावंतांच्या स्वरांशी एकरूप होतो. अभिजात संगीताची भारतीय परंपरा हिंदू-मुस्लीम गुरू-शिष्यांच्या योगदानाची साक्ष देते.

आमचे शास्त्रीय संगीत धार्मिक ऐक्यातून अभिव्यक्त होते, कारण स्वरांना जात-धर्म नसतो. मग शब्दांना तरी जात - धर्माची विषबाधा का व्हावी? गालिबची गझल मराठीत रुजली आणि संतांचीच अभंगवाणी शेख महमदांसह अनेकांनी स्वीकारली. सुफी संतांचे दर्गे हिंदू-मुस्लीम भक्तांचे श्रद्धास्थान बनले. या पार्श्वभूमीवर मराठी साहित्य धार्मिक ऐक्याचा सांस्कृतिक दर्गा व्हावा, ही अपेक्षा का करू नये?

**जागतिकीकरण आणि चंगळवादी सांस्कृतिकता**

जागतिकीकरणाच्या वर्तमानकाळात चंगळवाद आणि भोगवादाने शिखर गाठलेय. वस्तूनिर्मिती व वस्तू विक्रयाचे जागतिक जाळे विणले जाऊन माणूससुद्धा विक्रीची वस्तू बनलाय. यंत्र प्रभावी, पैसा प्रभावी आणि माणूस दुय्यम झालाय. सत्य, न्याय, सौंदर्य, समता, बंधुता, माणुसकी, पावित्र्य,स्वातंत्र्य या सर्व मूल्यात्मकतेला घरघर लागलीय. जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत यांच्या अस्मिता क्रूर झाल्यात. त्यामुळे सामान्य माणूस गर्भगळित व मध्यमवर्गीय माणूस भयभीत झालाय. फक्त श्रीमंत शोषक सुखात आहेत.

निसर्गाच्या असमतोलाने प्राणी, पक्षी आणि मानवाचा अनुबंध विसकटून गेलाय. वैचारिक व आर्थिक भ्रष्टतेने संस्कृती पोखरलीय. माध्यमांच्या नंग्या नाचातून भोगवाद बोकाळलाय. माध्यम -मार्तंड आणि त्यांचे मालक स्वार्थी बनलेत. महापुरुष, संत, महात्मे यांच्या नावे भक्तांनी दुकानदारी सुरू केलीय. देश आणि माणूससुद्धा विकला जातोय.

**संस्कृतीचे मानदंड कलावंत - विचारवंत**

संस्कृतीच्या कैवाऱ्यांनीच आता ही अधोगती थांबवायला हवी कारण त्यांच्याकडे असणारी प्रतिभा सक्षम आहे. त्यांनाच वेदनेची जाणीव होऊ शकते. मानवी स्पंदनाचे ज्ञान त्यांनाच आहे. दु:ख मुक्त मानवतेचा ध्येयवाद साहित्यिकांनी, कलावंतांनी व विचारवंतांनीच आजवर जपलाय -पुजलाय. मी शब्दप्रभूंनाच साकडे घालू इच्छितो. बडोद्याची भूमी आणि मराठी वाङ्मय मंडळाचे हे सांस्कृतिक व्यासपीठ राष्ट्रीय ऐक्य - भावनेसह सांस्कृतिक एकात्मतेला आणि विश्वव्यापी सहजीवनाला साद घालीत आहे. आपणा सर्वांना शांतता हवी. भाकरीसह स्वातंत्र्य व सामाजिक न्याय हवा. विश्वाची समृद्धी व सार्वभौमत्व हवे. त्यासाठीच ही सांस्कृतिक धडपड आहे. आपणास सर्व प्राणिमात्रांसह सर्वांना आनंद हवा. दु:ख मुक्त मानवता हा सर्व जगातील लेखक कलावंत विचारवंतांचा ध्येयवादा आहे. आपण मराठीप्रेमी मंडळी सर्व जनतेच्या आनंदाचा ठेवा मराठी भाषेत शोधतो आहोत. आपण सर्वांना प्रेमाची व माणुसकीचीच भाषा प्रमाण आहे. सर्व धर्मातील विधायक मूल्यात्मकता आपणास वंदनीय आहे. त्याच सांस्कृतिकतेचा ध्यास आम्ही मराठी भाषा व संस्कृतीच्या प्रत्येक प्रवाहात रुजवू इच्छितो.

★



# श्रद्धांजली

## आर. आर. पाटील



महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आर. आर. पाटील (वय ५७) यांचे दि. १६ फेब्रुवारी रोजी कर्करोगाने मुंबईतील लीलावती रुग्णालयात निधन झाले. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांच्यावर कर्करोगाचे उपचार चालू होते. संपूर्ण राज्यात आर. आर. पाटील आबा या नावाने ओळखले जात होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, तीन मुले असा परिवार आहे. पाटील यांच्यावर सांगली जिल्ह्यातील त्यांच्या अंजनी या जन्मगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लाखो लोक उपस्थित होते.

तीन दशकांपूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून राजकारणातील कारकीर्द सुरू केलेल्या आर. आर. पाटील यांनी पुढे राज्याचे ग्रामविकास मंत्री, उपमुख्यमंत्री तसेच गृहमंत्री म्हणून आपल्या कामाचा ठसा उमटविला. त्यांनी सलग सहा वेळा तासगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. शैलीदार आणि हजरजबाबी वक्तृत्वामुळे तसेच जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची नेमकी माहिती असल्यामुळे आर. आर. पाटील महाराष्ट्रातील राष्ट्रवादीचा चेहराच बनले होते.


### राजकीय प्रवास

* १९७९ मध्ये सर्वप्रथम सावळजमधून जिल्हा परिषद सदस्य बनले.
* १९७९ ते १९९० जिल्हा परिषद सदस्य म्हणून कारकीर्द
* १९९० साली पहिल्यांदा आमदार बनल्यानंतर १९९५, १९९९,

२००४, २००९, २०१५ असे सलग सहा वेळा विधानसभा निवडणुकीत विजयी.

* काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद तसेच विधिमंडळाच्या लोकलेखा समितीचे अध्यक्षपद भूषवले.
* १९९९ साली शरद पवार यांच्यासोबत राष्ट्रवादीत प्रवेश.
* १ नोव्हेंबर २००४ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी.
* २००३ ते २००८ आणि २००९ ते २०१५ या कालावधीत राज्याचे गृहमंत्रीपद सांभाळले.
* नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून स्थानिक नागरिकांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण केले होते.

## कॉम्रेड गोविंद पानसरे



ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, पुरोगामी विचारवंत, कामगार, श्रमिकांचे आधार गोविंद पानसरे आणि कम्युनिस्ट पक्षाचे झुंझार कार्यकर्ते कॉ. गोविंद पानसरे (वय ७८) यांचे दि. २० फेब्रुवारी रोजी निधन झाले. कोल्हापूर येथे अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात जखमी झालेल्या पानसरे यांच्यावर मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात उपचार चालू होते.

धार्मिक कट्टरवादी तसेच कामगारांचे शोषण करणारे भांडवलदार यांना नेहमीच पानसरे यांनी कडाडून विरोध केला. यासाठी त्यांनी विविध प्रकारच्या आंदोलनांसह लेखणीचाही वापर केला. पानसरे यांनी काही काळ वृत्तपत्र विक्रेता म्हणून काम केल्यानंतर कोल्हापूर महानगरपालिकेत शिपाई म्हणूनही नोकरी केली होती. त्यानंतर म्युन्सिपल स्कूलमध्ये काही दिवस प्राथमिक शिक्षक म्हणूनही सेवा बजावली. १९६४ पासून वकिली सुरू केल्यानंतर त्यांनी कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बार असोसिएशनचे अध्यक्षपदही भूषवले.

**पानसरे यांनी केलेले लिखाण**

* शिवाजी कोण होता च्या एकूण २४ आवृत्या. कानडी, उर्दू, गुजराथी, इंग्रजी तसेच हिंदी भाषेत प्रकाशित
* मंडल आयोग आणि राखीव जागांचा प्रश्न

* कामगार कायद्याची तोंडओळख
* ३७० कलमाची कुळकथा
* मुस्लिमांचे लाड
* पंचायत राज्याचा राजीनामा
* अवमूल्यन कळ सोसायची कुणी
* राजर्षी शाहू वसा आणि वारसा
* शेतीधोरण परधार्जिणे
* कामगारविरोधी कामगार धोरणे

## आत्माराम भेंडे



आपल्या सहजसुंदर अभिनयाने मराठी बरोबरच हिंदी आणि इंग्रजी रंगभूमीवर आगळीवेगळी छाप उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते आत्माराम भेंडे यांचे ७ फेब्रुवारीला पुण्यात निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. अंगविक्षेप किंवा थिल्लरपणा न करता केवळ हावभाव, शब्दफेक आणि टायमिंगच्या जोरावर उत्तम विनोदनिर्मिती करण्यात त्यांचा हातखंडा होता. ७ मे १९२३ रोजी कोकणात सावंतवाडीजवळच्या अरोंदा गावी जन्मलेले भेंडे सहा दशकांहून अधिक काळ मराठी सिने-नाट्यसृष्टीत कार्यरत होते. मुंबईच्या व्हीजेटीआयमधून त्यांनी टेक्सटाइल मॅन्युफॅक्चरिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता.

## वैजयंती पटवर्धन

तळेगाव येथील इंद्रायणी महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापिका व लेखिका वैजयंती पटवर्धन (वय ७६) यांचे २ फेब्रुवारी रोजी निधन झाले. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्त जन्मशताब्दीनिमित्त पटवर्धन यांनी १९७५ मध्ये 'ज्ञानोबा माझा' हे पुस्तक लिहिले. 'मावळतीची उन्हे', 'वटवृक्षातळी स्वामी', 'भावगंध' अशी आध्यात्मिक विषयांवरील आठ पुस्तकेही त्यांनी लिहिली.

★




## प्रा. हातकणंगलेकर - साहित्यपीठाचे कुलगुरु

प्रा. म. द. हातकणंगलेकर सरांच्या निधनामुळे मराठी आस्वादक समीक्षेचं आणि लिहित्या लेखकांचं साहित्यविश्वातलं जणू बळच हरपलं आहे. त्यांच्या सजग समीक्षालेखनानं त्यांनी अनेकांना लिहितं केलं. वाङ्मयीन क्षेत्रात हातकणंगलेकर सरांचे अनेकांशी भावनिक बंध होते. त्यांच्या निधनामुळं जी. ए., ग्रेसपासून ते राजन गवसांपर्यंत दोन वेगळ्या लेखन काळाचा एक भावनिक पूल वाङ्मयीन क्षेत्रापासून तुटला आहे. सांगली जिल्ह्याचा वाङ्मयीन नकाशा अनेक मानचिन्हांनी वलयांकित झाला आहे. वि. स. खांडेकर, गदिमा, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, , अण्णाभाऊ साठे, खाडिलकर, नाट्याचार्य देवल, आद्य नाटककार विष्णुदास भावे, सुसंस्कृत राजकारणी आणि साहित्यिक यशवंतराव चव्हाण, वि. स. खांडेकर, श्री. दा. पानवलकर, कवी गिरीश या साहित्यकारांची गौरवभूमी म्हणून सांगली जिल्ह्याचा सतत उल्लेख होत असतो.त्यांच्या स्वभावात मिश्किलपणाची छटा होती. आपल्या नर्मविनोदी स्वभावा-नुसार बोलताना मध्येच ते नकळत चिमटा घेऊन ते नवख्या माणसाला चकित करीत. ग. प्र. प्रधान, ग्रेस, ना. धों. महानोर, सुभाष भेण्डे, रा. ग. जाधव, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर अशा अनेक सुहृदांसोबत गप्पांचा अड्डा जमवण्याचा त्यांना नाद होता. नव्या पिढीतले राजन गवस, सदानंद देशमुख, ज्ञानेश्वर मुळे, विश्वास पाटील, कृष्णात खोत, पंकज कुरुलकर, मिलिंद बोकील या लेखकांचे ते मार्गदर्शक होते आणि ते त्यांना तरुण मित्र मानत. त्यांच्या मैत्रीचे बंध घट्ट विणलेले होते. त्यामुळे सरांशी बोलताना पिढीतले अंतर मिटते, असे प्रत्येकाला वाटे. साठीच्या दशकात त्यांची लेखनाला सुरूवात झाली. सुमारे चाळीस वर्षे इंग्रजी विषयाचे अध्यापनाचे



काम सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात त्यांनी केले. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. आस्वादक समीक्षा हा त्यांच्या लेखनाचा गुणविशेष होता. त्यांची सोळा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या लेखनात सैद्धांतिक आणि सौंदर्यशास्त्रीय विचारांचा सूक्ष्म परामर्श घेतला आणि समीक्षापर लेखनात साहित्यकृतीचे मर्म, सामर्थ्य व भाषिक सौंदर्य प्रत्ययाला येते. 'साहित्यातील अधोरेखिते' (१९८०) हे त्यांचे पहिले पुस्तक. 'मराठी साहित्य : प्रेरणा आणि प्रवाह', 'निवडक मराठी समीक्षा' ही त्यांची संपादित पुस्तके. याशिवाय 'मराठी कथा : रूप आणि परिसर', 'साहित्यविवेक : भाषणे आणि परीक्षणे' इंग्रजीतून प्रकाशित झालेले 'विष्णू सखाराम खांडेकर' हे पुस्तक तसेच 'निवडक ललित शिफारस' ही पुस्तके त्यांच्या वाङ्‌मयीन अभिरुचीची निदर्शक आहेत. 'गोनिदां'च्या 'माचीवरचा बुधा' व व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सती' या पुस्तकांचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला होता. सरांनी 'उघडझाप' या आत्मचरित्रात त्यांच्या आयुष्याचा धावता पट वाचकांसमोर निर्मळ मनाने आणि निडरपणे खुला केला आहे. साहित्य अकादमीच्या मराठी भाषा समितीवर त्यांनी काम केले. लेखक म्हणून जे योगदान दिले, त्यापेक्षा इतरांना लिहिते करण्याचे मोठे काम केले आहे. 'बारोमास' ही साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखनकृती असेल अथवा बाबा भांड यांची 'दशक्रिया', डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आन् आम्ही' हे आत्मकथन अशा साहित्यकृतींच्या निर्मितीप्रक्रियेला त्यांनी प्रोत्साहन दिले होते. पुस्तकासाठी प्रकाशक मिळवून देण्यापर्यंतचे बळ त्यांनी दिले होते. मराठी ग्रंथ व्यवहारातील प्रत्येक घटक सरांच्या संपर्कात असे. चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांचे एखादे मुखपृष्ठ आवडले की तात्काळ प्रतिक्रिया देत, तर 'मौज' च्या अंकात 'गावठाण' ही कृष्णात खोत यांची कादंबरी प्रसिद्ध

झाल्यावर त्या लेखकाचे फोनवरून कौतुक करायला ते अजिबात कमी पडत नसत. हातकणंगलेकर सरांनी लेखनासोबत भाषिक जडण-घडणीसाठी विविध लेखकांच्या साहित्यिक कामगिरीवर परिसंवाद घेतले होते. महाविद्यालयात व्याख्यानाच्या निमित्ताने ठिकठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विविध भाषेतील परिसंवादात उत्साहाने भाग घेतला होता. अध्यापनाच्या निवृत्तीनंतर सरांनी 'उगवाई' हे वाङ्मयीन नियतकालिक सुरू केले आणि ते निष्ठेने चालवले होते. या अंकात नवोदितांना जास्तीत जास्त संधी दिली. जी. ए. कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर आणि श्री. दा. पानवलकर यांच्याशी सरांची मैत्री विलक्षण होती. जी ए. हे मराठी सारस्वतातले वेगळ्या वळणाचे पाणी. पण सरांनी जी. एं. च्या आर्थिक अडचणीच्या काळात एका प्रकाशन संस्थेला जी. एं.नी लेखनाचे हक्क कमी किंमतीत विकले हे समजल्यावर धारवाड येथील माळमड्डीतले जी. एं.चे राहते घर स्मारक म्हणून संरक्षित करण्यात सरांनी पुढाकार घेतला. या सगळ्यातून सर मैत्रीला जागले होते. बेळगावातल्या 'रेक्स' सिनेमागृहात जी. ए. आणि सरांची पहिली भेट झाली. दोघांनाही इंग्रजी सिनेमाची आवड आणि इंग्रजी वाङमयाचे अफाट वाचन, अशा अनेक दुव्यांनी ही मैत्री सांधली होती. 'जी.एं.ची निवडक पत्रे' या 'मौज'ने प्रकाशित केलेल्या चार खंडांचे सरांनी संपादन केले होते. ही त्या मैत्रीचीच एक वाङ्मयीन भेट आहे. 'निर्वेद' कुपवाड रस्ता, सांगली हे सरांचे घर म्हणजे महाराष्ट्रातल्या नवोदित आणि प्रस्थापित लेखकांचे एक संकेतस्थळ होते. इंग्रजी अध्यापन आणि पाश्चात्य साहित्यातील उन्मेषशाली सौंदर्यस्थळे त्यांनी टिपली होती. मात्र मातृभाषेच्या ममत्वामुळे स्वभाषेतून त्यांनी लेखन केले. हातकणंगलेकर केवळ समीक्षक, लेखक एवढेच नव्हते तर मराठी सारस्वताच्या साहित्यपीठाचे ते अनभिषिक्त कुलगुरुच होते.

-अरुण नाईक
एस-३, विश्वदेव, आकाशवाणीजवळ
ताराबाई पार्क, कोल्हापूर.
९८८११ २९२९२

★





# बदकाचे बूट

एक होता डोंगर. डोंगरावर होती खूप खूप झाडं. हिरवी हिरवी झाडं. डोंगराच्या पायथ्याशी होतं एक तळं. निळंशार पाणी असलेलं सुरेखसं तळं. तळ्याच्या भोवतीनं होतं मोहरीचं शेत. पिवळ्या धम्मक मोहरीची फुलं लागलेलं हिरवं हिरवं शेत. निळ्याशार तळ्याच्या पाण्यात एक चंदेरी मासोळी इकडून तिकडे बागडत आनंदाने पोहत होती. तिचे नाव चंदाराणी. चंदाराणी पोहता पोहता मनाशी म्हणाली,

'निळ्या निळ्या पाण्यात पोहते चंदाराणी
तिच्यासारखी भाग्यवान जगात असेल का कुणी?'


मोठी खुशीत होती ती! किनाऱ्याशी तिला पाण्यावर तरंगणारे शेवाळे दिसले. 'वा! किती सुंदर जेवण आहे हे!' असं म्हणत ती घाईने शेवाळ्याच्या दिशेने गेली. थोडेसे शेवाळे तिने खाल्लेसुद्धा! इतक्यात एका बदकाने तिला पाहिले.

'वा! किती सुंदर फराळ आहे हा!' असं म्हणत ते झपकन तिच्या दिशेने आले. आणि त्याने चटकन् तिला चोचीत उचलले. 'आपल्याला श्वासोच्छ्वास करायला इतका त्रास का होतोय?' चंदाराणी विचार करायला लागली.



'बाप रे! आपण पाण्यात नसून बदकाच्या चोचीत आहोत.'

आता चंदाराणीच्या लक्षात आले. चंदाराणी बदकाला म्हणाली, 'सोडून दे ना मला! मी अजून हे तळंसुद्धा पुरतं पाहिलं नाही.' पण बदक म्हणालं, 'तुला सोडून



दिलं तर मी काय खाऊ? मला तर खूपच भूक लागलीय.' चंदाराणी म्हणाली, 'पाण्यात तुला खूप काही खायला मिळेल. शेवाळं- पाण वनस्पती.'

बदक म्हणालं, 'तसं पाण्यात गेलं की मला खूप काही खायला मिळेल. पण पाण्यात गेलं की माझे पाय ओले होतील. मला सर्दी-खोकला होईल. ताप येईल, त्याचं काय?'

चंदाराणीने खूप गयावया केली. तशी बदक म्हणालं,

'तुला मी सोडून देतो; पण एका अटीवर. आज संध्याकाळपर्यंत तू मला तरंगणारे बूट आणून दे. मग ते घालून मी तळ्यात जाईन आणि माझं अन्न मिळवीन. पण, तू जर मला बूट आणून दिले नाहीस, तर मी तुला खाईन.' चंदाराणीने ते कबूल केले.

चंदाराणीने दुपारपर्यंत तळ्यात खूप शोधाशोध केली. आता तिला काठाचे शेवाळेही चवदार लागत नव्हते. तळ्यामध्ये खूप शोधाशोध करूनही तिला तरंगणारे बूट सापडले नाहीत. काठाशी येऊन ती रडत बसली. पाण्यातच असल्यामुळे तिचे अश्रू कुणाला दिसले नाहीत म्हणा. पण, तिच्या रडण्याचा आवाज तिथूनच चाललेल्या गोगलगायीने ऐकला. तिने विचारले,

'का ग रडतेस चंदाराणी?'

चंदाराणी म्हणाली, 'तरंगणारे बूट बदकाने मागितले. मला ते कुठेच नाही सापडले. आता मला बदक खाऊन टाकील. म्हणून मी रडते.'

गोगलगाय म्हणाली,

'रडू नको ग चंदाराणी. तुझ्यासाठी बूट मी शोधून आणीन. शेतात जाईन इकडे पाहीन. तिकडे पाहीन. तरंगते बूट शोधून आणीन.' गोगलगाय निघाली बूट शोधायला. चंदाराणी लागली हसायला.

गोगलगायीने शेतात खूप शोधाशोध केली. तिला काही बूट सापडले नाहीत. मग एका झाडाखाली जाऊन गोगलगाय रडत बसली. त्या झाडावर एक फुलपाखरु बसलं होतं. फुलातला मध पीत होतं. रडण्याचा आवाज ऐकून त्यानं खाली पाहिलं. गोगलगाय रडत होती. फुलपाखराने विचारले,

'गोगलगाय, गोगलगाय काय ग रडतेस शंखातली बाय?'

गोगलगाय म्हणाली, 'बदकभाऊला हवेत तरंगते बूट. बूट मिळाले नाही तर तो तळ्यातल्या चंदाराणीला खाणार. म्हणून चंदाराणी रडते. चंदाराणी रडते म्हणून मी पण रडते.'

फुलपाखरू म्हणालं, 'गोगलगाय... गोगलगाय... हास ग माझी शंखातली बाय! झाडा-झुडपांवर उडेन मी. तरंगते बूट शोधेन मी! बदकभाऊला बूट देऊ. चंदाराणीचे प्राण वाचवू.' फुलपाखराने झाडा-झुडपांवर खूप शोधाशोध केली. पण, त्याला काही तरंगणारे बूट सापडले नाहीत. शेवटी ते एका मोहरीच्या झुडुपावर बसलं आणि रडायला लागलं.

मोहरीच्या फुलांनी फुलपाखराला रडताना पाहून विचारलं, 'फुलपाखरा, नेहमी तू आनंदी दिसतोस. गाणी म्हणतोस. गप्पा मारतोस. गमती-जमती सांगतोस. मग आता का रे असा रडतोस? फुलपाखरु म्हणालं, 'बदकभाऊला हवेत तरंगते बूट. चंदाराणीने तळ्यात शोधले. गोगलगायीने रानात शोधले. मी झाडा-झुडुपांवर शोधले. पण कुणालाच बूट नाही मिळाले. आता बदक चंदाराणीला खाणार. म्हणून गोगलगाय रडते. ती रडते म्हणून मी रडतो.'

मग मोहरीची फुले म्हणाली, 'तुम्हाला तरंगणारे बूट हवेत एवढंच ना! तुम्ही आमची खूप खूप फुले घ्या. त्यांचे धागे काढा. त्याचे बूट बनवा. बदकाच्या पायावर चढवा. आम्ही आहोत मोहरीची फुले. आमच्यात खूप तेल असतं. आमच्यापासून बनवलेले बूट पाण्यावर नक्कीच तरंगतील.'

फुलपाखराने मोहरीची खूपशी फुले गोळा केली. गोगलगायीने त्यांचे धागे काढले. दोघांनी त्यांचे बूट बनवले. तळ्याकाठी घेऊन आले. बदक चंदाराणीला खाणारच होते. इतक्यात दोघे तिथे पोचले. बदकाच्या पायावर बूट चढवले. छान छान बूट. पिवळे पिवळे बूट. तरंगते बूट. बदकाने चंदाराणीला सोडून दिले. बूट घालून बदक खुशीने तळ्यात पोहत गेले.




★

आगामी

# स्वान्सीतील दिवस

लेखिका
वीणा देव




सुदूरच्या 'युनायटेड किंग्डम'मधल्या निसर्गसुंदर 'वेल्स' परगण्यातलं एक टुमदार शहर 'स्वान्सी'. अनपेक्षित योगानं माझं तिथे जाणं झालं. काही काळ निवांत राहणं झालं. आसपासही थोडं भटकणं झालं. तिथल्या निसर्गाचे विभ्रम मी पाहिले. 'वेल्श' लोकांची जीवनशैली न्याहाळताना कुतूहलापोटी स्वान्सी-वासीयांशी कधी संवाद साधले. अनेकदा एकटीनं केलेल्या भटकंतीमुळे स्वतःशीही संवाद होत राहिला. एक लक्षात आलं, ज्या नगरीशी माझं कोणतंही नातं नव्हतं, जी माझी जन्मभूमी नव्हती की कर्मभूमी; त्या 'स्वान्सी'नं हलकेच माझ्या मनात जागा मिळवली. कायमची. तिथल्या अनुभवांना दिलेलं हे शब्दरूप – 'स्वान्सीतील दिवस'.

ऑनलाइन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

## Digital Edition

DIGITAL EDITION

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक
आता डिजीटल स्वरूपात

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत — तीन वर्षांना २५% | पाच वर्षांना ३०%

वर्गणी — ३ वर्षांची वर्गणी ₹३०० | ५ वर्षांची वर्गणी ₹४००

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा
खालील पत्त्यावर पाठवावी.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 March. 2015 Posting Date : 11 March. 2015





# आमची नवीन पुस्तके










BOOK POST
Printed Matter

## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.